## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

### मा.महापालिका सभा
### कार्यपत्रिका क्रमांक – २५
### सभावृत्तांत

दिनांक – २०.१२.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर - २०१८ ची मासिक मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक २०.१२.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ९) | मा. नितीन ( आप्पा ) प्रताप काळजे | |
| १०) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १३) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १४) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |
| १५) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |

,

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.तुषार रघुनाथ हिंगे

४०) मा.अश्विनी भिमा बोबडे

,

४१)	मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४२)	मा.संजय बबन नेवाळे

४३)	मा.एकनाथ रावसाहेब पवार

४४)	मा.भालेकर प्रविण महादेव

४५)	मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४६)	मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४७)	मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४८)	मा.घोलप कमल अनिल

४९)	मा.उत्तम प्रकाश केंदळे

५०)	मा.पवळे सुमनताई मधुकर

५१)	मा.चिखले सचिन तुकाराम

५२)	मा.जावेद रमजान शेख

५३)	मा.यादव मीनल विशाल

५४)	मा.वैशाली जालिंदर काळभोर

५५)	मा.प्रमोद कुटे

५६)	मा. शैलजा अविनाश मोरे

५७)	मा.बाबर शर्मिला राजू

५८)	मा.अमित राजेंद्र गावडे

५९)	मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

६०)	मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६१)	मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६२)	मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६३)	मा.ढाके नामदेव जनार्दन

६४)	मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६५)	मा.करुणा शेखर चिंचवडे

,

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.जयश्री वसंत गावडे

७०) मा.कोमल दिपक मेवानी

७१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.शाम गणपतराव लांडे

७४) मा.सुजाता सुनिल पालांडे

७५) मा.योगेश मंगलसेन बहल

७६) मा.कदम निकीता अर्जुन

७७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८०) मा.नढे विनोद जयवंत

८१) मा.पाडाळे निता विलास

८२) मा.कोकणे संतोष अंकुश

८३) मा.पवार मनिषा प्रमोद

८४) मा.अभिषेक गोविंद बारणे

८५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६) मा.निलेश हिरामण बारणे

८७) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८८) मा.दर्शले रेखा राजेश

८९) मा.कलाटे राहुल तानाजी

९०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

,

९१) मा.ममता विनायक गायकवाड

९२) मा.कामठे तुषार गजानन

९३) मा.चोंधे आरती सुरेश

९४) मा.कस्पटे संदिप अरुण

९५) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९६) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९७) मा.सुनिता हेमंत तापकीर

९८) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९९) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१००) मा.कुटे निर्मला संजय

१०१) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०२) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०३) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०४) मा.मुंढे उषा अंकुश

१०५) मा.लोखंडे चंदा राजू

१०६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११०) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१११) मा.नवनाथ दत्तू जगताप

११२) मा.संतोष बबन कांबळे

११३) मा.सोनवणे शारदा हिरेन

११४) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११५) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

,

११६)  मा. वाबळे संजय मल्हारराव

११७)  मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११८)  मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११९)  मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२०)  मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा. श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा. संतोष पाटील - अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण- शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.पाटील, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.निकम, मा.सवणे-प्र.सह शहर अभियंता, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत - सहा.आयुक्त, मा.बोदडे, मा.राऊत, मा.दांगट- प्र.सहा.आयुक्त, मा.शिदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.) मा.लडकत, मा.गलबले, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.पवार-कार्यकारी अभियंता, मा.दगडे- पशु वैदयकीय अधिकारी, मा.आगळे-प्रशासन अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.माने-लेखाधिकारी (पीएमपीएमएल), मा.डॉ.पंडीत-अधिष्ठाता (वायसीएमएच) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पुणे महानगर परिवहन महामंडळाकरीता ४०० सीएनजी, बीआरटी, नॉन एसी बसेसची खरेदीकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४० % हिश्याप्रमाणे ४०० पैकी १६० बसेससाठी आवश्यक रक्कम पुणे महानगर परिवहन महामंडळ यांचेकडे वर्ग करणेस मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ९९  प्रतिकूल- ०

,

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा. दत्तात्रय साने** – मा. महापौर साहेब, कार्यपत्रिकेवर विषय येऊ दया.

**मा. महापौर –** ऐनवेळचा विषय दाखल करुन घेणेत आला आहे.

**मा. ज्ञानदेव थोरात** – सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह आज आपल्या इथं मा.सदाशिवराव खाडे, अध्यक्ष नवनगर विकास प्राधिकरण पिंपरी चिंचवड शहर यांचा सत्कार आयोजित केला आहे. यापूर्वी ते पुणे जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य होते, वृक्षप्राधिकरण सदस्य पिंपरी चिंचवड, शिक्षणमंडळ सदस्य पिंपरी चिंचवड, सलग तीन वेळा भारतीय जनता पार्टीचे संघटन सरचिटणीस, मागील वेळेस ते शहराचे भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष होते. असे स्पष्ट वक्ते, कुशल संघटक मागील तीस वर्षापासून भाजपाचे सच्चे कार्यकर्ते आहेत आणि त्यांच्या काळात ख-या अर्थाने भारतीय जनता पार्टीच्या प्रदेशात आणि केंद्रात सत्ता आली असे ते मा. सदाशिवराव खाडे यांचे स्वागत करावे. तसेच आपले सन्मा. सदस्य केशवराव हनुमंत घोळवे यांची सुध्दा सदस्य, महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळ यावर निवड झालेली आहे. त्यांचा सुध्दा मी थोडक्यात परिचय करुन देतो. ते २० वर्षे सलग कामगार चळवळीमध्ये राहिलेले सच्चे कार्यकर्ते आहेत. थरमॅक्स कामगार संघटनेमध्ये उपाध्यक्ष सरचिटणीस व सलग पाच वेळा त्यांनी अध्यक्षपद भूषविले आहे. अध्यक्षपदी राहून त्यांनी कामगारांचे प्रश्न सोडविले आहेत. तसेच आयएलओ स्वित्झर्लंड येथे भारताच्या वतीने प्रतिनिधीत्व करण्याचा बहुमान त्यांना मिळालेला आहे. वर्ल्ड कॉन्फरन्स, अशियाई कॉन्फरन्स भारत देशाच्या वतीने कामगार प्रतिनिधी म्हणून त्यांनी जर्मनी, इटली, जपान, सिंगापूर, थायलंड, मलेशिया, श्रीलंका, फ्रान्स, स्विडन अशा ३६ देशामध्ये त्यांनी भारताच्या कामगार संघटनेच नेतृत्व केलेले आहे आणि हजारो नागरीकांना वेतनवाढ करार दिलेले आहेत. तसेच देशातील पहिली आयएसओ निर्मिती ही त्यांच्या काळामध्ये झालेली आहे. आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरीय असे ३१ पुरस्कार मा.केशव घोळवे यांना मिळालेले आहेत. त्यांचा आज आपल्या महानगरपालिकेतर्फे स्वागत व सत्कार व्हावा, हि विनंती.

**मा.भाऊसाहेब भोईर** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह या प्रस्तावाला अनुमोदन देत असताना मी देखील सत्काराच्या निमित्ताने माझ्या भावना व्यक्त

,

करीत आहे. खरतर सदाशिव खाडे हे दुस-या पक्षामध्ये असून देखील आमचे अत्यंत जवळचे मित्र आणि बंधू आहेत. खरतर एवढा उशीर का झाला. कारण का मी सुरुवातीलाच त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्या झाल्या याठिकाणी सभागृहामध्ये सन्मानाने बोलावून त्यांचा सन्मान करावा, अशी पहिली मागणी मीच केलेली होती. त्याचे कारण सदाशिव खाडे हे भारतीय जनता पक्षाचे काम करीत असताना विदयार्थी दशेतून राजकीय जीवनामध्ये पदार्पण केल्यानंतर एखादया व्यक्तीकडे पाहिल्यानंतर तो कोणत्या पदावर आहे हे त्याच्या वेशभूषेहून कळते. पण सदाशिव खाडेंच्या कर्तत्वाच्या माध्यमातून किंवा काम करण्याच्या पध्दतीमुळे अजात शत्रुत्व असलेले हे व्यक्तीमत्व व्यक्तींच्या भेटण्याने सुध्दा कळायचं की ही व्यक्ती कोणत्या पक्षाची आहे. काही व्यक्तींना पदाने प्रतिष्ठा मिळते. काही लोकांना पद निर्माण केल्यानंतर प्रतिष्ठा मिळते. पद निर्माण करुन शहरामध्ये प्रतिष्ठा प्राप्त केलेले सदाशिव खाडे असे हे व्यक्तीमत्व आहे. पदे कशी मिळतात राजकारणामध्ये. पदासाठी काय करावे लागते. किती वाट पहावी लागते. खरं आमची आणि त्यांची अवस्था एकच होती. परंतु एकनाथ पवारांनी जास्त मनावर घेतले म्हणून त्यांना लवकर सगळयांनी मिळून संधी दिली. त्यामुळे एकनाथ पवारांचे देखील मी अभिनंदन करतो. मा. लक्ष्मणभाऊ जगताप यांचे देखील मी अभिनंदन करतो आणि मा. महेश्दादा लांडगे यांचे देखील मी अभिनंदन करतो. आता तुम्ही प्रत्येक वेळेला बोलताना माग काय झालं, माग काय झालं. ते आमच्याकडे होते त्यावेळेस त्यांनी काय केल असेल, आता जे काय होतंय ते आमच्या मुळे होतेय अशातला काही प्रकार नाही. परंतु जे काय चाललं होते ते व्यवस्थित चाललंय. तुम्ही फक्त पहायची भूमिका घ्या. सदाशिव खाडे हे अध्यक्ष झाल्यामुळे निश्चित पणे आता आपल्याला काय काम करुन घेता येईल यावर आपण विचारमंथन करु. कारण का की कशा पध्दतीने काम केल्यानंतर खरतर मी एकदा आयुक्तांना बोललो होतो की सर्व सुविधा कारण तो ठराव मी २००१ साली पास केला होता. प्राधिकरण हद्दीमध्ये महानगरपालिकेच्या सर्व सुविधा उपलब्ध करण्यासाठी जी सारखी सारखी एनओसी लागते ती एकदाच एनओसी घेऊन टाकलेली होती. आता ते प्रोसेंडीगमध्ये बघतील मी जो ठराव पास केला होता तो. परंतु नेहमी अनधिकृत बांधकाम चालू असताना आयुक्तांचे मत पडत की आपली हद्द नाही. पण सुविधा सगळया आपण देतो. आणि अनधिकृत बांधकामे ही अगदी जोमाने चालू आहेत. ही शहरामध्ये दोन संस्थामधली सापत्रिक भावना निर्माण झालेली आहे ती दूर करण्यासाठी मधले दुवा म्हणून सदाशिव खाडे अत्यंत उपयुक्त अध्यक्ष म्हणून आहेत. अनेक गोष्टी आहेत. देणी आपण लागतोय तसे घेणी

,

पण लागतोय. आणि म्हणून आयुक्तसाहेब समन्वय साधा, कारण का की कधी ना कधी तरी तो भाग डिलीट केला जाईल. याठिकाणी अनधिकृत बांधकामांची संख्या जास्त आहे. विकास महानगरपालिकेने केलेला आहे. त्याचे कुठेतरी आता सदाशिव खाडेंना घेऊन तुम्ही विचार विनियम करुन ताबडतोब निर्णय घ्या. प्राधिकरण हद्दीमध्ये त्यांना कशाला हद्दीमध्ये ठेवता मग. सगळी सुविधा जर आपण उपलब्ध करुन देत असतील आणि अनधिकृत बांधकामे जर जोमाने चालू असतील. आपल्या सगळया सुखसोयींवर जर ताण पडत असेल तर एकदाच विषय त्यांना बरोबर घेऊन संपुष्टात आणा. सदाशिव खाडे आपल्याला खूप प्रतिक्षा करावी लागली या पदासाठी. आपण खूप कष्ट केले. कष्ट करणारा कार्यकर्ता म्हणून अर्थात त्याच तुम्ही कधी भांडवलही केलेलं नाही. अनेक लोकांना तुम्ही पार्टीमध्ये घेतले. पार्टीमध्ये घेऊन सर्वांनी संमती दिली. तुमच्यामध्ये राष्ट्रिय पक्ष काय असतो ते पंचवीस वर्षे मलाही माहिती आहे. या सर्व नेत्यांचा समन्वय साधून कोणताही गट जरी असला तरी तटामध्ये न जाता तंटयामध्ये न जाता आपण गट आपला अबाधीत ठेऊन भारतीय जनता पक्षाची प्रतिमा म्हणून आपल्याकडे पाहिले जाते. म्हणून मी राष्ट्रवादी कॉंग्रेच्या वतीने आपले मनापासून अभिनंदन करतो. आणि आम्ही आल्यानंतर व्यक्तीगत म्हणून नाही पण आम्ही आल्यानंतर आमचही प्राधिकरणामधले काम करीत जा, चुकीचे नाही. नाहीतर तुमच्यावर बरेच जण टपून बसलेत हे लक्षात ठेवा. म्हणजे तुमच्यातली लोक नाही म्हणत हा बाहेरची लोक म्हणतोय. म्हणून त्यामुळे तुम्ही समजून घ्या. चांगला काम करा. किती वर्ष मिळाले यापेक्षा मिळालेल्या संधीचं सोन करण्याची क्षमता तुमच्यामध्ये आहे. कारण का तर तुम्ही अबोल आहात. अजात शत्रू तर निश्चित आहेत. आमच्यासारखे मित्र तुमचे आहेत. त्यामुळे तुम्ही काळजी करु नका. आयुक्त साहेब सगळयाचेच ऐकण्याची मनस्थिती त्यांनी ठेवलेली आहे त्यामुळे तेही तुमचे ऐकतील. ते कधीच कोणाला दुखावणार नाहीत. अशी ते शपथ घेऊनच आलेले आहेत. त्यामुळे ते सुध्दा चांगल्या पध्दतीने काम करतील, दिशा देतील. आणि भविष्यातील वाटचालीमध्ये जे काही प्रश्न असतील मा. महापौर मी तुम्हाला विनंती करतो की सभागृहाच्या वतीने प्राधिकरण हद्दीचा जो वाद चालू आहे या सुविधा आपण देत असताना ज्यावर नियंत्रण आपले नाही त्यावर अंकुश ठेवण्याचे काम देखील भविष्यामध्ये दोन्ही संस्थांनी मिळून एकत्रितरित्या करावे. सदाशिव खाडे आपल्याला पद मिळणे, पहिला ठराव मीच मांडला होता. आता अनुमोदन देण्याची संधी मिळाली. ठराव मांडण्याची लीगली संधी त्यांनी घेतली. परंतु आम्हाला सर्वांनाच आनंद तेवढा आहे. आपल्याला भविष्य काळासाठी

,

सुयश चिंतीतो. चांगले आरोग्य आपल्याला लाभो. आणि आपल्याला चांगली याठिकाणी भविष्यामध्ये पुन्हा संधी देण्याच्या दृष्टिकोनातून असं काम कराव की आपल्याला पुन्हा एकदा परत संधी मिळेल अशा पध्दतीच्या भावना व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**मा.सचिन चिखले** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह. खरतर आताच भाऊसाहेबांनी जो विषय मांडला आणि सभागृहासमोर आपले सर्वांचेच आदरनीय सदाशिव खाडे आज याठिकाणी उपस्थित आहेत. खूप आनंदाची गोष्ट आहे. गेली १५ वर्षापासून प्राधिकरणामधले हे पद रिक्त होते. आणि प्राधिकरणामधले जे रहिवासी असतील त्यांच्या खूप महत्वाच्या अडीअडचणीपासून ते वंचित होते. आणि प्रशासनाकडे गेल्यानंतर सुध्दा प्रशासन व्यवस्थितपणे नागरीकांना उत्तरे देत नव्हते. आणि त्यामधील दुवा आज खाडेसाहेबांच्यामार्फत आपल्या सर्वांना भेटलेला आहे. भाऊसाहेबांनी एक चांगली सुचना आज आपल्यासमोर मांडली आहे. की प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये जी असणारी घरे आहेत. ज्यांच्या सुविधा आपण पुरवितो म्हणजे लाईट असेल, रस्ता असेल, पाणी असेल सगळया सुविधा आपण पुरवितो. त्या सर्व घरांचे त्या सर्व भूमीचे आपल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये वर्गीकरण व्हावे अशी आमची मागणी आहे की जेणेकरुन त्याचे नियंत्रण पूर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे असेल. आणि येणा-या दिवसांमध्ये आपली वाटचाल खूप चांगल्या पध्दतीची जाओ अशी मी माझ्या वतीने, महाराष्ट्र नवनिर्माण सेना पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मी आपणांस खूप खूप शुभेच्छा देतो आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह. आज आपल्या सभेसमोर पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. सदाशिव खाडे सर यांचा आज इथं आपल्या सर्वांच्या वतीने सन्मान केला जातोय. सरांच्या बद्दल याठिकाणी बोलायचं झाले तर गेल्या अनेक वर्षापासून पिंपरी चिंचवड शहरामध्ये भारतीय जनता पार्टीचे संघटन वाढविण्याचे काम खाडे सरांच्या माध्यमामधून झाले आहे. डी वाय पाटील कॉलेज आकुर्डी येथे काम करीत असताना आपल्या मित्रमंडळीच्या बरोबर या शहरामध्ये भारतीय जनता पार्टीचे काम गेल्या पंचवीस वर्षापासून याठिकाणी खाडे सरांच्या माध्यमातून झालं. गेल्या वीस वर्षापासून मी सुध्दा खाडे सरांबरोबर भारतीय जनता पार्टीचे काम याठिकाणी करतो. मध्यंतरीच्या काळामध्ये युतीचे शासन असताना खाडे सरांना नियोजन मंडळाचे सदस्य त्याठिकाणी केले गेले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे

,

वृक्षप्राधिकरणाचे सदस्य ते राहिलेले आहेत. भारतीय जनता पार्टीच्या संघटनेमध्ये दोन वेळा सरचिटणीस आणि भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष त्यांच्या काळामध्ये याठिकाणी मागच्या निवडणूका, विधानसभा आणि लोकसभाच्या निवडणुका सर्व कार्यकर्त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने पार पाडल्या आणि राज्यामध्ये आणि केंद्रामध्ये सर ज्या वेळेला अध्यक्ष होते त्या वेळेला दोन्ही विधानसभा आणि लोकसभेमध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार आले. खर म्हणजे खाडे सरांच्या बद्दल बोलायचे असेल तर आम्ही बघितलं की अतिशय मितभाषीय आणि कठोर भूमिका कदाचित संघटनेसाठी एखादया वेळेला आपली भूमिका मांडत असताना समोरच्याला काय वाटेल परंतु संघटना डोळयासमोर ठेवून पार्टीचे हित डोळयासमोर ठेवून कार्यकर्त्यांचे कुठल्याही प्रकारे मन न दुखावता सांभाळून घेण्याचे काम गेल्या वीस-पंचवीस वर्षामध्ये खाडेसरांच्या माध्यमातून झाले. आणि मला वाटतं की डी वाय पाटील कॉलेजमध्ये काम करणारा एक प्राध्यापक त्यांना भारतीय जनता पार्टीने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपद दिले. मला असं वाटतं की योग्य व्यक्तीलां योग्य संधी याठिकाणी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून मिळाली आहे. सर्वसामान्य कुठल्याही फळाची अपेक्षा न करता गेल्या पंचवीस वर्षापासून सातत्याने खाडेसरांनी या शहरामध्ये संघटन वाढविले. कार्यकर्त्यांना जोडण्याचे काम त्यांनी याठिकाणी केलेले आहे. आणि भाऊसाहेबांनी सांगितलं की पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण असेल किंवा पिंपरी चिंचवड महानगरपालिका असेल. अनेक वेळेला सामान्य माणूस कामाच्या माध्यमातून त्याठिकाणी जातो. या पिंपरी चिंचवडच्या विकासामध्ये जसे महानगरपालिकेचे मोठे आपले काम आहे. परंतु आजूबाजूचा परिसर जर बघितला प्राधिकरणाच्या माध्यमातून विकसित झालेल्या पेठा आहेत. त्याचं जर का समन्वय चांगल्या पध्दतीने करण्याचे काम याठिकाणी खाडेसरांच्या माध्यमातून होईल. आमचे जे काही विषय असतील खर म्हणजे या शहरामध्ये अनधिकृत घरांचा विषय सरांच्या माध्यमातून मागच्या बैठकीमध्ये देखील तो मांडला. जे काही सातबा-यावरती नावे असतील प्राधिकरणाच्या माध्यमातून जे काही घरे बांधलेली असतील. याठिकाणी तो विषय सुध्दा सर थोडे दिवसातंच सोडविणार आहेत. म्हणजे सरांच्या माध्यमातून महानगरपालिका आणि नवनगर विकास प्राधिकरणाचा दुवा येणा-या काळामध्ये सरांच्या माध्यमातून मोठे काम या शहरामध्ये आपल्या महानगरपालिकेला हातभार लावण्याचे काम सरांच्या माध्यमातून होईल. नागरीकांच्या समस्या प्राधिकरणामध्ये बाधित शेतक-यांच्या किंवा अनधिकृत घरांच्या समस्यांसाठी सुध्दा किंवा आमच्या सारख्या वॉर्डामध्ये काही

,

नियोजन करीत असताना कुठलेही डीपी रस्ते असतील त्याठिकाणी आरक्षण नसेल त्याठिकाणी मागच्या वेळेस खाडेसरांनी आमच्या वाल्हेकरवाडीच्या प्रभागामध्ये १७ प्रभाग क्रमांकामध्ये  शाळा नव्हती. सरांच्या माध्यमातून त्याठिकाणी भूखंड दिला. गार्डनसाठी सुध्दा भूखंड प्राधिकरणाच्या माध्यमातून सरांनी पुढाकार घेऊन दिला. असे अनेक विषय आहेत ते सरांच्या माध्यमातून येणा-या काळामध्ये आमच्या नागरीकांना त्याचा फायदा होईल अशी याठिकाणी मला अशा वाटते. आणि आजचा जो सत्कार याठिकाणी सरांचा केलेला आहे. त्या सरांच्या सत्काराच्या माध्यमातून सर नक्की आपल्या सत्काराचे चीज या पिंपरी चिंचवडच्या विकासामध्ये करतील प्राधिकरणाच्या माध्यमातील मला याविषयी शंका नाही. त्यांचे मी याठिकाणी अभिनंदन करतो. आणि आपले नगरसदस्य मा.केशव घोळवे यांची जी काय महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाच्या सदस्यपदी निवड झालेली आहे त्याचा परिचय करुन देत असताना त्यांनी सांगितलं. किमान वेतन आज आपण जे बघतोय. किमान वेतनाच्या माध्यमातून सर्व सामान्य संघटीत कामगारांच्या काय दशा आहेत. आणि या सर्व गोष्टींचा त्यांचा जो काही अनुभव आहे. अनेक देशांमध्ये जाऊन असंघटीत कामगारांच्या संदर्भामध्ये किंवा किमान वेतनाच्या संदर्भामध्ये सातत्याने भूमिका मांडणारे केशवजी घोळवे यांना राज्य शासनाच्या सल्लागार मंडळामध्ये सदस्यपदी घेतल्याबद्दल मला वाटतं संघटीत कामगारांचा विषय मोठया प्रमाणावर त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी केशवराव घोळवे या कामगार क्षेत्रामध्ये पिंपरी चिंचवड शहरामध्ये अतिशय उल्लेखनीय काम करतात त्यांचा सुध्दा याठिकाणी सन्मान होतोय. मी आदरनीय केशव घोळवे कामगार नेते आपल्या तमाम सर्व कामगारांच्या वतीने पिंपरी चिंचवडमध्ये त्यांचे याठिकाणी अभिनंदन करतो. त्यांना शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**मा. बाबु उर्फ प्रेमकुमार नायर** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज सभागृहाच्या वतीने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. सदाशिव खाडे साहेब यांचा आपण सर्वजण सत्कार करणार आहोत. मला वाटतं की चौदा वर्षाचा वनवास संपलेला आहे प्राधिकरणाचा. सभागृहाच्या वतीने मी खास मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी तसेच पालकमंत्री गिरीष बापटजी, चंद्रकांत दादा पाटील, पंकजाताई मुंडे, स्थानिक दोन्ही आमदार जे आहेत. लक्ष्मणभाऊ जगताप आणि महेशदादा लांडगे, अमरजी साबळे, सचिन पटवर्धन, आणि भारतीय जनता पार्टीचे सर्व नेते एकनाथ

,

पवार या सर्वांनी हातभार लावून महत्वाचा निर्णय प्राधिकरणाच्या संदर्भात झालेला आहे. आणि याच्यातूनही महत्वाचा भाग म्हणजे मुख्यमंत्र्यांनी सर्व नागरीकांना पण दिलेले आहेत की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ज्या पध्दतीने विकास भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून होणार आहे. त्याच पध्दतीने प्राधिकरणाचा देखील विकास होणार आहे. आणि खाडेसरांसारखा प्रामाणिक आणि सच्चा एकनिष्ठावंत भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्याला प्राधिकरणाचे अध्यक्ष करुन नवीन त्या भागाचा विकास करण्याचा त्यांनी मनोदय या माध्यमातून व्यक्त केलेला आहे. मी सभागृहाच्या वतीने त्यांना हार्दीक शुभेच्छा देतो पुढच्या कार्यासाठी, धन्यवाद.

**मा. राहुल कलाटे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह. आज याठिकाणी मा.सदाभाऊ खाडे यांना प्राधिकरणाचे अध्यक्ष पद मिळाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने त्यांचा सन्मान करणेत येत आहे. मा. केशवजी घोळवे यांचा देखील सन्मान आपण सभागृहाच्या वतीने करीत आहोत. मी प्रथमत: माझ्या पक्षाच्या वतीने मा. सदाभाऊंचे व केशवराव यांचे अभिनंदन करतो. आणि आपण आताच सांगितले की १४ वर्षांचा जो प्राधिकरणाचा जो वनवास होता. म्हणजे रामानंतर मला वाटत की सदाभाऊंनी वनवास काढला की काय. आज पीएमआरडीएमध्ये विलीनीकरणाचा घाट या प्राधिकरणाचा घातला गेला होता. सदाभाऊ आम्ही सर्वांनी पोटतीडकीने त्याला विरोध केला होता, त्याच्यावर मतदान घेतल. मला वाटतं की कदाचित आपल्या नशिबात होते त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तो विषय बाजूला ठेवला. तीस वर्षे पक्षाचे काम केल्यानंतर असं वाटलं होतं की सदाभाऊंचं काय होणार. परंतु पक्षाने ताईंनी त्यांना जो न्याय दिला. हा न्याय देत असताना एकच अपेक्षा आहे. बेसीकली प्राधिकरणाचे घर आणि या शहराचा सुनियोजित विकास करणेत आला होता परंतु या मधल्या काळामध्ये आपणच आश्वासने देखील दिलेली आहेत. तरी आपण आपल्या माध्यमातून काम करीत असताना त्या प्राधिकरणाचे आधीचे बरेच प्रश्न आहेत. घरांचे रेग्युलायजेशन असेल, रिंग रोड असेल, त्यानंतर साडेबारा टक्केचे विषय असतील. मी सुध्दा साडेबारा टक्केचा बाधीत शेतकरी असताना मला वाटतं की प्राधिकरणाचा परतावा घेऊन आपण सुरुवात केली होती. अशा प्राधिकरणाच्या माध्यमातून जो दलालांचा, बिल्डरांचा सुळसुळाट झालाय त्याच्यावर अंकुश ठेवण्याचे काम भविष्यामध्ये डी वाय पाटील सारख्या संस्थेमध्ये नावाजलेल्या सदाभाऊंनी करावे. अशी मी सभागृहाच्या वतीने त्यांच्याकडून अपेक्षा

,

व्यक्त करतो. त्यांचे अभिनंदन करतो आणि केशवजीचे देखील आज कामगारांच्या क्षेत्रामध्ये मोठे काम असल्याने त्यांनी देखील या शहरातील कामगारांचे प्रश्न सोडवावेत. अशी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा एकदा अभिनंदन करतो, धन्यवाद.

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह गेल्या तीस वर्षापासून ज्यांच्या नेतृत्वाखाली ज्यांच्या सोबत काम केले, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहोत असे आमचे सर्वांचेच नेते सदाशिवराव खाडे यांची पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी निवड झाली. ख-या अर्थाने अत्यंत साधी राहनीमान असलेले परंतु स्पष्टवक्तेपणा, परखड आणि संघटनेच प्रचंड ज्ञान असलेले खाडेसर यांचे मार्गदर्शन आमच्या सर्व कार्यकर्त्यांना वेळोवेळी लाभले आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त पक्ष संघटनेची जी सदस्य नोंदणी असते ती संपुर्ण महाराष्ट्रामध्ये क्रमांक एकची त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सर्वात जास्त पक्ष संघटनेच कार्य असेल केवळ खाडे सरांच्या नेतृत्वाखाली झाले आहे. त्यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडले. आज आम्हाला खुप आनंद होतोय की खाडेसरांची या प्राधिकरणाचे अध्यक्षपदी नियुक्ती झालेली आहे. मी सर्व नगरसदस्यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

**मा.मंगला कदम -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह. आज आपण प्राधिकरणाचे अध्यक्षपदी ज्यांची निवड झाली असे ज्येष्ठ सदाशिवजी खाडे यांच्या सत्काराच्या निमित्ताने आपण बोलत आहोत. व माझे सहकारी केशवजी घोळवे यांची किमान वेतन सल्लागार मंडळाच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार आपण इथे करणार आहोत. खाडेसरांच्या बाबतीत बोलताना मी खरच सांगेन की माणूस ज्यावेळेला काम करत राहतो त्या माणसाला त्या पदाला किंवा त्या व्यक्तीला ज्यावेळेस न्याय मिळतो त्यांनी खरच खूप चांगलं काम खूप वर्षापासून केले. आणि पक्षाने त्याची दखल घेऊन तुम्हाला ह्या मोठया पदावर काम करण्याची संधी दिलेली आहे. मग तो कोणत्याही पक्षाचा असू दे. काम करणा-याला १०० टक्के चांगली संधी मिळत असते. ज्या वेळेला आपल्या नशिबात असते त्यावेळेलाच ती पदे मिळतात परंतु आपल्याला पद मिळाल्यानंतर आपण ज्या खुर्चीवर आहोत. मला असं वाटत नाही की तुम्ही माझ्या आधीपासून राजकारणामध्ये काम करताय. मी तुम्हाला सांगण्याइतकी सुध्दा मी मोठी नाहीय. असं मी स्वत:ला समजते. परंतु

,

ज्यावेळेला आपण त्या खुर्चीवर बसतो. या खुर्चीवर काम करताना नक्की तुम्ही या पिंपरी चिंचवडचा विचार करताल ही मी नागरीकांच्या वतीने तुमच्याकडे अपेक्षा व्यक्त करते. पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना खरच असं वाटलं पाहिजे की आपल्यातला माणूस ज्यावेळेला त्या खुर्चीवर बसतो तेव्हा तुम्ही कुठलही पक्षीय काम करणार आहे असं मला वाटत नाही. सगळया बरोबर आजपर्यंत तुम्ही काम केलेले आहे. मग सगळयांची कामे करणार ना आपल्या खुर्चीवर बसल्यानंतर. मनापासून माझ्या वतीने दोघांचेही कौतुक करते. केशवजी घोळवे सुध्दा माझ्या वॉर्डातलेच सहकारी आहेत. त्यांनी सुध्दा कामगारांच्या किमान वेतनासाठी सगळया कंपन्यामध्ये जे कामगार आहेत त्यांना किमान वेतन मिळत नाही. त्याच्यावरती सल्लागार म्हणून तुम्ही आहात. त्यांच्यासाठी चांगल्या पध्दतीने काम करा. पहिल्यांदा कार्पोरेशनपासून सुरुवात करा. अशा मी तुम्हाला शुभेच्छा देते. आणि खाडेसाहेब तुम्हाला देखील मनापासून, माझ्या कुटूंबाकडून पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी कॉ ग्रेसच्या वतीने, शहराच्या वतीने  शुभेच्छा देते, धन्यवाद.

**मा. योगिता नागरगोजे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह्व खरच आज अभिमानाची गोष्ट आहे की खाडेसरांची पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचा सभागृहाच्या वतीने सन्मान ठेवला आहे. तसेच आमचे छोटेबंधु केशवदादा घोळवे कामगार वेतन सल्लागार मंडळामध्ये सदस्यपदी निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचाही सन्मान होतोय. ही खूप आनंदाची गोष्ट आहे. दोघेही बंधु मीतभाषीय आणि कुशल संघटक म्हणून गेली कित्येक वर्षापासून काम करीत आहेत. आताच कोणीतरी म्हणले की मुंढे साहेब गेल्यानंतर खाडे साहेबांचे काय. पण मुंढे साहेबांच्या विचारावरती आमचे खाडेदादा काम करतात त्याच्यामुळे आयुष्यामध्ये त्यांना कुठेही काही कमी पडणार नाही. तर दादा तुमच्या दोघांचेही मी खूप खूप अभिनंदन करते. आणि तुम्हाला दिर्घआयुष्य लाभो तुमच्याकडून चांगली कार्ये घडोत अशी मी प्रार्थना करते, धन्यवाद.

**मा. झामाताई बारणे -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज याठिकाणी या सभागृहाच्या वतीने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपदी सदाशिवराव खाडे यांची निवड झालेली आहे त्याचप्रमाणे आज याठिकाणी केशवराव घोळवे खरोखर एक चांगल्या व्यक्तीची याठिकाणी निवड झालेली आहे. आणि आपल्या पिंपरी चिंचवड शहरामधून एक तुमच्याकडे चांगल्या पध्दतीने लोक पहात असतात. कारण

,

प्राधिकरणाचा विषय आपल्या सगळयांनाच माहिती आहे. पिंपरी चिंचवड एरियामध्ये अनेक भागामध्ये प्राधिकरणाच्या अडचणी आहेत. मग चिंचवड असेल, थेरगाव असेल, वाकड असेल, काळेवाडीचा काही भाग असेल. अशा एरियामध्ये जो काही प्राधिकरणाचा अडचणींचा भाग आहे. त्या अडचणींच्या भागाकडे आपण लक्ष दयावे. कारण १९९२ साली मी पहिल्यांदा निवडून आले. त्यावेळेस प्राधिकरणाचा भाग हा बहुतेक माझा वॉर्ड हा प्राधिकरणामध्येच होता. परंतु त्यावेळेस श्रीनिवास पाटील हे माजी खासदार साहेब हे आयुक्त पण होते आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष पण होते. पण लोकांना सुविधा तर दयायच्या कारण नागरीकांना सुविधा दिल्याच पाहिजेत. अशा पध्दतीने एक ठराव मांडलेला होता. आणि त्याच ठरावानुसार प्राधिकरणाची एनओसी घेऊन ज्या नागरीकांच्या मुलभूत सुविधा होत्या. मग पाणी असेल, लाईट असेल, रस्ते असतील. त्या नागरी सुविधा इकडे आयुक्त आणि तिकडे अध्यक्ष दोन्हीच्या याच्यामध्ये कारण पाटील साहेबांना अधिकार होते म्हणून त्या पध्दतीने थेरगांव भागामध्ये अशी कामे झालेली आहेत. मी खाडे साहेब आपल्याला पण विनंती करते की जो अडचणीचा भाग आहे. ज्या ठिकाणी प्राधिकरणाची अडचण आहे ती आपण दूर कराल अशी मला पण अपेक्षा आहे. याठिकाणी अनेक जणांनी भावना व्यक्त करताना मला वाटत की ब-याचशा वॉर्डामध्ये अडचणी आहेत त्या आपण निश्चित लक्ष देऊन प्राधिकरणाच्या विषयावरती थोडंस आपल बारीक लक्ष असावं. आणि लोकांच्या सुविधांना आपण प्राधान्य दयावे एवढीच मी याठिकाणी आपल्याला विनंती करते. आणि आपले सर्वांचे माझ्या थेरगावातील नागरीकांच्या वतीने तुम्हाला दोघांना पण खूप खूप शुभेच्छा व्यक्त करते.

**मा. सुजाता पालांडे** – सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आणि आजचे उत्सवमूर्ती सदाशिवजी खाडेसर. आज खरोखर माझ्या प्रभाग क्रमांक २० चा सर्वोच्च आनंदाचा क्षण आहे आजचा. की राज्यमंत्रीचा दर्जा मिळालेले व्यक्तीमत्व आज आमच्या वॉर्डामध्ये आहे. सदाशिवजी खाडे यांना मी जवळ जवळ २४ वर्षापासून ओळखते. त्या २४ वर्षामध्ये त्यांनी फक्त पक्ष संघटना, पक्ष वाढविणे आणि मजबूतीकरण यासाठी त्यांनी खंबीरतेने काम केले. आणि एकनिष्ठ सहकारी म्हणूनच ते आतापर्यंत सगळयांना माहित आहेत. हे काम करीत असताना त्यांनी कधीही पक्ष सोडून कुठले काम केलेले नाही मला वाटतं एकनिष्ठता काय असते ही सदाशिवजी खाडे यांच्याकडूनच शिकावी. आणि त्याचेच एक फळ म्हणून की काय आज राज्यमंत्री पद आमच्या वॉर्डामध्ये आलंय. आज खरोखर

,

आम्हाला आमच्या प्रभाग क्रमांक २० च्या नागरीकांकडून तुमच्यासाठी आम्ही किती शब्दात बोलू तेवढे कमीच आहे. कारण आमच्या सर्वांचा मानबिंदू असणारे हे व्यक्तीमत्व हे आमचं आहे. आणि त्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत. प्रभाग क्रमांक २० मध्ये राज्यमंत्री पद आहे. त्यासाठी तुमचे कौतुकच सर्वजण म्हणतात की तुमच्या हातून हे कार्य व्हाव ते कार्य व्हाव पण मला खात्री आहे आमच्या २० प्रभाग क्रमांकाला खात्री आहे की आमच्यामधला माणूस चांगलेच काम करेल. आणि त्या चांगल्या कामाची पावती नक्कीच तुमच्याकडून आम्हाला मिळेल. एवढचं बोलत आणि इथंच थांबते. आणि आमचे केशवजी घोळवेसर यांना खरोखरच योगिता म्हणाली मीतभाषीय असलेले केशवजी घोळवे त्यांना मी गेल्या १०-१२ वर्षांनी ओळखते. आणि माझी मैत्रीण शैलजामुळे त्यांची माझी पहिली ओळख झाली. मी केशवभाऊना नेहमी म्हणते की केशव तुझी वाक्यरचना, तुझा स्पष्टवक्तेपणा, तुझी अभ्यास करण्याची पध्दत आणि मांडण्याची पध्दत ही अतिशय सुंदर आहे आणि त्याचा उपयोग या सभागृहाला झाला पाहिजे पण केशवभाऊ आता याच्यापुढे हा उपयोग कामगारांना होईल आणि कामगाराना होणं म्हणजेच आम्हांला होईल एवढंच बोलते आणि तुम्हाला दोघांनाही मनापासून शुभेच्छा देते आणि थांबते.

**मा आशा धायगुडे-शेंडगे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज आमचे ज्येष्ठ बंधू सन्मा. खाडेसर यांची प्राधिकरणाचे अध्यक्षपदी निवड झाली. त्यांना आज मनापासून माझ्या कुटूंबियाच्या वतीने माझ्या वतीने एक छोटी बहीण म्हणून मनापासून तुमचं या ठिकाणी अभिनंदन करते. खाडेसर हे सामान्य व्यक्तीमत्व आहे हे सगळयांनी सांगितलच. अगदी त्याच पध्दतीने मी मागील १० ते १५ वर्षापासून खाडेसरांना ओळखते. अत्यंत मीतभाषीय अगदी त्यांना कोणीही ओरडून बोललं तरी अत्यंत संयमाने उत्तर देणारे व्यक्तीमत्व म्हणून खाडेसरांची ओळख आहे. आणि असे खाडेसर निश्चितच प्राधिकरणामध्ये चांगल्या प्रकारे काम करतील. आणि खाडेसर सामान्य कुटूंबातून आल्यानंतर आज एक चांगले उच्च पदापर्यंत आपण एकनिष्ठेतेमुळे गेला आहात. नक्कीच तुम्ही सगळया सामान्य कार्यकर्त्यांची दखल घ्याल. आणि तुमच्याकडून चांगल्या प्रकारचे काम शहराचा विकास होईल अशी अपेक्षा तुमच्याकडून व्यक्त करते. पुनश्च: एकदा तुमचे अभिनंदन करुन थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

,

**मा.सिमा सावळे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज याठिकाणी गेली २०-२२ वर्षे युतीमध्ये असताना आणि गेल्या पाच वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष म्हणून ज्यांना मी पाहिले असे आमचे बंधु प्रा. सदाशिवजी खाडे यांची महाराष्ट्र शासनाने, मा. मुख्यमंत्र्यांनी आणि मा. पंकजाताई मुंडे यांनी प्राधिकरणावर नियुक्ती केली आणि प्राधिकरणाचा वनवास संपविला. वनवास कधी संपला हे आपल्या सर्वांनाच माहिती आहे आणि कोणी संपविला तोही माहिती आहे. मी खाडेसरांकडे एकच विनंती करेन की आमचा प्रभाग क्रमांक ८ हा तीनचार झोपडपट्टया सोडल्या तर संपुर्ण प्राधिकरणाच्या अखत्यारीतला आहे. आणि मा.लक्ष्मणभाऊ जगताप साहेब असतील मा. कमिशनर साहेब असतील यांनी प्राधिकरणाच्या अंतर्गत येणा-या सर्व आरक्षणांना प्राधिकरणाने विकसित करावे. असं मी स्वत: स्टँडींग चेअरमन असताना घेतलेला धोरणात्मक निर्णय. मी त्या धोरणाचा आणि निर्णयाचा मनापासून आदर करते कारण त्या ठिकाणी ऍथारिटी जी आहे ती प्राधिकरणाची आहे. त्या भागातील जे लोक आहेत ती आपल्या शहराचे नागरीक आहेत. त्यांच्याकरीता त्याठिकाणी विकास कामे आपण केली पाहिजेत. म्हणून आपल्याकडे निश्चितपणे लहान बहीण म्हणून मी आग्रह धरेन आणि मला माहिती आहे की तुम्ही पण माझा आग्रह मान्य कराल. मला माहिती आहे की तुम्ही नाही म्हणणार नाहीत. एवढे मोठे पद मंत्रीपदाचा दर्जा तुम्हाला मिळाला आहे. तुमच्यातल्या कार्यकर्त्याला याठिकाणी मनापासून सलाम करते. आणि ज्या ज्या नेत्यांनी मा.पंकजाताई असतील, मा मुख्यमंत्रीसाहेब असतील, आपल्या याठिकाणचे स्थानिक नेते सचिनजी पटवर्धन असतील. या सगळयांच्या प्रयत्नांना आलेले यश आणि या यशाची फलश्रुती म्हणून आपली झालेली नियुक्ती. आपल्या नियुक्तीला खूप खूप शुभेच्छा देते. आपण चांगलं कराल यामध्ये माझ्या मनामध्ये अजिबात शंकाच नाही. परत एकदा आपल्याला शुभेच्छा देते त्याचबरोबर किमान वेतन आयोग सल्लागार म्हणून आमचे लहान बंधू केशव घोळवेंची याठिकाणी नियुक्ती झाली आहे. कमी वेळात चांगलं चांगल काम करणे आणि कमी शब्दात आपली भावना व्यक्त कशी करायची हे केशवकडून शिकले पाहिजे. केशवला सुध्दा मनापासून खूप खूप शुभेच्छा. खाडेसर आपण पुन्हा मनापासून सुयश चिंतीते. आपली कारकीर्द चांगली जोरात होऊन जाऊ दे. ज्या दिवशी आपण अध्यक्ष म्हणून त्याठिकाणी बसलात. खूप लोकांनी मला सांगितलं अगदी प्राधिकरणामधल्या अधिका-यांनी मला सांगितलं की ताई तीनच महिने. मी म्हणलं का पुढे काय होणार आहे, नाही पीएमआरडीए मध्ये विलीन होणार आहे. मी सांगितलं की आम्ही जर

,

अध्यक्ष नेमला असेल तर किमान आम्हाला त्याची पार्श्वभूमी काय असते ते आम्हाला माहिती असते. इतकही आम्हांला गृहीत धरु नका आणि तीन महिने वगैरे काही नाही आम्ही आमचा कार्यकाल पूर्ण करणार आहोत. तुम्ही काही काळजी करु नका. चांगल काम होणार आहे. साडेबारा टक्केचा शेतक-यांच्या जमिनीचा मोबदला दयायचा राहिलेला आहे. त्याकडे आपण लक्ष दयावे. त्याचबरोबर इंद्रायणीनगर व यमुनानगर भागातील जी काय आता आपण ट्रान्सफरचा जो विषय होता तो आपण खूप चांगल्या पध्दतीने मार्गी लावलेला आहे. त्याबद्दल सुध्दा आपलं याठिकाणी मनापासून अभिनंदन करते. परत एकदा सुयश चिंतीते, थांबते. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.नितीन (आप्पा) काळजे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज आपण प्राधिकरणाचे अध्यक्षपदी सदाशिव खाडे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करीत आहोत. मी त्यांना शुभेच्छा देतो आणि खाडेसरांच्या बाबतीत बोलायचं जर म्हणलं तर मी लहानपासूनच ऐकत होतो की पिंपरी चिंचवड शहरामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने भारतीय जनता पार्टीचे ते जेष्ठ कार्यकर्ते म्हणून काम करतात. त्यांच्याबरोबर आमच्या गावातील सुध्दा काही व्यक्ती होत्या. त्यामुळे कायम सरांच्या बाबतीत अतिशय चांगल्या प्रकारचे ऐकत होतो. परंतु मी महापालिकेत आल्यानंतर मला खूप दिवस माहीत नव्हते की ते डी वाय पाटीलमध्ये सर म्हणून पण आहेत. परंतु त्यांनी अतिशय आपल्या कामामध्ये चांगल्या प्रकारे ठसा उमटवून प्राधिकरणाचे अध्यक्षपद त्यांना मिळालेले आहे. त्यांना माझी विनंती आहे. जे प्राधिकरण आपल्या आकुर्डी असेल, पिंपरी असेल, निगडी असेल, चिखली सर्व गावांच्या शेतक-यांच्या जिवावर खर तर ते उभे राहिलेले प्राधिकरण आहे. कारण की गरीब शेतक-यांच्या जमिनी एकत्रीत करुन प्राधिकरण उभे राहिलेले आहे. तरी माझी आपणांस विनंती आहे की शेतकरी साडेबारा टक्क्यांसाठी जवळ जवळ २५-३० वर्षे झाले ते खूप भांडत आहेत. त्यामध्ये काही शेतकरी इतके गरीब होते की आज त्यांची खूप हलाखीची परिस्थिती आहे. चांगले शेतकरी पण आहेत प्रमोद सारखे. तरी पण सरांना माझी अशी विनंती आहे की यासाठी आपण काही तरी निश्चित मार्ग काढावा. मा.मुख्यमंत्र्यांच्या आणि स्थानिक नेत्यांच्या मदतीने त्यांचा प्रश्न मिटवावा अशी आपल्याला विनंती करतो. केशव घोळवे यांनाही शुभेच्छा देतो आणि थांबतो, जयहिंद जयमहाराष्ट्र.

,

**मा.अभिषेक बारणे -** सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज सदाशिव खाडे सरांचा याठिकाणी सत्कार सोहळा होत आहे. सरांनी ज्या वेळेस पदभार घेतला प्रभाग क्रमांक २३ आमच्या प्रभागामध्ये ७० ते ७५ टक्के घरे ही आरक्षणाने बाधित आहेत. त्यामुळे प्रभागातले आम्ही चारही नगरसेवक कैलास बारणे असतील, अर्चनाताई असतील. आम्ही चौघेजण सरांना जाऊन भेटलो. त्यावेळी सरांशी चर्चा केल्यानंतर एक ख-या अर्थाने तळागाळातल्या कार्यकर्त्याला ज्यावेळेस त्या पदावर बसल्यानंतर त्यांचे जे बोलणं असतं त्या पध्दतीत त्यांनी आम्हाला समजून सांगितले की आपल्या भागातील जेवढे दिड गुंठयातील दोन गुंठयातील घरे आहेत ती निश्चितपणे येणा-या काळामध्ये लक्ष्मणभाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली मा.मुख्यमंत्र्याच्या मदतीने ती सगळी बांधकामे आपण नियमित करु आणि हा त्यांनी जो दिलेला शब्द आहे हा आमच्यासाठी खूपच सुकर शब्द होता. आणि येणा-या काळामध्ये लवकरात लवकर आमच्या परिसरातील बांधकामे ही नियमित व्हावीत हीच इच्छा या प्रसंगी आपल्याकडून अपेक्षित करतो व पुनश्च: आपल्याला व केशव घोळवे सरांना शुभेच्छा व्यक्त करतो.

**मा.उत्तम केंदळे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खाडे सरांची प्राधिकरण अध्यक्षपदी निवड झाली त्या बद्दल सरांचे अभिनंदन. खरतर माझा निगडी-यमुनानगर प्रभाग हा प्राधिकरणाने व्यापलेला आहे. आणि अतिशय अडचणी आहेत. सिमाताईंनी सांगितले की ट्रान्सफर असेल किंवा रेड झोन असेल अनधिकृत बांधकामे असतील त्याचप्रमाणे साडेबारा टक्केचा प्रश्न १०५ शेतकरी आमच्या इथ बाधित आहेत अजून त्यांना १९७२ ते १९८४ च्या दरम्यानचा साडेबारा टक्क्यांचा परतावा मिळालेला नाही. परंतु सरांनी या कामांना ऑलरेडी आधीच सुरुवात केलेली आहे. लवकरात लवकर ते प्रश्न सुटतील अशी मी आमच्या निगडी प्राधिकरण यमुनानगरच्या वतीने अपेक्षा व्यक्त करतो. तसेच सरांना आणि केशवजी घोळवे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो आणि याठिकाणी थांबतो, धन्यवाद.

**मा. उषा ऊर्फ माई ढोरे -** सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खाडे साहेब म्हटले की ती मुर्ती सगळयांच्या डोळयासमोर उभी राहते. खरतर ते ३५ वर्षापासून पाहिले आहे. मंगलाताई आहेत, भाऊसाहेब भोईर आहेत. ते जेष्ठ आहेत त्यांना माहिती  आहेत ते महापालिकेमध्ये शिक्षणमंडळाचे सभापती होते. आणि तेव्हापासून म्हणजे

,

युवापासून ते अतिशय चांगल्या प्रकारे एक भाजपा कार्यकर्ता म्हणून त्यांचे नाव शहरामध्ये मध्ये सगळयांना माहीत आहे. आम्ही ज्यावेळी महापालिकेत आलो, मंगलाताई आम्ही, १९९२ साली त्यावेळेस सदाशिव खाडे हे एक वेगळे नेतृत्व म्हणून याठिकाणी आम्हाला त्यांचे नांव ऐकायला मिळाले. आणि तेव्हापासून काम करीत असताना पक्षाशी घट्ट राहून एका पक्षाला चिकाटीने साथ देऊन अतिशय चांगल्या प्रकारे आताच बाबू नायरने सांगितले की १४ वर्षाचा वनवास संपला. आणि त्याठिकाणी प्राधिकरणाच्या अध्यक्षांना न्याय मिळाला. प्राधिकरणामध्ये बरेच वर्षे झाले की जे काही प्रश्न होते ते आता ब-याच जणांनी सांगितले की माझा वॉर्ड प्राधिकरणाला लागून आहे. माझा वॉर्ड प्राधिकरणामध्ये आहे आम्हाला सुविधा मिळत नाहीत. महापालिकेकडून त्याठिकाणी सुविधा दिल्या जात नाहीत अशा वेगवेगळया प्रकारच्या त्याठिकाणी अडचणी येत असताना आपल्याच सभागृहामध्ये एक व्यक्ती अशी आहे की प्राधिकरणाचे अध्यक्ष झालेले आहेत खरतर खाडे साहेब आपला सत्कार नाही तर या सभागृहाने आपल्या कामाच्यातुन आपले सहकार्य कसे मिळेल या माध्यमातून आपआपल्या अडचणी मांडलेल्या आहेत. खरतर बरेच वर्षे पेंडींग पडलेले प्राधिकरणाचे प्रश्न हे आपल्या हातून सुटतील, न सुटण्यासारखे प्रश्न नाहीच आहेत. आणि त्यासाठी आजचा सत्कार हा तुमचा सत्कार नसून मला वाटतं की कामाचा बोजा तुम्ही आज सभागृहातून घेऊन जातायं. आणि तो बोजा कमी करण्यासाठी आपल्याला इतर सर्व नगरसेवकांची, ज्येष्ठांचा हा आर्शीवाद आपल्यासोबत रहावा हाच उद्देश ठेवून आपल्याला याठिकाणी निमंत्रित केले आहे. तुमचे अतिशय मनपूर्वक मी कौतुक करते. आणि केशव घोळवेंची सुध्दा किमान वेतन सल्लागारपदी निवड झालेली आहे. अतिशय युवा नेतृत्व आहे. दरवेळी बजेटमध्ये बोलत असताना मला सुध्दा त्यांचे कौतुक वाटते अतिशय चांगल्या प्रकारे त्यांची वाक्यरचना अतिशय परफेक्ट अशी वाक्यरचना करणारे केशव घोळवे आहेत. आणि या व्यक्तीला चांगल्याप्रकारे कामाची संधी मिळालेली आहे. तरी मी जास्त न बोलता खाडे सरांचे आणि केशव घोळवे यांचे मनापासून माझ्या वॉर्डाच्या वतीने माझ्या चारही नगरसेवकांच्या वतीने आपले मनपूर्वक अभिनंदन करते. तुमच्या या पुढील कामांना सुयश व्यक्त करते, आणि थांबते.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सरांच्या बद्दल बोलायचे जर म्हटलं तर सदाशिव या नावाप्रमाणेच ते सदा आहेत. खरोखर

,

सरांच्याकडे पाहिले की सतत हसतमुख असणारे सरांचे व्यक्तीमत्व. मी लहानपणापासून पाहतोय त्यांच्याकडून एक शिकवण मी घेतलेली आहे. तुम्हाला सांगतो की ज्यावेळेस एखादया समुद्रामध्ये एखादं जहाज बुडत असते आणि जहाजामध्ये समुद्रामध्ये वादळ सुटलेले असते. आणि जहाज ज्यावेळेस हालत असतं अशाही परिस्थितीमध्ये ते जहाज बुडत नसंत हलत असतं. अशाही परिस्थितीमध्ये त्या जहाजाचा खलाशी जहाज सोडत नाही. त्याप्रमाणे एकनिष्ठेने आम्ही लहानपणापासून पाहतोय सदाशिव खाडेसर पक्षामध्ये एकनिष्ठतेनी सामाऊन गेलेले आहेत त्यांनी सगळयांना सांभाळून घेतलेले आहे आणि या पिंपरी चिंचवड मध्ये त्यांनी भारतीय जनता पार्टीचे नाव सांभाळण्याचे काम केलेले आहे. आजपर्यंत खरोखर त्यांनी जाणून दिलेले आहे की आम्हाला त्यांच्यापासून हे शिक्षण मिळतयं. त्यांच्या बद्दल मी आज माझ्या प्रभागामध्ये प्राधिकरण एरिया येत असल्यामुळे मी सरांना विनंती करेन की पालिकेकडून सर्वच्या सर्व सुविधा पुरविल्या जात आहेत. परंतु पालिकेचा अधिकार  तीथपर्यंत पोहोचत नाहीत तरी सरांनी पहिल्यांदा जो एरिया पालिकेच्या हद्दीमध्ये येतोय तिथे डेव्हलपमेंट काही प्रमाणात राहिलेली आहे त्यासाठी सरांनी प्रयत्न करावेत. हेच मी तुम्हाला आज सांगू इच्छितो. बाकीच्या सर्वांनी सुचना त्याप्रमाणे दिलेल्या आहेत. मी तुम्हाला माझ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले गटाच्या वतीने अभिनंदन तर करतोच आणि शुभेच्छा ही देतो. त्याचबरोबर आमचे सहकारी मित्र केशवजी घोळवे यांची किमान वेतन सल्लागार पदी निवड झालेली आहे. त्यांचही अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो. त्याचबरोबर त्यांनाही सांगतो की मंगलाताईंनी सांगितले की सुरुवात तरी महानगरपालिकेच्या ठेकेदारांकडून करावी. कारण दिवाळीच्या कालावधीमध्ये मला ब-यापैकी अशा कंम्प्लेंट आलेल्या आहेत की किमान वेतन मिळत नाही. तरी याबाबतीत घोळवेंना मी विनंती करेन. आणि त्याचबरोबर दोघांनाही शुभेच्छा देऊन अभिनंदन करतो धन्यवाद.

**मा.राजेंद्र लांडगे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज याठिकाणी मी ज्यांच्यामुळे घडलो, ज्यांच्यामुळे या समाजकार्यामध्ये आलो. ज्यांच्यामुळे राजकारणामध्ये आलो आणि ज्यांच्यामुळे मी आज याठिकाणी या सभागृहात आहे असे आमचे खाडेसर यांचा आज अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार आयोजित केलेला आहे. सरांच्या बाबतीत बोलायचे म्हणलं तर एक तळमळीने काम करणारे व्यक्तीमत्व आहे त्यांनी ज्यावेळेस भाजपा हा पिंपरी चिंचवडमध्ये नावापुरता होता. बोटावर मोजण्याइतकी लोक होती

,

त्यावेळेस स्वर्गीय अंकुशभाऊ लांडगे आणि आपले खाडेसर यांच्याबरोबर मला काम करण्याची संधी मिळाली. तेव्हापासून मी खाडे सरांबरोबर म्हणजे आहे. त्यांचा स्वभाव त्यांची कामाची पध्दत ही पाहूनच आज याठिकाणी मी उभा आहे. सरांच्या बाबतीत सर्वांनीच सुचना केल्या आहेत. पण मी एवढे निश्चितपणे सांगू इच्छितो की प्रत्येकाला न्याय देण्याचे काम नक्कीच खाडेसर करतील. याच शुभेच्छा मी खाडेसरांना देतो. आणि माझे सहकारी केशवभाऊ घोळवे यांचे देखील अभिनंदन करतो आणि याठिकाणी थांबतो, धन्यवाद.

**मा.प्रमोद कुटे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तसेच आजचे सत्कारमुर्ती मा.खाडे सर आणि केशवजी घोळवे यांच्या आज सत्काराच्या निमित्ताने मला बोलण्यास संधी दिली त्याबद्दल मी मा. महापौरांचे सर्वप्रथम आभार व्यक्त करतो. खाडेसरांची प्राधिकरणाचे अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सगळयांत पहिला आनंद कोणाला झाला असेल तर एक बाधित शेतकारी म्हणून आज कुठेतरी असं वाटलं की आमचं ऐकणारे कोणीतरी माणूस त्याठिकाणी बसलेले आहे. कारण का जेव्हा जेव्हा आम्ही सीओ कडे जात होतो. तर १९७२ पासून गेल्या तीन पिढया आमच्या गेल्यात परंतु आम्हाला अजूनपर्यंत न्याय मिळालेला नाही. तुम्हाला सांगायला आम्हाला दु:ख वाटते की आज त्या प्राधिकरणाचे मुळ उद्दिष्ट होते की सर्वसामान्यांना घरे देण्याच्या दृष्टीने ते घरे बांधण्याचे आणि सर्व सामान्यांना घरे मिळवून देण्याचे जे धोरण होते. ते भरकटले गेले आहे. आज तुम्ही त्याठिकाणी अध्यक्ष म्हणून नेमणूक झाल्यानंतर आम्ही तुमच्याकडून एवढीच अपेक्षा व्यक्त करतो की १९७२ पासून प्रलंबित असणा-या आमच्यासारख्या गोरगरीब शेतक-यांची मुले जी आम्ही आहेत. अजुन आम्हाला कुठल्याही प्रकारचा मोबदला मिळालेला नाही. असे आमच्यासारखे अनेक शेतकरी कुटूंबे आहेत. त्यांना तुम्ही न्याय दयाल. आणि आमची बाजू तुम्ही कुठेतरी शासनाकडे मांडाल. १९७२ पासून आजपर्यंत आमचे आंदोलने चालू आहेत. आणि हे आंदोलन कुठेतरी संपेल आणि कुठेतरी आमच्यासारख्या आकुर्डी, निगडी, वाल्हेकरवाडी येथील नागरीकांना न्याय मिळेल अशी मी तुमच्याकडे इच्छा व्यक्त करतो. तसेच आपल्या परिसरामध्ये रिंग रोड बाधीत आहेत, प्राधिकरण हद्दीमधील घरे आहेत, एलआयजी सारखे विषय आहेत, लो इनकम हौसींग सोसायटीवाले आहेत, ओटा स्कीम आहे अशा पध्दतीने अनेक घरे आहेत की ते डेव्हलप झालेले प्राधिकरणाचे सेक्टर आहे. ते सेक्टर तुम्ही लवकरात लवकर करुन दया. त्यामुळे प्रत्येक वेळी ट्रान्सफरचा विषय आला की लाखो रुपयांचा निधी

,

मोजावा लागतो. कंत्राटी कामवाल्यांना पैसे मोजावे लागतात. आणि त्यांची प्लॅनींग अथारिटी ही महापालिकेकडे वर्ग करण्यात यावी म्हणजे जेणेकरुन त्यांना त्याठिकाणी घरे बांधायला, नवीन डेव्हलप करायला, त्यांना अधिकचा एफएसआय मंजूर करायला त्याठिकाणी मदत होईल. तसेच आज आपल्याकडे किमान वेतन आयोगाच्या सल्लागार पदी मा. केशवजी घोळवे यांची नियुक्ती झालेली आहे त्यांचे देखील मी अभिनंदन करतो. व त्यांच्याकडे इच्छा व्यक्त करतो की आपल्याकडे सिग्नलवरती ट्रॅफीक वॉर्डन जे उभे आहेत त्यांची फार दयनीय परिस्थिती आहे. आज पाच आणि सहा हजाराच्या मानधनावर ते लोक तिथे काम करतात. आपल्या प्रभागांमध्ये काम करणा-या ज्या महिला आहेत झाडू मारण्याचे काम करतात. त्यांना साडेपाच ते सहा हजार रुपये मानधन मिळते. तर त्यांना किमान वेतन आयोगाप्रमाणे आपण नक्की न्याय मिळवून दयाल आणि खरोखर त्यांचे आच्छे दिन आणाल आणि आमच्या बाधीत शेतक-यांच्या अडचणी सोडवाल एवढीच तुमच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो. आणि याठिकाणी तुमच्या दोघांचेही मनपूर्वक अभिनंदन करतो व माझ्या पक्षाचे वतीने पुनश्च: एकदा तुमचे अभिनंदन करतो.

**मा.चंद्रकांत नखाते** - सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपल्या सभागृहामध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपदी ज्यांची निवड झाली असे सत्कारमुर्ती आमचे सहकारी मित्र सदाशिवराव खाडे यांचा याठिकाणी आपण सन्मान करणार आहोत. खर पाहिलं तर खाडेसरांनी संपुर्ण आयुष्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ म्हणून त्यांनी चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. हे काम करीत असताना भारतीय जनता पार्टी पक्षवाढीचे काम आणि एकजुटीचे काम त्यांनी चांगल्या प्रकारे केलेले आहे. आणि मला वाटतं की आता भाजपाची राज्यामध्ये आणि केंद्रामध्ये सत्ता आलेली आहे. आणि सत्ता आल्यानंतर खरोखर नेते मंडळी सुध्दा जो खरा पक्षाचा कार्यकर्ता आहे ज्याने गेली वीस पंचवीस वर्षापासून पक्षाचे चांगल्या प्रकारे काम केलेले आहे त्यांना याठिकाणी न्याय दिलेला आहे. परंतु त्यामध्ये एक चांगलं काम करणा-या व्यक्तींला भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी एक चांगल्या प्रकारची जबाबदारी आज त्यांच्यावर टाकलेली आहे. आणि ही जबाबदारी टाकत असताना त्यांनी सुध्दा विचार केला असेल. सर्वसामान्य माणूस आणि चांगले काम करणारा व्यक्ती ज्या प्रमाणे पक्ष संघटनेचे काम करतो आणि त्याचप्रमाणे प्राधिकरणाची जबाबदारी सुध्दा चांगली पेलवणार आहे, चांगले काम करणारा आहे असा

,

विचार करुनच त्यांच्यावर ती जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. परंतु गेल्या कित्येक वर्षापासून रहाटणी, काळेवाडी, थेरगाव या संपुर्ण शहरामध्ये असणारे प्राधिकरण या प्राधिकरणाचा न्याय सर्वसामान्यांना मिळावा. यासाठी खाडे साहेब मी १९९८ सालापासून रहाटणी रहिवासी कल्याणकारी संस्थेची स्थापना करुन त्याठिकाणी हायकोर्टामध्ये आम्ही प्राधिकरणाच्या लोकांसाठी न्याय मिळण्यासाठी आम्ही झगडतोय. मला वाटत की गेल्या चारपाच दिवसांपूर्वी मी आपल्याला एक निवेदन दिलेले आहे. रहाटणी रहिवासी कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून निवेदन देत असताना त्यामध्ये एक विनंती केलेली आहे. की ज्याप्रमाणे पीएमआरडीएने बिगरपरवाना बांधकामे नियमित करण्यासाठी त्याठिकाणी रेडीरेकनरच्या पाच टक्के दंड संपुर्ण भागामध्ये, पीएमआरडीएच्या हद्दीमध्ये ती घरे नियमित करण्यसाठीचा असा त्यांनी निर्णय घेतलेला आहे. म्हणजे आपल्याला देखील मी विनंती केलेली आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये जो प्राधिकरणाचा भाग आहे आणि त्या भागामध्ये सुध्दा बांधकामाच्या रेडीरेकनरच्या पाच टक्के दंड आकारुन ती घरे नियमित केलीत तर खरा गोरगरीबांना त्याठिकाणी न्याय मिळेल. कारण ज्या ज्या भागामध्ये प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये ही बांधकामे केलेली आहेत त्या बांधकामांना नागरी सुविधा मिळण्यासाठी आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिवंगत महापौर आदरणीय मधुकररावजी पवळे हे महापौर असताना प्राधिकरणाला पण आपण महानगरपालिकेच्या खर्चाने ज्या नागरी सुविधांकरीता नाहरकत प्रमाणपत्र घेतले होते आणि तेव्हापासून मला वाटते की या पिंपरी चिंचवड प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये असणारी बांधकामे आणि त्यांना लागणा-या सुविधा तेव्हापासून आपण त्या ठिकाणी पुरविण्यात आलेल्या आहेत. परंतु हा जर निर्णय आपण चांगल्याप्रकारे घेतला तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असणा-या सर्व नागरीकांना चांगल्याप्रकारे न्याय मिळेल. त्याचबरोबर आपण निर्णय घेतल्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सुध्दा असणा-या बिगर परवाना बांधकामांना असणारा शास्तीकर हा सुध्दा लोकांना न्याय मिळण्यासाठी महानगरपालिकेला सुध्दा त्याठिकाणी रेडीरेकनरच्या पाच टक्के दंड आकारुन आपल्या महानगरपालिकेतील घरे सुध्दा याठिकाणी नियमित करता येतील. असा एक चांगल्या प्रकारचा निर्णय आपण जर घेतला तर सर्वसामान्य नागरीक या शहरामधला सुखी होईल आणि त्याच्यावर असणारी टांगती तलवार ही कायमस्वरुपी निघली जाईल. अशी या सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो. केशव घोळवे आमचे

,

सहकारी मित्र आहेत. त्यांचाही आपण याठिकाणी सन्मान करणार आहोत. या दोघांना यापुढील भावी काळासाठी शुभेच्छा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.दत्तात्रय साने** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज ज्यांना इथे सत्कार मुर्ती म्हणून बोलाविले ते आमचे सहकारी मित्र आदरनीय सदाशिवजी खाडे आणि ज्यांची किमान वेतन आयोगावर सल्लागार पदी निवड झाली असे आमचे केशवजी घोळवे. या दोघांच्या सत्कार समारंभावर आज खरतर बराचवेळ सर्वांनी चर्चा केलेली आहे. खरतर १५ वर्षानंतर प्राधिकरणाला एक न्याय मिळाला आहे. आणि तोही भारतीय जनता पार्टीचा पिंपरी चिंचवडच मुळ ज्यांनी भारतीय जनता पार्टीला ३ पासून ते ७७ पर्यंत संख्या आणली असे आमचे सहकारी मित्र आदरनीय सदाशिवजी खाडे यांचे खुप मोठे योगदान आणि त्या योगदानामध्ये अगदी सच्च्या कार्यकर्त्याला एक राज्यमंत्री पदाचा दर्जा म्हणजे प्राधिकरणाचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने त्यांचे मनापासून आभार मानतो, त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. खरतर अभिनंदन करीत असताना आमच्या अनेक मान्यवरांनी आमच्या सदस्यांनी प्राधिकरण मधल्या अनेक समस्या सांगितलेल्या आहेत. १९७२ चा निवाडा असेल किंवा १९८५ चा निवाडा असेल. त्यामध्ये ज्या ज्या शेतक-यांच्या जमिनी असतील चिखली, तळवडे, मोशी, च-होली, वाल्हेकरवाडी, भोसरी, काळेवाडी, पिंपरी हा जो परिसर आहे. ज्या परिसरामुळे मुळ प्राधिकरण अस्तित्वात आले ते अस्तित्वात येण्यापाठीमागचे कारण असं होते की आपल्या शहरामध्ये येणारा एक गोरगरीब कामगार वर्ग. अशा कामगार वर्गाने या परिसरामध्ये जमिनी अक्वायर करुन त्यामध्ये एखादे चांगले घरकुल मिळावे. हा जर प्राधिकरणाचा मुळ उद्देश असताना त्या उद्देशाला अनेक वेळेस त्याठिकाणी अध्यक्ष नसल्यामुळे लोकनियुक्त अध्यक्ष नसल्यामुळे मधल्या १५ वर्षाच्या काळामध्ये आपल्याला माहिती आहे. की जे साडेबारा टक्केचे प्लॉट होते. ते शेतक-यांचे प्लॉट होते. ते शेतक-यांना मिळण्याऐवजी कोणाच्या घशामध्ये गेले. किंवा कोण तिथे बिल्डर आला आणि शेतक-यांना काही मिळाले की नाही याची माहिती नाही. अशा अनेक परिस्थितीमध्ये ते प्राधिकरण होते मी आपल्याला एक विनंती करतो की काल पण आपल बोलण झालं होते की त्या मंदीराच्या बाबतीत. कालच्या पेपरला चांगली मोठी बातमी आहे. असं न होता आपण तिथे लोकनियुक्त बसलेलो आहेत. लोकांवर कुठला अन्याय होऊ नये. अशा माध्यमातून आपल्याकडून कामे व्हावीत. ही सदिच्छा आपल्याला देतो आणि

,

आपल्याला विनंती करतो की ज्या साडेबारा टक्केच्या जमिनी आहेत. म्हणजे मी स्वत: त्यामध्ये बाधित आहे. मलाच मिळालेले नाहीत अजून, मी सत्ताधारी होतो, नव्हतो समजा तो विषय सोडून दया. पण त्या काळचा मी सुध्दा होतो अजून मला साडेबारा टक्के मिळालेले नाहीत ही सत्य परिस्थिती आहे. आणि त्यामध्ये ज्या ज्या घटना घडल्या झालं किंवा काय झालं तो विषय न बोलता जे काही मुळ शेतकरी आहेत त्यांना साडेबारा टक्के मिळालेले नसतील त्या शेतक-यांना आपण सन्मानाने बोलावून त्यांच्या ज्या काही अडीअडचणी असतील त्या दूर कराव्यात आणि त्यांना मोबदला देण्यात यावा अशी आपल्याला विनंती करतो. केशव घोळवेंना विनंती करतो ते ऑलरेडी कामगार नेते आहेत. मला वाटतं की आता मंगलाताईंनी सांगितले की आपली किमान वेतन आयोगाच्या सल्लागार पदी नियुक्ती झालेली आहे ती आता आपल्या कार्पोरेशनपासून चालू करावी. की कोणीतरी सांगितलं आपल्याच कामगारांना पैसे मिळले जात नाहीत. आपल्याच कामगारांचे एटीएम कार्ड, पासबुक हे सर्व त्यांच्या मुळ ठेकेदारांकडे आहेत. दाखविताना काय ते १५ हजार १७ हजार रुपये दाखवितात. पण त्या सेकंदाला पैसै काढले जातात. कारण त्यांचे एटीएम कार्ड त्या कॉन्ट्रॅक्टरकडे असते. म्हणून त्यांच्यापासून जर सुरुवात केली, गोरगरीबांना जर न्याय मिळाला तर त्यांना एक आपल्या हातून चांगले काम घडेल अशी आपल्याला विनंती करतो आणि पुनश्च: एकदा दोघांनाही कामाच्या बाबतीत आमच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सदिच्छा आणि शुभेच्छा देतो आणि थांबतो.

**मा.शितल उर्फ विजय शिंदे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आजचे सत्कारमुर्ती खाडेसर यांना शुभेच्छा व्यक्त करताना माझ्या मनात एक शंका आहे आणि मागणी पण आहे. गेली सहा वर्षे मी वृक्ष प्राधिकरण समितीवर काम करीत आहे. त्याच्यामध्ये निदर्शनास येते की प्राधिकरणाकडून आमच्याकडे मंजुरी घेतली जाते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून परंतु त्याची अंमलबजावणी केली जात नाही. आणि ज्या बिल्डींगला प्लॅन पास करुन कंप्लीशन दिले जाते तर तिथे वृक्षलागवड केली जात नाही. तर ख-या अर्थाने शुभेच्छा व्यक्त करताना मी आपल्याकडे मागणी करतो की आपल्या पिंपरी चिंचवड वासियांना आपण जर वृक्ष प्राधिकरण समिती तिथेही गठीत केली तर ख-या अर्थाने आम्हाला एक शाबासकी किंवा आर्शीवाद किंवा शितलछाया भेटेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. आणि त्याचबरोबर आमचे मित्र केशवराव घोळवे यांनाही किमान वेतन समितीवर सदस्य

,

झाल्याबद्दल शुभेच्छा व्यक्त करतो. आणि त्यांनी देखील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कर्मचा-यांवर अन्याय होणार नाही. आणि नगरसेवकांचेही मानधन किमान वेतनाप्रमाणे कसे करता येईल याच्याकडे लक्ष दयावे अशा शुभेच्छा व्यक्त करतो आणि थांबतो, जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरतर मी या सभागृहाचे मनापासून अभिनंदन करतो. सदाशिवराव खाडे प्राधिकरणाचे अध्यक्ष झाले. भाऊसाहेबांनी या विषयाची सुरुवात केली मला असं वाटतं की भाऊसाहेब तुम्ही ख-या अर्थाने श्रीगणेशा केल्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांना खाडेसरांच्या बद्दल आपल मत व्यक्त करण्याची ख-या अर्थाने संधी मिळाली. शत्रूघ्न बापूही मला म्हणत होते की दादा मला पण शुभेच्छा दयायच्या आहेत. विलासही बोलला. मी म्हटलं की शुभेच्छा करता करता आपल्याला अजुन दोन चार तास जीबी चालवावयाची आहे. आणि खरतर मला अभिमान आणि आनंद एवढया गोष्टीचा वाटतो की खाडेसर हे तीस वर्षापासूनचे माझे सहकारी आहेत. ज्यावेळेस मी पार्टीच्या कामाला सुरुवात केली. ते युवा मोर्चाचे उपाध्यक्ष होते. मी सरचिटणीस होतो. आणि अधूनमधून एकत्रितपणे काम करता करता खरतर प्रत्येकाने सांगितले की एका चांगल्या कार्यकर्त्याला चांगली संधी मिळाली. खरतर हा इंस्टंटचा जमाना आहे आताचा. म्हणजे आताच्या काळामध्ये एक परिस्थिती असते की लगेच मला सगळया गोष्टी मिळाल्या पाहिजेत. खरतर पक्ष कुठलाही असू दया. पण एक मनापासून ठरविलं की मला ध्येयवेडानं माझ्या पार्टीचे काम करायचे आहे. म्हणजे कधीकधी खाडे सर हे अशा कार्यकर्त्यांसाठी तर उदार आहेत. अनेक कार्यकर्त्यांना असे वाटते की माझ्या पक्षश्रेष्ठीच माझ्याकडे दुर्लक्ष होत आहे. परंतु असं कधी होत नसतं. म्हणजे पक्षश्रेष्ठी सुध्दा सगळया पक्षाचे असतात. तुमच्याकडे बघत असतात की तुम्ही खरच पक्षाच्या परीक्षेला किती चांगल्या पध्दतीने उतरतात. त्याला काळ जातो आणि काळ गेल्याच्यानंतर म्हणजे सही कार्यकर्त्याला १०० टक्के ही संधी मिळते. म्हणजे मला आठवतय की मी अध्यक्ष झालो आणि त्याच्यानंतर खाडेसर अध्यक्ष झाले आणि सत्तेच्या पदामध्ये मी पहील्यांदा आलो ते नंतर आले. खरतर मला अभिमान वाटतो की तीस वर्षे मला एक उदाहरण आपल्या सगळयांना सांगायचे आहे. आपल्या सगळयांना माहीत आहे की कै.अंकुशराव लांडगे यांची याठिकाणी हत्या झाली. त्यावेळची भारतीय जनता पार्टीची परिस्थिती मला अभिमानाने सांगावेसे वाटते की खरतर

,

आताचा काळ भाऊसाहेब खूप चांगला आहे. म्हणजे अंकुशभाऊंची हत्या झाली तेव्हा खरतर मी, नामदेवराव असे बोटावर मोजण्याइतके पाच-पंचवीस कार्यकर्ते काम करायचो. आणि त्यादिवशी हत्या झाल्याच्यानंतर खरतर तीनचार महिन्यांनतर कार्पोरेशनच्या निवडणुका होत्या. सन २००७ च्या निवडणुका. मला आठवतय की त्यावेळेस भाजपचे काम करा आणि भारतीय जनता पार्टी निवडणुकीच्या मैदानामध्ये उतरा. खरतर आमच्याकडे असा चेहरा असेल. आणि खरतर आम्ही सर्वजण सर्वसामान्य कुटूंबातले कार्यकर्ते आहोत. मला आठवतय की मी दुस-या दिवशी त्यांचा अंत्यविधी झाल्यानंतर आम्ही खाडेसरांकडे गेलो होतो. तशी परिस्थिती असताना आपण जर घरामध्ये रडत बसलो तर भाजपाला काम करायला भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या मागे ताकद दयायला शहरामध्ये कोणी राहणार नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीमध्ये गाडीवर बसून स्कूटरवर बसून खरतर भारतीय जनता पार्टीच्या कामाला आम्ही सुरुवात केली आणि आज तुमच्या सगळयांच्या प्रयत्नानंतर राज्यात, केंद्रात महापालिकेत भाजपाची सत्ता आली. सत्ता येतात जातात या सगळया गोष्टी असतात. पण एक ध्येयनिष्ठेन वेडयासारख काम करणा-या एका कार्यकर्त्याला एक चांगली संधी मिळाली, मला अभिमान वाटतो म्हणजे सगळयांनी आपल्या मागण्या सांगितल्या. खरतर खाडेसर दहा वाजता ऑफिसला असतात. माझी सगळया पक्षाच्या सन्माननीय पदाधिका-यांना विनंती आहे. प्राधिकरणाच्या संदर्भामधले आपले जे काही इश्यूज असतील सर्वांनी मिळून एखादी बैठक प्राधिकरणाचे अध्यक्ष त्यांचे सीईओ आपले कमिशनर साहेबांच्या बरोबर लावून आपले सगळे विषय सुटतील अशा पध्दतीने निश्चितच आपण पुढच्या काळामध्ये काम करु. खरतर नवनाथराव खाडेसर तुमचे खूप जवळचे मित्र आहेत. मी त्यांना सांगितलं की सदाभाऊ आपण आता प्राधिकरणाचे अध्यक्ष झालात. मी कधीकधी खूप ऑबझर्व्ह करतो. सहज नगरसेवक झाल्यानंतर दुस-या दिवशी त्याच्या वागण्या, बोलण्यात, चालण्यात खूप मोठा बदल होतो. तो कधीकधी बघतही नाही आपल्याकडे. अशीही परिस्थिती ब-याच वेळेला अनुभवाला येते. मी म्हटले  की सर आपल्यालाही आता युनिफॉर्म, मस्त पैकी जाकीट वगैरे घालून राहावे लागेल. त्यांनी सांगितले की एकनाथ राव आपण कार्यकर्ते आहोत. आपण सामान्य माणसासारखे आहोत. आपल्याला सामान्य माणसासाठी काम करण्यासाठी पक्षाने दिलेली, सरकारने दिलेली खरतर ही संधी आहे. त्यामुळे आजही म्हणजे पुर्वी ज्यापध्दतीने राहायचे त्याच पध्दतीने, आजही पूर्वी ज्या पध्दतीने वागायचे त्याच पध्दतीने आहेत. खरतर एका कार्यकर्त्याचा सन्मान या निमित्ताने केला. मी केशवरावांचे मनापासून अभिनंदन करतो

,

की एका कामगार चळवळीमधल्या कार्यकर्त्याला खरतर ही संधी दिली. या सभागृहामधल्या सगळया पक्षाच्या सदस्याच्या वतीने मी तुमचे आभार मानतो. आणि खाडेसरांच्या बद्दल आपले मत व्यक्त करताना त्यांच्या बद्दल चांगला गौरव आपण आपल्या भाषणामधून केला. आणि खरतर यापुढच्या काळामध्ये या सभागृहामधल्या सर्व सदस्यांना अशा पध्दतीची चांगली काम करण्याची संधी मिळेल. प्राधिकरण आणि महापालिका यांच्यामधला समन्वय व दुवा साधण्याचे काम सन्माननीय खाडेसरांच्या माध्यमातून निश्चितच होईल. या सभागृहाच्या वतीने मा. खाडेसरांना खूप खूप शुभेच्छा देतो. आणि खरतर आण्णा बोदडे यांना विनंती करतो की आपण याठिकाणी खाडेसरांच्या सत्काराचा कार्यक्रम याठिकाणी घ्यावा.

**मा.महापौर**– सर्व सन्मा. सदस्य़, याठिकाणी आमचे सहकारी प्राधिकरणाचे नवनिर्वाचित अध्यक्ष सदाशिवजी खाडेसर त्याचबरोबर आमचे सहकारी केशव घोळवे यांची किमान वेतनआयोग सल्लागारपदी निवड झाल्याबद्दल सर्व सदस्यांनी या दोघांना शुभेच्छा दिलेल्या आहेत. त्याचबरोबर मी देखील पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने सरांना आणि केशवभाऊंना त्यांच्या पुढील कार्यासाठी मनापासून शुभेच्छा देत असताना आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये तुमचा सत्कार सर्व सभागृहाच्या वतीने होत आहे. ख-या अर्थाने कामाची पावती तुम्हाला पक्षाने दिलेली आहे. ती देत असताना या सभागृहामार्फत तुम्हाला शुभेच्छा देत असताना ब-याच तुमच्याकडुन कामाच्या अपेक्षा आमच्या सदस्यांनी ठेवलेल्या आहेत आणि ख-या अर्थाने गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित विषय की या शहरामध्ये प्राधिकरण आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्यामधले असल्यामुळे त्याठिकाणी खूप प्रलंबित आहेत. मग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्द असेल प्राधिकरणाची हद्द असेल त्याच्यामधे राहीलेली जागा असेल मग ती बो-हाडेवाडीपासून ते साने चौकापर्यंत तो असाच ग्रीन झोन राहिला तर त्यासाठी आम्हाला मदत करावी. साडेबारा टक्के परताव्याचा विषय असेल. कंप्लीशनचा विषय असेल. ओपन स्पेसची मागणी वारंवार आमच्या सदस्यांकडून आपल्याकडे होत आहे. त्या ओपन स्पेस हया पिंपरी चिंचवड शहरवासियांसाठी काही त्याठिकाणी खेळाचे मैदान असेल सांस्कृतिक हॉल असेल अन्य काही प्रपोजलसाठी ते आम्हाला याठिकाणी दयावे. जे ब्रीज, रस्ते तुम्ही बनविलेले आहेत. ते आमच्याकडे हस्तांतरीत करावेत. असे बरेचसे विषय आहेत. खरा महत्वाचा विषय म्हणजे साडेबारा टक्के परतावा हा खूप वर्षापासून प्रलंबित असलेला विषय आहे. आणि याठिकाणी ब-याच सदस्यांनी

,

ती मागणी केलेली आहे. या सभागृहातील विरोधी पक्षनेते दत्ताकाका साने यांचा देखील विषय आहे. आज त्या माणसाचा १९७२ पासून प्रलंबित विषय आहे. कोणताच विषय काका प्रलंबित ठेवत नाहीत. हा विषय कसा प्रलंबित ठेवला. हे मला सांगता येत नाही. परंतु आता जरी त्यांचा विषय झाला. २०१९ नंतर परतावा दया, तोपर्यंत नको. विधानसभेच्या इलेक्शननंतर परतावा दया. त्याचबरोबर एकनाथदादांनी देखील तुम्हाला शुभेच्छा दिल्यात. परंतु तुमचं आवर्जून मनापासून मी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने अभिनंदन करतो. जगातील एक नंबर संविधान भवन बांधण्यासाठी आपण आम्हाला पाच एकर जागा देताय. खरतर मी सर्व सदस्यांना विनंती करतो टाळया वाजवून आदरनीय अध्यक्षांचे आपण स्वागत करावे. ते संविधान जगातील एक नंबरचे संविधान असेल. मी तुम्हाला सांगतो त्यासाठी आदरनीय आमदार महेशदादा लांडगे असतील, लक्ष्मणभाऊ जगताप असतील, पक्षश्रेष्ठी असतील. सर्वच शहरातील नेत्यांच्या माध्यमातून त्याठिकाणी चांगले संविधान भवन होईल. एवढ या निमित्ताने सांगतो. पुन्हा एकदा सल्लागारपदी केशव भाऊ तुमची निवड झाली. आपल्याला मनापासून शुभेच्छा देतो आणि आण्णा बोदडेंना सांगतो की त्यांचा सत्कार करणेत यावा.

[सभागृहामध्ये मा. सदाशिव खाडे व मा. केशव घोळवे यांचा मा.महापौर, मा.आयुक्त आणि उपस्थित सन्मा. पदाधिका-यांच्या हस्ते सभागृहाच्यावतीने सत्कार करणेत आला.]

**मा. सदाशिव खाडे** - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल आज मा. महापौर, मा. आयुक्त सत्तारुढ पक्षनेते उपस्थित सर्व नगरसेवक, पत्रकार बंधू आणि भगिनीनों, माझा जो सत्कार आयोजित केला त्या सत्काराबद्दल मी पहिल्यांदा सगळया महापालिकेच्या पदाधिका-यांचे आभार व्यक्त करतो. ख-या अर्थाने दोन महिन्यापुर्वी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी या महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी माझी नियुक्ती केली आणि त्यानंतर कामकाज करीत असताना ब-यापैकी आपल्यातले नगरसेवक त्यांच्या त्यांच्या प्रभागातले प्रश्न घेऊन प्राधिकरणामध्ये मला भेटत असतात. सगळया प्राधिकरणाचा अभ्यास करता प्राधिकरणामध्ये भाऊसाहेब फार काही विशेष नाही. कारण प्राधिकरणामध्ये दोनच गोष्टी आहेत. ज्या भूमिपूत्रांनी आपल्यासारख्या माणसाला घरे बांधायला जागा दिलेली आहे ते शेतकरी आणि आपल्या सारख्यांनी जी घरे बांधली ते रहिवासी. त्यामुळे दत्ताभाऊ मी १०० टक्के आल्या दिवशी जाहीर केले आहे की साडेबारा टक्केचा परतावा प्रत्येक लाभार्थ्याला मिळणार आहे.

,

त्यामध्ये आपण विचार केला तर १९८४ नंतरच ५४४ लाभार्थी होते. भाऊसाहेब ४७० लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे आणि ८३ लाभार्थी शिल्लक आहेत. हे कोण ८३ आहेत तर त्यांच्या घरगुती बहिणी, आत्या, भाऊ-भाऊ, चुलते-पुतणे असा विषय आहे. दुसरे १९७२ ते १९८४ मधील १०५ लाभार्थी आहेत. त्याबद्दल प्रमोदभाऊ चार बैठका झाल्या आमच्या. तुमचे शंकरराव पांढरकर असतील, मुकूंद काळभोर असतील, कैलास सुपे असतील असे बरचसे शेतकरी आहेत. चंद्रकांत नखाते साहेब ते ही कायम पाठपुरावा करतात. ह्या सगळयांनी पाठपुरावा करुन दोनतीन बैठका घेतल्या. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यासाठी पॉझीटीव्ह आहेत. मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की कोणत्याही प्रकारचा जनतेचा प्रश्न आपण ठेवायचा नाही. येणा-या एकदोन महिन्यामध्ये दत्ताभाऊ आमचे सरकार शंभर टक्के तुम्हाला लाभ देणार आहे. लाभार्थी करुन घेणार आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची शंका ठेऊ नका. त्यामुळे साडेबारा टक्केचा विषय मिटणार आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत आयुक्त साहेब आमच्याबरोबर बैठकीला असतात. आयुक्त साहेब खूप चांगल्या सुचना मांडतात. त्यामुळे आतापर्यंत ११५०० घरे प्राधिकरणाने बांधली आहेत. पण येणा-या काळामध्ये १४५०० घरे प्राधिकरण बांधणार आहे. कोण म्हणतील कस आहे काय आहे. पण सहा हजार घरांची वर्कऑर्डर भाऊसाहेब देऊन झाली आहे. त्यामुळे येणा-या काळामध्ये आपण मा. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये त्याच भूमीपूजनही करणार आहोत. ह्या सगळया गोष्टींचा विचार जर केला तर आपल्या आपल्या प्रभागातले प्रश्न असतील आपल्या भागातले प्रश्न असतील. सिमाताई प्राधिकरणामध्ये तुम्हीही अध्यक्षा आहात तुम्ही कधीपण येऊ शकता त्यामुळे तुम्हाला काही प्रॉब्लेम नाही. त्यामुळे प्राधिकरणाच्या सिमाताई काय सगळयाच नगरसेवकांना ज्या ज्या तुमच्या भागातील प्रश्न असतील, प्रश्न असतील त्यासाठी ऑफिसच्या वेळेमध्ये या. ऑफिसच्या सर्व अधिका-यांसमवेत आपण बैठक करु. आणि तुमचे प्रश्न मार्गी लावू. मी भारतीय जनता पार्टीचा सामान्य कार्यकर्ता असल्यामुळे सामान्य लोकांची नाळ, सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठीच या खुर्चीवर बसलो आहे. आणि कै. गोपीनाथजी मुंडे साहेब यांचा आर्शीवाद आणि त्यांची शिकवण दलित, वंचित, पिडीत लोकांचे प्रश्न सोडविणे हेच आमच्यापुढें ध्येय आहे आणि त्याच पध्दतीने या महाराष्ट्राच्या लोकनेत्या मा. पंकजाताई मुंडे काम करतात. आणि त्या तालीमी मधला मी कार्यकर्ता असल्यामुळे आपण सर्वांना त्याच दिशेने काम करु. आणि सगळया कार्यकर्त्यांना आणि सगळया नगरसेवक महापालिकेच्या पदाधिका-यांना विनंती करतो आपआपल्या भागातले प्रश्न घेऊन या आपण

,

निश्चित सोडवू. कुठल्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. भाऊसाहेब प्राधिकरण हे सर्वांचे आहे आणि सर्वांनी एकत्र राहून चांगल्या प्रकारचे काम आपण करु या. मला सहकार्य करा. आज इथं बोलावून जो माझा सत्कार केला त्याबद्दल पुनश्च: आपल ऋण व्यक्त करतो आणि थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा. केशव घोळवे -** सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह खरोखरच आपल्या राज्याचे अत्यंत कार्यक्षम असे मा. मुख्यमंत्री आदरनीय देंवेद्रजी फडणवीस साहेब, प्रदेशाध्यक्ष खासदार मा. दानवे पाटील, लोकनेत्या आमदार पंकजाताई मुंढे त्याचबरोबर कामगार मंत्री संभाजी पाटील निलंगेकर साहेब यांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला आहे. आणि ख-या अर्थाने राज्याच्या किमान वेतन सल्लागार मंडळावर कामगारांचा प्रतिनिधी म्हणून माझी निवड केली त्याबद्दल मी त्यांचे शतश: आभार व्यक्त करतो. खरोखरच आज याठिकाणी माझा जो सन्मान केला आहे. हा माझा घरचा सन्मान आहे आणि या सन्मानाच्या माध्यमातून भाऊसाहेब नक्कीच मला १० पीजी शक्ती तुम्हा सर्वांच्या माध्यमातून मिळाली आहे. माईंनी ज्यावेळेस स्तुतीची सुमने उधळली त्यावेळेस खरोखरच डोळयातून अश्रु आले. मंगलाताई असतील, खरोखर या माध्यमातून स्फूर्ती, प्रेरणा आणि शक्ती आपल्याला मिळत असते. किमान वेतन हा अतिशय महत्वाचा विषय आहे. १९२८ मध्ये जिनिव्हा-स्वित्झर्लंड येथे हा कायदा पहिल्यांदा संमत केला. भारतामध्ये सुध्दा सांगितला होता. परंतु १९४८ साली तब्बल २० वर्षानंतर हा कायदा आला. आज जवळ जवळ ७० वर्षे झाली. आजही या कायदयाची अंमलबजावणी आपल्या पालिकेमध्ये तर सोडा परंतु राज्यात कुठेही होताना दिसत नाही. कालच आयोगाची पहिली बैठक झाली, आपल्या राज्यामध्ये ११ कोटी लोकसंख्या आहे. पैकी साडेचार कोटी कामगार आहेत. त्यातले तीन कोटी पासष्ट लाख हे जे कामगार आहेत त्यांना मिनीमम वेजेस दिले जाते. अतिशय भिषण असा हा प्रश्न आहे. आणि खरोखर मी माझं भाग्य समजतो. आदरनीय भारतीय जनता पार्टीच्या वतीने माझ्यावर हा विश्वास दाखविलेला आहे आणि तो सार्थ करण्याचा मी नक्कीच प्रयत्न करीन. आताच सन्माननीयांनी सांगितले की याची सुरुवात महानगरपालिके पासून झाली पाहिजे. हर्डीकर साहेब नक्कीच या विषयावर आपला संघर्ष होऊ शकतो. आणि त्याच्या अगोदर माझी अशी इच्छा राहील आपल्याकडे किमान वेतनामध्ये जेवढे कर्मचारी काम करतात त्यांना मिनीमम वेजेस आपण सुरु करावे. त्यांना वेतनाच्या स्लीप्स मिळाल्या पाहिजेत. त्यांचे प्रॉव्हीडंड फंड,

,

ईएसआयसी आणि प्रोफेशनल टॅक्स लिगल कंप्लायन्स स्टॅटयूचरी कंम्पालयन्स पुर्णत्वास न्याव्यात. खरच तसं घडल नाही मागच्याच महिन्यामध्ये बीजेपी सरकारने मिनीमम वेजेस आणलेला आहे. देशामध्ये सर्वोच्च यामध्ये तीन वर्षाची जेल हे देखील केलेले आहे. दंड किंवा जेल. आपण पाच वर्षाची जेल त्याठिकाणी लवकरच आणत आहोत. आणि मिनीमम वेजेसच्या बाबतीत सुध्दा ख-या अर्थाने अफ्राइन नावाचे साईनटिस्ट आपल्या देशामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये येऊन गेले. सुप्रीम कोर्टाचे काही जज्मेंटस आहेत. त्या अनुषंगाने आणण्याचा आपण प्रयत्न करु. कालच्या पहिल्याच बैठकीमध्ये २०१० पासून असलेले प्रलंबित रिव्हीजन २० सेक्टरचे होते. त्यामध्ये त्यापैकी सात सेक्टरमध्ये कालच निर्णय घेण्यात आला आणि ११ हजारचा पगार त्याठिकाणी १६ हजार करणेत आला आहे. हे प्रलंबित आणि पुढचेही लवकरच सुटतील. मला अस वाटत की लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी म्हटलेले आहे. पृथ्वी ही शेषाच्या शिर्षावर नसून कामगारांच्या जोरावर ख-या अर्थाने आहे. आणि कष्ट करणा-या शोषितांना वंचितांना एक न्याय देण्याचे भाग्य याठिकाणी असं वाटत की मला लाभलेले आहे. नक्कीच तुम्हाच्या सदिच्छा, शुभेच्छा आणि आर्शीवादाच्या माध्यमातून ते पुर्णत्वास जाईल असा मला याठिकाणी विश्वास वाटतो. आपल्या पालिकेमध्ये जे काही कंत्राटदार असतील त्यांनी लवकरात लवकर संबंधित कामगारांची खाती बँकेमध्ये काढावीत. आणि जे कोणी एटीएम घेत असतील. पगार घेत असतील अशांनी ते बंद करावे. अन्यथा येरवडा जेल जवळच आहे असं मला वाटते. नक्कीच आपण सर्वजण चांगल काम याठिकाणी करु. जो विश्वास आपण सर्वांनी दाखविला आणि मला ख-या अर्थाने याठिकाणी सन्मानीत केले. त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे शतशः आभार व्यक्त करतो. आणि थांबतो जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा. महापौर** – सभेच्या कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्र- २१ दि.२०/०८/२०१८, दि.०६/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा. महापालिका सभा क्र- २२ दि.१९/०९/२०१८ (दु.२.०० व ३.०५), दि.२७/०९/२०१८ (दु.२.०० व ३.२०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

,

**मा. दत्तात्रय साने** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. कार्यपत्रिका क्रमांक २२ दिनांक १९/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेस माझा विरोध आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा विरोध आहे. आमचा विरोध नोंदवून सभावृत्तांत कायम करणेत यावा.

**मा.महापौर-** सभावृत्तांत क्र. २२ ला विरोध नोंदवून घेण्याची मा.दत्ताकाका साने यांची मागणी विचारात घेवून त्याबाबतची नोंद सभावृत्तांतमध्ये घेण्यात येत आहे.

---------

**मा. स्वीनल म्हेत्रे –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते-

विषय क्रमांक १

दिनांक २०/१२/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/११४९/२०१८ दि.२४/१०/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३६३८ दि.१३/११/२०१८

प्रशासकिय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सर्व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार तेथील क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देणे आवश्यक असल्याने आदेश क्र.प्रशा/२/कावि/७१७/२०१७ दि.२९/०९/२०१७ अन्वये इ क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले असून तेथील कर्मचा-यांचे आस्थापना व वेतन विषयक कामकाज हे इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त आदेशानुसार व पत्र क्रं.प्रशा/२/कावि/१०५/२०१८ दि.०५/०४/१८ अन्वये कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ येथील सन २०१८-२०१९ साठी महसुली जमा व महसुली खर्च याबाबत अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदी या इ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह वर्ग करणे आवश्यक आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ लेखाशिर्ष ६ जमा र.रू.६०,००,०००/- लेखाशिर्ष -१६ खर्च र.रू. ६८,१५,०००/- लेखाशिर्षावर वर्गीकरण करावे लागेल. वरीलप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी इ क्षेत्रिय कार्यालय यांना प्रस्तावित केलेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ लेखाशिर्ष ६ जमा र.रू.६०,००,०००/- लेखाशिर्ष-१६ खर्च र.रू.६८,१५,०००/- या रक्कमा व

,

लेखाशिर्ष इ क्षेत्रिय कार्यालयाकडे प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुवर्णा बुर्डे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो -पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये "धन्वंतरी स्वास्थ योजना" या लेखाशिर्षावर र.रु. ६ कोटी व ग क्षेत्रिय स्थापत्य स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ४० लाख इतकी वाढीव तरतुद करणे आवश्यक आहे. तरी सदरची वाढीव रक्कम सातवा वेतन आयोगाकरिता केलेल्या तरतुदीमधुन वर्ग करुन प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यक्ता असुन सदर कामामुळे शहराच्या सौदर्यात व लौकीकात भर पडणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र. रु. | आवश्यक तरतुद र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्र.क्र. २६ वाकड–पिंपळे निलख भागातील ड क्षेत्रिय कार्यालयातंर्गत निवडणूक कामासाठी मंडप व्यवस्था पुरविणे | ५००००००/- | ३४०००००/- |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाचा नव्याने समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालयाचे पाणी पुरवठा विभागाचे स्थायी आस्थापना लेखाशीर्षावर सन २०१८-१९ साठी करण्यात आलेली तरतूद र रु १,७२,६०,०००/- अपुरी पडत आहे. कर्मचा-यांचे माहे डिसेंबर २०१८ - फेब्रुवारी २०१९ अखेरचे मासिक वेतन तसेच कर्मचा-यांचे १२-२४ वेतन निश्चिती फरक व एल एस जी डी परीक्षा उत्तीर्ण फरक यासाठी अजून ५०,००,०००/- एवढया रक्कमेची आवश्यकता आहे.

,

सदर लेखाशीर्षावर वर्गीकरण करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाचे अंदाजपत्रकात इतर लेखाशीर्षावर तरतूद नसल्याने सदरची तरतूद लेखा विभागाकडील ७ वा वेतन आयोग मधून वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाचे स्थायी आस्थापना लेखाशीर्षावर सन २०१८-१९ साठी करण्यात आलेली तरतूद र रु १,००,००,०००/- अपुरी पडत आहे. कर्मचा-यांचे माहे डिसेंबर २०१८ - फेब्रुवारी २०१९ अखेरचे मासिक वेतन तसेच कर्मचा-यांचे १२-२४ वेतन निश्चिती फरक यासाठी अजून २०,००,०००/- एवढ्या रक्कमेची आवश्यकता आहे.

सदर लेखाशीर्षावर वर्गीकरण करण्यासाठी स्थापत्य विभागाचे अंदाजपत्रकात इतर लेखाशीर्षावर तरतूद नसल्याने सदरची तरतूद लेखा विभागाकडील ७ वा वेतन आयोग मधून वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालयाचे विद्युत विभागाचे अस्थायी आस्थापना लेखाशीर्षावर सन २०१८-१९ साठी करण्यात आलेली तरतूद र. रु ५,००,०००/- अपुरी पडत आहे. प्रशिषणार्थी कर्मचारी यांचे मासिक वेतन दुप्पट झाल्यामुळे तरतूद अपुरी पडत आहे. माहे डिसेंबर २०१८- फेब्रुवारी- २०१९ प्रशिक्षणार्थी कर्मचारीचे मासिक वेतन अजून ३,००,०००/- एवढ्या रक्कमेची आवश्यकता आहे.

सदर लेखाशीर्षावर वर्गीकरण करण्यासाठी विद्युत विभागाचे अंदाजपत्रकात इतर लेखाशीर्षावर तरतूद नसल्याने सदरची तरतूद लेखा विभागाकडील ७ वा वेतन आयोग मधून वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | **विभाग** | **वाढ करावयाची लेखाशिर्ष** | **वाढ करावयाची रक्कम** | **लेखा विभागाकडील लेखाशिर्ष** | **घट करावयाची रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभाग | स्थायी आस्थापना | ५०,००,०००/- | ७ वा वेतन आयोग | - |
| २ | स्थापत्य विभाग | स्थायी आस्थापना | २०,००,०००/- | ७ वा वेतन आयोग | - |
| ३ | विद्युत विभाग | अस्थायी | ३,००,०००/- | ७ वा वेतन | - |

,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आस्थापना | | आयोग | |
| ४ | लेखा विभाग | सातवा वेतन आयोग | - | - | **७३,००,०००/-** |
| | | **एकूण र रु.** | **७३,००,०००/-** | **एकूण र रु.** | **७३,००,०००/-** |

तरी वरील प्रमाणे तरतूद वर्गीकरण ( वाढ/घट) करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कासारवाडी मध्ये नाला बालाजी नगर पासून ते हॉटेल कलासागर शेजारून पवना नदी मध्ये मिसळतो. सदर नाल्या मध्ये मोठया प्रमाणावर आद्योगिक सांडपाणी व काही प्रमाणात मलमिश्रित सांडपाणी वाहत आहे. यामुळे नाल्यातील पाणी दुषित होऊन पवना नदी मध्ये प्रदूषण वाढत आहे. तरी सदर नाल्यातील अशुद्ध पाण्यावर अद्यावत यंत्रणाद्वारे प्लांट बसविणे आवश्यक आहे.

त्यानुसार वरील कामाचा आंतर्भाव जलनिस्सारण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रक रुपये ५०.०० लाख इतकी तरतुद जलनिस्सारण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका चिखली येथे कुदळवाडी मध्ये रामझरा पासून नाला सुरु होऊन इंद्रायणी नदी मध्ये मिसळतो. सदर नाल्या मध्ये मोठया प्रमाणावर आद्योगिक सांडपाणी व काही प्रमाणात मलमिश्रित सांडपाणी वाहत आहे व नाल्याच्याकडेने अनेक भंगाराची दुकाने असून सदर दुकानापासून व्यवसायिक ओईल (Oil), केमिकल इत्यादीचे विल्हेवाट सदर नाल्यामध्ये करतात. नाल्यातील पाणी दुषित होऊन इंद्रायणी नदी मध्ये प्रदूषण वाढत आहे. तरी सदर नाल्यातील अशुद्ध पाण्यावर अद्यावत यंत्रणाद्वारे प्लांट बसविणे आवश्यक आहे.

त्यानुसार वरील कामाचा आंतर्भाव जलनिस्सारण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे

,

रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रक रुपये ५०.०० लाख इतकी तरतुद जलनिस्सारण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड मनपा मार्फत नव्याने थेरगांव व चिंचवड येथे तालेरा रुग्णालयाच्या ठिकाणी असे २ नवीन रुग्णालये स्थापत्य विभागामार्फत बांधणेत येत आहेत. तथापी मा.शहर अभियंता यांनी कळविलेनुसार सदरच्या नवीन रुग्णालयांसाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र [ETP] बांधणे बाबत पर्यावरण विभागास कळविले आहे. पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये या कामांचा आंतर्भाव नसल्याने परंतू रुग्णालये चालू होणेच्या दृष्टीने या सर्व रुग्णालयांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे सांडपाणी प्रक्रिया केंद्र [ETP] बांधणे आवश्यक आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने ठिकठिकाणी नव्याने बांधणेत येत असलेल्या रुग्णालयाकरिता (थेरगांव व चिंचवड तालेरा रुग्णालय) आवश्यक त्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र [ETP] बांधणेच्या कामाचा आंतर्भाव पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०४.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागातील 'रुग्णालये व दवाखाने' या लेखाशिर्षावरील आवश्यक ती रक्कम रुपये ८०.०० लाख इतकी तरतुद पर्यावरण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच च-होली येथे मैलाशुद्धीकरण केंद्र असून सदर मैलाशुद्धीकरण केंद्रामध्ये दररोज २१ दशलक्ष सांडपाण्यावर एस.बी.आर. तंत्रज्ञानावर प्रक्रिया केले जाते. सध्यस्थितीत सदर ठिकाणी प्रक्रिया केलेले सर्व पाणी पुन्हा नाल्याद्वारे नदीत सोडणेत येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निर्देशानुसार जास्तीत जास्त प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्यस्थितीत प्राईड येथे मोठ्या प्रमाणात पिण्याव्यतिरिक्त कामासाठी पाण्याची आवश्यकता आहे. तसेच स्थानिक लोकांना आवश्यकतेनुसार प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पिण्याव्यतिरिक्त कामासाठी पुरवठा करता येईल. त्यासाठी च-होली येथे प्रक्रिया करण्यासाठी UF आणि UV प्लान्ट बसविणार आहे व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा

,

पुर्नवापर करण्याकरता च-होली मैलाशुद्धीकरण केंद्र मध्ये आवश्यक कामे करणे गरजेचे आहे. त्यानुसार वरील कामाचा आंतर्भाव पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रक रुपये ८०.०० लाख इतकी तरतुद पर्यावरण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. २६ मधील विवीध रस्त्यांचे काँक्रिटीकरण तसेच विवीध विकास कामे करण्याच्या निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रभाग क्र. २९ मधील शाळेचे विस्तारीकरण करण्याच्या निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर कामे करतांना विद्युत विषयक कामे करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सदर कामांकरीता निवीदा मागविणे आवश्यक आहे. सदरच्या खालील तक्त्यात नमुद कामांचा समावेश विद्युत विभागाचे अंदाजपत्रकातील “स्थापत्य प्रकल्पांतर्गत विद्युत विषयक कामे करणे” या लेखाशिर्षावर समावेश करून सदर कामाकरीता आवश्यक प्रशासकीय मान्यता देण्यास तसेच आवश्यक तरतुद अखर्चित निधीत वाढ करून वर्ग करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष / कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ करीता आवश्यक तरतूद | सन २०१८-१९ ची तरतूद | वाढ | घट | सुधारीत तरतुद र. रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.२६ वाकड येथील कावेरी चौक, सब-वे ते पिंक सिटी कॉनरपयंत डी.पी. रस्ता सिमेंट कॉक्रीटचा रस्ता | ३३०००००० | ५०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |

,

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करणे. | | | | | | |
| 2 | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मधील विवीध आरक्षणे विकसीत करणे | २५०००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| 3 | प्र.क्रं. २६ मधील काळेवाडी फाटा ते छत्रपती चौका पर्यंत सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे. (टप्पा -०१) | २००००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| 4 | प्र.क्रं. २६ मधील छत्रपती चौक ते उत्कर्ष चौका पर्यंत सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे. | ३००००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| 5 | प्र.क्रं. २६ विशालनगर वाघजाई हॉटेल पासून कस्पटेचौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करणे.(२४मी.डी.पी. रस्ता) | १८०००००० | ५०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |

,

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | प्र.कं. २६ वाकड पिंपळे निलख येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे | ३००००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| 7 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील राजमाता जीजाऊ उद्यानासमोरील प्राथमिक शाळेचे विस्तारीकरण करणे व परिसरातील इतर अनुषंगीक कामे करणे. | ५०००००० | १०००००० | ० | १०००००० | ० | १०००००० |
| 8 | प्र.क्रं. २६ वाकड-पिंपंळे निलख मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे | ३००००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| 9 | प्रभाग क्र.२६ वाकड पिंपळे निलख रोड लगतची जागा येथे लिनीयर गार्डन विकसीत करणे | ३००००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |

,

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | अखर्चित निधी | | | ० | ० | २६०००००० | |
| | एकूण | २२१०००००० | २६०००००० | ० | २६०००००० | ० | २६०००००० |

तसेच प्रभाग क्र. ४ दिघी-बोपखेल मधील, दिघी स.नं. ८५ पै येथील आरक्षण क्रमांक २/१२२, प्राथमिक शाळा हे आरक्षण म.न.पा. ताब्यात आलेले आहे. सदर आरक्षणाचे ठिकाणी शाळा इमारत बांधणेचे काम प्रस्तावित आहे. सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामधील पानांक ५३, अ.क्र. ६१ नुसार सदर कामास रक्कम रुपये ५,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाचे वास्तुविशारद यांनी आरक्षण क्र. २/१२२ प्राथमिक शाळा विकसित करणे या कामाचे सर्व बाबींचा अंतर्भाव करुन अंदाजपत्रक तयार केले असुन त्याची रक्कम रुपये १५.०० कोटी येत आहे. सदर कामाची निविदा काढणेकरीता वाढीव रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सबब, 'वॉर्ड क्र. ४ दिघी येथील आरक्षण क्र. २/१२२ मध्ये शाळा इमारत बांधणे.' या कामाची मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम ५,००,००,०००/- व आवश्यक वाढीव रक्कम १०,००,००,०००/- सहीत एकुण १५,००,००,०००/- यांस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकातर्फे भक्ती शक्ती चौक निगडी येथे उड्डाणपुल व ग्रेड सेपरेटर बांधणेचे काम सुरु असुन सदर कामा अंतर्गत देहुरोड कॅन्टोन्मेंट हद्दीमध्ये सुमारे २०० मीटर उड्डाणपुलाचा रॅम्प येत असुन त्यासाठी मुख्य रस्त्यावर बॅरिगेट उभारणी करुन काम करावे लागत असल्याने डाव्या बाजुने वाहतुक वळवावी लागणार आहे. सदर मार्गामध्ये उच्चदाब व लघुदाब पोल व तारा येत असल्यामुळे त्या काढणे आवश्यक आहे. सदरची काम करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र.२७ रहाटणी येथे मनपा शाळेजवळ छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी प्रत्येक रविवारी साधारणतः ३०० ते ४०० तरूणांच्या उपस्थितीत शिववंदना होत असते. प्रत्येक वर्षी शहरामध्ये शिवजयंती साजरी होत असताना रहाटणी मध्ये एक भव्यदिव्य अशा दिमाखात जवळजवळ शहरामध्ये प्रथम क्रमांकाची मिरवणुक होत असते. आमच्या प्रभागामध्ये शिवभक्त मोठ्या

,

प्रमाणात असून त्यांची छत्रपतींचा सद्यस्थितीतला अर्धाकृती पुतळा हटवून त्या ठिकाणी नविन अश्वारूढ पुतळा बसविणेत यावा अशी मागणी आहे. सदर अश्वारूढ पूतळा बसवलेस सदर चौकाचे सौंदर्यात भर पडेल तसेच रहाटणी, पिंपळे सौदागर व संपूर्ण शहराच्या वैभवामध्ये भर पडणार आहे.

तरी तरूणांच्या तसेच नागरिकांचे मागणीनुसार प्रभाग क्र.२७ रहाटणी येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा जुना अर्धाकृती पुतळा हटवून त्याठिकाणी भव्यदिव्य असा छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा आश्वारुढ पुतळा बसविणेच्या व सदर कामासाठी र.रु. २०००००००  ( २ कोटी ) इतकी प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ३ चिखली येथील साने चौक ते चिखली चौक ३०/२४ मी. डीपी रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ३०/४-२०१७-१८) निविदा रक्कम रुपये ४,२०,१२,७७२/- हे काम, ठेकेदार मे. श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन यांना मिळालेले असून, सदरचे काम करण्यास सद्यस्थितीत २० % जागा मनपाच्या ताब्यात आली असल्याने व सदरचा रस्ता ३० मी. ऐवजी २४ मी. करण्याचे नगररचना विभागामार्फत करण्याचे प्रस्तावीत असल्याने तसेच सदरचे ठिकाणी रस्ता ताब्यात देण्यास जागा मालक तयार नसलेने सदरचे काम करण्यास नागरीकांचा २४/३० मी.रुंदीचा रस्ता करणेस तीव्र विरोध आहे. त्यामुळे सदरचे काम तातडीने करणे शक्य नसल्याने, सदर कामातून नविन प्रभाग क्र. १ चिखली येथील म्हेत्रेवस्ती, मोरेवस्ती, पाटीलनगर, रामदासनगर मधील इत्यादी अंतर्गत भागात व ठिकठिकाणी विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेले चर बुजवून रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत प्रभागाअंतर्गत चालू कामातुन सदरची कामे करणे शक्य नसल्याने विषयांकित कामातून सदर काम करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. हर्षल ढोरे** – मा. महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.स्विनल म्हेत्रे –** मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

,

ठराव क्रमांक - ३२९ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/१२/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र

क्र.प्रशा/१/कावि/११४९/२०१८ दि.२४/१०/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३६३८ दि.१३/११/२०१८

प्रशासकिय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सर्व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार तेथील क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देणे आवश्यक असल्याने आदेश क्र.प्रशा/२/कावि/७१७/२०१७ दि.२९/०९/२०१७ अन्वये इ क्षेत्रीय कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले असून तेथील कर्मचा-यांचे आस्थापना व वेतन विषयक कामकाज हे इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त आदेशानुसार व पत्र क्रं.प्रशा/२/कावि/१०५/२०१८ दि.०५/०४/१८ अन्वये कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ येथील सन २०१८-२०१९ साठी महसुली जमा व महसुली खर्च याबाबत अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदी या इ क्षेत्रीय कार्यालय प्रशासन अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह वर्ग करणे आवश्यक आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ लेखाशिर्ष ६ जमा र.रू.६०,००,०००/- लेखाशिर्ष -१६ खर्च र.रू. ६८,१५,०००/- लेखाशिर्षावर वर्गीकरण करावे लागेल. वरीलप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी इ क्षेत्रिय कार्यालय यांना प्रस्तावित केलेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह भोसरी-३९ लेखाशिर्ष ६ जमा र.रू.६०,००,०००/- लेखाशिर्ष-१६ खर्च र.रू.६८,१५,०००/- या रक्कमा व लेखाशिर्ष इ क्षेत्रिय कार्यालयाकडे प्रस्तावात नमूद प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये “धन्वंतरी स्वास्थ योजना” या लेखाशिर्षावर र.रु. ६ कोटी व ग क्षेत्रिय स्थापत्य स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ४० लाख इतकी वाढीव तरतुद करणे आवश्यक आहे. तरी सदरची वाढीव रक्कम सातवा वेतन आयोगाकरिता केलेल्या तरतुदीमधुन वर्ग करुन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यक्ता असुन सदर कामामुळे शहराच्या सौदर्यात व लौकीकात भर पडणार आहे.

,

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र. रु. | आवश्यक तरतुद र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्र.क्र. २६ वाकड–पिंपळे निलख भागातील ड क्षेत्रिय कार्यालयातंर्गत निवडणूक कामासाठी मंडप व्यवस्था पुरविणे | ५००००००/- | ३४०००००/- |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाचा नव्याने समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालयाचे पाणी पुरवठा विभागाचे स्थायी आस्थापना लेखाशीर्षावर सन २०१८-१९ साठी करण्यात आलेली तरतूद र रु १,७२,६०,०००/- अपुरी पडत आहे. कर्मचा-यांचे माहे डिसेंबर २०१८ - फेब्रुवारी २०१९

अखेरचे मासिक वेतन तसेच कर्मचा-यांचे १२-२४ वेतन निश्चिती फरक व एल एस जी डी परीक्षा उत्तीर्ण फरक यासाठी अजून ५०,००,०००/- एवढया रक्कमेची आवश्यकता आहे.

सदर लेखाशीर्षावर वर्गीकरण करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाचे अंदाजपत्रकात इतर लेखाशीर्षावर तरतूद नसल्याने सदरची तरतूद लेखा विभागाकडील ७ वा वेतन आयोग मधून वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाचे स्थायी आस्थापना लेखाशीर्षावर सन २०१८-१९ साठी करण्यात आलेली तरतूद र रु १,००,००,०००/- अपुरी पडत आहे. कर्मचा-यांचे माहे डिसेंबर २०१८ - फेब्रुवारी २०१९ अखेरचे मासिक वेतन तसेच कर्मचा-यांचे १२-२४ वेतन निश्चिती फरक यासाठी अजून २०,००,०००/- एवढ्या रक्कमेची आवश्यकता आहे.

सदर लेखाशीर्षावर वर्गीकरण करण्यासाठी स्थापत्य विभागाचे अंदाजपत्रकात इतर लेखाशीर्षावर तरतूद नसल्याने सदरची तरतूद लेखा विभागाकडील ७ वा वेतन आयोग मधून वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

,

३)   पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालयाचे विद्युत विभागाचे अस्थायी आस्थापना लेखाशीर्षावर सन २०१८-१९ साठी करण्यात आलेली तरतूद र. रु ५,००,०००/- अपुरी पडत आहे. प्रशिषणार्थी कर्मचारी यांचे मासिक वेतन दुप्पट झाल्यामुळे तरतूद अपुरी पडत आहे. माहे डिसेंबर २०१८- फेब्रुवारी- २०१९ प्रशिषणार्थी कर्मचारीचे मासिक वेतन अजून ३,००,०००/- एवढ्या रक्कमेची आवश्यकता आहे.

सदर लेखाशीर्षावर वर्गीकरण करण्यासाठी विद्युत विभागाचे अंदाजपत्रकात इतर लेखाशीर्षावर तरतूद नसल्याने सदरची तरतूद लेखा विभागाकडील ७ वा वेतन आयोग मधून वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | विभाग | वाढ करावयाची लेखाशिर्ष | वाढ करावयाची रक्कम | लेखा विभागाकडील लेखाशिर्ष | घट करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभाग | स्थायी आस्थापना | ५०,००,०००/- | ७ वा वेतन आयोग | - |
| २ | स्थापत्य विभाग | स्थायी आस्थापना | २०,००,०००/- | ७ वा वेतन आयोग | - |
| ३ | विद्युत विभाग | अस्थायी आस्थापना | ३,००,०००/- | ७ वा वेतन आयोग | - |
| ४ | लेखा विभाग | सातवा वेतन आयोग | - | - | **७३,००,०००/-** |
| | | **एकूण र रु.** | **७३,००,०००/-** | **एकूण र रु.** | **७३,००,०००/-** |

तरी वरील प्रमाणे तरतूद वर्गीकरण ( वाढ/घट) करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कासारवाडी मध्ये नाला बालाजी नगर पासून ते हॉटेल कलासागर शेजारून पवना नदी मध्ये मिसळतो. सदर नाल्या मध्ये मोठया प्रमाणावर आद्योगिक सांडपाणी व काही प्रमाणात मलमिश्रित सांडपाणी वाहत आहे. यामुळे

,

नाल्यातील पाणी दुषित होऊन पवना नदी मध्ये प्रदूषण वाढत आहे. तरी सदर नाल्यातील अशुद्ध पाण्यावर अद्यावत यंत्रणाद्वारे प्लांट बसविणे आवश्यक आहे.

त्यानुसार वरील कामाचा आंतर्भाव जलनिस्सारण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रक रुपये ५०.०० लाख इतकी तरतुद जलनिस्सारण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका चिखली येथे कुदळवाडी मध्ये रामझरा पासून नाला सुरु होऊन इंद्रायणी नदी मध्ये मिसळतो. सदर नाल्या मध्ये मोठया प्रमाणावर आद्योगिक सांडपाणी व काही प्रमाणात मलमिश्रित सांडपाणी वाहत आहे व नाल्याच्याकडेने अनेक भंगाराची दुकाने असून सदर दुकानापासून व्यवसायिक ओईल (Oil), केमिकल इत्यादीचे विल्हेवाट सदर नाल्यामध्ये करतात. नाल्यातील पाणी दुषित होऊन इंद्रायणी नदी मध्ये प्रदूषण वाढत आहे. तरी सदर नाल्यातील अशुद्ध पाण्यावर अद्यावत यंत्रणाद्वारे प्लांट बसविणे आवश्यक आहे.

त्यानुसार वरील कामाचा आंतर्भाव जलनिस्सारण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रक रुपये ५०.०० लाख इतकी तरतुद जलनिस्सारण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा मार्फत नव्याने थेरगांव व चिंचवड येथे तालेरा रुग्णालयाच्या ठिकाणी असे २ नवीन रुग्णालये स्थापत्य विभागामार्फत बांधणेत येत आहेत. तथापी मा.शहर अभियंता यांनी कळविलेनुसार सदरच्या नवीन रुग्णालयांसाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र [ETP] बांधणे बाबत पर्यावरण विभागास कळविले आहे. पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये या कामांचा आंतर्भाव नसल्याने परंतू रुग्णालये चालू होणेच्या दृष्टीने या सर्व रुग्णालयांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे सांडपाणी प्रक्रिया केंद्र [ETP] बांधणे आवश्यक आहे.

,

त्यानुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने ठिकठिकाणी नव्याने बांधणेत येत असलेल्या रुग्णालयाकरिता (थेरगांव व चिंचवड तालेरा रुग्णालय) आवश्यक त्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र [ETP] बांधणेच्या कामाचा आंतर्भाव पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०४.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागातील 'रुग्णालये व दवाखाने' या लेखाशिर्षावरील आवश्यक ती रक्कम रुपये ८०.०० लाख इतकी तरतुद पर्यावरण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच च-होली येथे मैलाशुद्धीकरण केंद्र असून सदर मैलाशुद्धीकरण केंद्रामध्ये दररोज २१ दशलक्ष सांडपाण्यावर एस.बी.आर. तंत्रज्ञानावर प्रक्रिया केले जाते. सध्यस्थितीत सदर ठिकाणी प्रक्रिया केलेले सर्व पाणी पुन्हा नाल्याद्वारे नदीत सोडणेत येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निर्देशानुसार जास्तीत जास्त प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्यस्थितीत प्राईड येथे मोठ्या प्रमाणात पिण्याव्यतिरिक्त कामासाठी पाण्याची आवश्यकता आहे. तसेच स्थानिक लोकांना आवश्यकतेनुसार प्रक्रिया केलेला पाण्याचा पिण्याव्यतिरिक्त कामासाठी पुरवठा करता येईल. त्यासाठी च-होली येथे प्रक्रिया करण्यासाठी UF आणि UV प्लान्ट बसविणार आहे व प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करण्याकरता च-होली मैलाशुद्धीकरण केंद्र मध्ये आवश्यक कामे करणे गरजेचे आहे.

त्यानुसार वरील कामाचा आंतर्भाव पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रक रुपये ८०.०० लाख इतकी तरतुद पर्यावरण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र. २६ मधील विवीध रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण तसेच विवीध विकास कामे करण्याच्या निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रभाग क्र. २९ मधील शाळेचे विस्तारीकरण करण्याच्या निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर कामे करतांना विद्युत

,

विषयक कामे करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे सदर कामांकरीता आवश्यक निवीदा मागविणे आवश्यक आहे. सदरच्या खालील तक्त्यात नमुद कामांचा समावेश विद्युत विभागाचे अंदाजपत्रकातील "स्थापत्य प्रकल्पांतर्गत विद्युत विषयक कामे करणे" या लेखाशिर्षावर समावेश करून सदर कामाकरीता आवश्यक प्रशासकीय मान्यता देण्यास तसेच आवश्यक तरतुद अखर्चित निधीत वाढ करून वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उप लेखाशिर्ष / कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ करीता आवश्यक तरतूद | सन २०१८-१९ ची तरतूद | वाढ | घट | सुधारीत तरतुद र. रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.२६ वाकड येथील कावेरी चौक, सब-वे ते पिंक सिटी कॉनरपयंत डी.पी. रस्ता सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे. | ३३०००००० | ५०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| 2 | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मधील विवीध आरक्षणे विकसीत करणे | २५०००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| 3 | प्र.क्रं. २६ मधील काळेवाडी फाटा ते छत्रपती चौका पर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता | २०००००००० | २५००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |

,

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करणे. (टप्पा -०१) | | | | | | |
| 4 | प्र.क्रं. २६ मधील छत्रपती चौक ते उत्कर्ष चौका पर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे. | ३०००००० | २५०००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| 5 | प्र.क्रं. २६ विशालनगर वाघजाई हॉटेल पासून कस्पटेचौक पर्यंत सिमेंट कॉक्रीटचा रस्ता करणे.(२४मी.डी.पी. रस्ता) | १८०००००० | ५०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| 6 | प्र.कं. २६ वाकड पिंपळे निलख येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे | ३०००००० | २५०००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| 7 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील राजमाता जीजाऊ उद्यानासमोरील प्राथमिक शाळेचे विस्तारीकरण करणे व | ५०००००० | १०००००० | ० | १०००००० | ० | १०००००० |

,

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | परिसरातील इतर अनुषंगीक कामे करणे. | | | | | | |
| 8 | प्र.क्रं. २६ वाकड-पिंपळे निलख मधील अंतर्गत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ३००००००० | २५०००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| 9 | प्रभाग क्र.२६ वाकड पिंपळे निलख रोड लगतची जागा येथे लिनीयर गार्डन विकसीत करणे | ३००००००० | २५०००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| 10 | अखर्चित निधी | | | ० | ० | २६००००००० | |
| | एकूण | २२१०००००० | २६०००००० | ० | २६०००००० | ० | २६०००००० |

तसेच प्रभाग क्र. ४ दिघी-बोपखेल मधील, दिघी स.नं. ८५ पै येथील आरक्षण क्रमांक २/१२२, प्राथमिक शाळा हे आरक्षण म.न.पा. ताब्यात आलेले आहे. सदर आरक्षणाचे ठिकाणी शाळा इमारत बांधणेचे काम प्रस्तावित आहे. सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामधील पानांक ५३, अ.क्र. ६१ नुसार सदर कामास रक्कम रुपये ५,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामाचे वास्तुविशारद यांनी आरक्षण क्र. २/१२२ प्राथमिक शाळा विकसित करणे या कामाचे सर्व बाबींचा अंतर्भाव करुन अंदाजपत्रक तयार केले असुन त्याची रक्कम रुपये १५.०० कोटी येत आहे. सदर कामाची निविदा काढणेकरीता वाढीव रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

,

सबब, 'वॉर्ड क्र. ४ दिघी येथील आरक्षण क्र. २/१२२ मध्ये शाळा इमारत बांधणे.' या कामाची मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम ५,००,००,०००/- व आवश्यक वाढीव रक्कम १०,००,००,०००/- सहीत एकुण १५,००,००,०००/- यांस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकातर्फे भक्ती शक्ती चौक निगडी येथे उड्डाणपुल व ग्रेड सेपरेटर बांधणेचे काम सुरु असुन सदर कामा अंतर्गत देहुरोड कॅन्टोन्मेंट हद्दीमध्ये सुमारे २०० मीटर उड्डाणपुलाचा रॅम्प येत असुन त्यासाठी मुख्य रस्त्यावर बॅरिगेट उभारणी करुन काम करावे लागत असल्याने डाव्या बाजुने वाहतुक वळवावी लागणार आहे. सदर मार्गामध्ये उच्चदाब व लघुदाब पोल व तारा येत असल्यामुळे त्या काढणे आवश्यक आहे. सदरची काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच प्रभाग क्र.२७ रहाटणी येथे मनपा शाळेजवळ छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा बसविण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी प्रत्येक रविवारी साधारणतः ३०० ते ४०० तरूणांच्या उपस्थितीत शिववंदना होत असते. प्रत्येक वर्षी शहरामध्ये शिवजयंती साजरी होत असताना रहाटणी मध्ये एक भव्यदिव्य अशा दिमाखात जवळजवळ शहरामध्ये प्रथम क्रमांकाची मिरवणुक होत असते. आमच्या प्रभागामध्ये शिवभक्त मोठ्या प्रमाणात असून त्यांची छत्रपतींचा सद्यस्थितीतला अर्धाकृती पुतळा हटवून त्या ठिकाणी नविन अश्वारूढ पुतळा बसविणेत यावा अशी मागणी आहे. सदर अश्वारूढ पूतळा बसवलेस सदर चौकाचे सौंदर्यात भर पडेल तसेच रहाटणी, पिंपळे सौदागर व संपूर्ण शहराच्या वैभवामध्ये भर पडणार आहे.

तरी तरूणांच्या तसेच नागरिकांचे मागणीनुसार प्रभाग क्र.२७ रहाटणी येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा जुना अर्धाकृती पुतळा हटवून त्याठिकाणी भव्यदिव्य असा छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा आश्वारुढ पुतळा बसविणेच्या व सदर कामासाठी र.रु. २०००००००( २ कोटी ) इतकी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ३ चिखली येथील साने चौक ते चिखली चौक ३०/२४ मी. डीपी रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ३०/४-२०१७-१८) निविदा रक्कम रुपये ४,२०,१२,७७२/- हे काम, ठेकेदार मे. श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन यांना मिळालेले असून, सदरचे काम करण्यास सद्यस्थितीत २० % जागा मनपाच्या ताब्यात आली असल्याने व सदरचा रस्ता ३० मी. ऐवजी २४ मी. करण्याचे नगररचना विभागामार्फत करण्याचे प्रस्तावीत असल्याने तसेच सदरचे ठिकाणी रस्ता ताब्यात

,

देण्यास जागा मालक तयार नसलेने सदरचे काम करण्यास नागरीकांचा २४/३० मी.रुंदीचा रस्ता करणेस तीव्र विरोध आहे. त्यामुळे सदरचे काम तातडीने करणे शक्य नसल्याने, सदर कामातून नविन प्रभाग क्र. १ चिखली येथील म्हेत्रेवस्ती, मोरेवस्ती, पाटीलनगर, रामदासनगर मधील इत्यादी अंतर्गत भागात व ठिकठिकाणी विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेले चर बुजवून रस्त्याचे मजबुतीकरण करुन डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत प्रभागाअंतर्गत चालू कामातुन सदरची कामे करणे शक्य नसल्याने विषयांकित कामातून सदर काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा. शर्मिला बाबर** – मा. महापौर साहेब. विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३३० विषय क्रमांक – २

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग–मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.लेखा/३/कावि/३०३/२०१८ दि.२५/१०/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३७०८
दि.४/१२/२०१८

शासन निर्णय क्रं.एनयुआर/२०१३/प्र.क्र.३३८/नवि-३३ मंत्रालय, मुंबई दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ अन्वये महानगरपालिका परिवहन उपक्रमातर्गत बस खरेदीवरील व्हॅट इत्यादी कर व परिवहन उपक्रमातील संचलन तूटी (operational losses) मुळे होणारा खर्च हा स्वत:चे उत्पन्नातून संबधित महानगरपालिकानी भरून काढणे बंधनकारक राहील असे नमूद असल्याने पुणे व पिंपरी चिंचवड मनपा अनुक्रमे ६०/४० या प्रमाणात संचलनतूट पी.एम.पी.एम.एल या संस्थेस अदा करीत आहे. पुणे महानगरपरिवहन महामंडळाने दिनांक १७/१०/२०१८ चे पत्रान्वये जास्तीत जास्त नागरिकांनी पी.एम.पी.एम.एल बसने प्रवास

,

करण्यासाठी नागरिकांना आकर्षित करण्यासाठी दर महिन्यातील १ दिवस पी.एम.पी.एम.एल बसेसमधून मोफत प्रवास सवलत योजना सुरू करणेबाबत कळविले आहे. सदरची योजना अंमलात आणल्यास एका वर्षात १२ दिवस सवलत दिल्यास तेवढ्या प्रमाणात संचलनतूट वाढणार असून त्या प्रमाणात मनपास जादाची रक्कम पी.एम.पी.एम.एल यांना अदा करावी लागणार आहे. सदरची बाब आर्थिक स्वरूपाची व धोरणात्मक असल्याने सदरचा विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शारदा सोनावणे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.पंकज भालेकर** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह महापौर साहेब आताच्या विषयासंदर्भात मला एक विषय निदर्शनास आणून दयायचा आहे. आता मगाशी पीएमपीएमएलचा विषय दाखल करण्यात आला आहे. आपण त्यांना नेहमी पैसे देत असतो महापौर साहेब. पण गेली बरेच दिवस आपल्या पीएमपीएमएलच्या १५५ कर्मचा-यांचा विषय प्रलंबित आहे. त्यांनी सांगितलं होत की त्या लोकांना एकदोन दिवसांत इकडे वर्ग करणेत येणार आहे. प्रत्येक जीबी आली की सांगतात वर्ग करणेत येणार आहे. आणि जीबी होऊन गेली की परत महिना दिड महिना विषयच घेत नाही. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब ब-याच वेळा या संदर्भात चर्चा झालेली आहे, तरी त्या लोकांना कृपया आपण समोर बोलावून या संदर्भात नक्की काय केले आहे. काय असेल तर उत्तर दयावे बरेच दिवस झाले आपण त्या नागरीकांना किती दिवस वेठीस धरणार आहे. त्या कर्मचा-यांना लवकर न्याय मिळाला पाहिजे महापौर साहेब. आता जे कोण अधिकारी आले असतील त्यांनी काय केले आहे आणि काय करणार आहेत. तरच हा विषय घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे. मी गेली वर्ष दिड वर्षे मा. महापौर साहेब या संदर्भामध्ये बसच्या रुटकरीता त्यांच्याकडे मागणी केली. आमच्या प्रभागात सुविधा मिळाव्यात. त्या सुध्दा कोणी देत नाही. कृपया मा. महापौर साहेब कोण अधिकारी इथं अव्हॅलेबल असतील त्यांना बोलावून उत्तर दयायला लावा महापौर साहेब, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----------

,

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो-

विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.क्रीडा/७अ/कावि/५७६/२०१८, दि.०४/१२/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३७७२
दि.४/१२/२०१८

केंद्र व राज्य शासनाचे संयुक्त विद्यमाने दि. ०९ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत मनपा हद्दीबाहेर शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे होणा-या द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अनुषंगाने मनपा हद्दीबाहेर शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे प्रस्तावात नमुद प्रमाणे विविध कामे करणेस व त्याकामी येणा-या खर्चास एकूण र.रु.३५,७३,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख, त्र्याहत्तर हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व सदरचा खर्च संबंधित विभागाचे संबंधित लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व सदर स्पर्धा अनुषंगाने मनपा हद्दीबाहेर शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे वरील विविध कामे करणेकामी दि. ०८ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत बालेवाडी येथे अग्निशामक दलाकडील १ सुसज्ज अग्निशामक वाहन व त्या सोबतचे तैनात कर्मचारी ताफा तैनात करणे सदर कार्याकरिता प्रती शिफ्ट प्रती वाहन र.रू.५,०००/- या प्रमाणे अग्निशामक वाहनासह कर्मचारी तैनात करणेचे एकूण शुल्क र.रु.१,९५,०००/- माफ करणेस तसेच द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अनुषंगाने बालेवाडी येथे नियुक्त केलेल्या कर्मचारी यांनी मनपा नियमानुसार अतिकालीन भत्ता मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. हर्षल ढोरे–** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके –** मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो - मुख्य उद्यान अधिक्षक यांचेकडील पत्र क्र.उद्यान/६/कावि/११०४/२०१८ दि.३०/११/२०१८ अन्वये “ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने गुणवंत व उदयोन्मुख खेळाडूंना

'

प्रोत्साहन व खेळाच्या प्रतीसाठी केंद्र शासनाद्वारे खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे येथे दि.८ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजित करणेत आलेले आहे. त्यानुसार उद्यान विभागाकडून शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे येथील हेजेस छाटणी, सुशोभिकरण साफसफाई करणेचे कामकाजासाठी उद्यान विभागास येणा-या र.रु.२,००,०००/-चे खर्चास मान्यता देणेत यावी.

तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स २०१८, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे दि. ०९ ते २० जानेवारी २०१९ या कालवधीत आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे. याबाबत मा. विभागीय आयुक्त, विधानभवन, पुणे यांनी दि.१२/११/२०१८ चे पत्रान्वये पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे -

१) शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे फायर हायड्रंट सिस्टीम दुरुस्ती करणे.

२) शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे पथदिव्यांची दुरुस्ती करणे व नुतनीकरण करणे या जबाबदारी सोपविल्या आहे. त्या पार पाडणे आवश्यक आहे.

याकरिता शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे फायर हायड्रंट सिस्टीम दुरुस्ती करणे या कामासाठी मुख्य इमारत अग्निशमन यंत्रणा दुरुस्ती, पानांक १६७-१६८, अ.क्र.११ या लेखाशिर्षावर र.रु.२५ लाख इतकी तरतूद असून या कामासाठी प्रशासकीय मान्यता र.रु.२५ लाख व तरतूद र.रु.२०,००,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

शिव छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे पथदिव्यांची दुरुस्ती करणे व नुतनीकरण करणे या जबाबदारी सोपविल्या आहे. त्या पार पाडणे आवश्यक आहे या कामासाठी मध्यवर्ती भांडार विभागाकडील - विद्युत साहित्य खरेदी करणे, पानांक १३८ अ.क्र.१४, या लेखाशिर्षावर र.रु.२० कोटी इतकी तरतूद असून या कामासाठी प्रशासकीय मान्यता र.रु.१५ लाख व तरतूद र.रु.१२,२३,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच उपरोक्त विषयास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दरवर्षी होत असणा-या महापौर चषक क्रिडा स्पर्धेमध्ये टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा व कराटे स्पर्धा हे खेळ महाराष्ट्र ऑलम्पिक सोबत सलग्न नसल्यामुळे हे दोन खेळ आजपर्यंत महापौर चषक स्पर्धे मधून वगळण्यात आले होते.

महोदय आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये बरेचशी मुले हि मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. शहर पातळीवर खेळल्या जाणा-या खेळांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात टेनिस बॉल

,

क्रिकेट हा खेळ खेळतात. कारण हा खेळ खेळण्यासाठी जास्त खर्चिक नसून मध्यमवर्गीय मुलांना हा खेळ पेलवणारा असतो. व त्याच कारणामुळे सर्वाधिक मुले हा टेनिस बॉल क्रिकेट खेळ प्राध्यान्याने खेळतात. व त्या खालोखाल वैयक्तिक खेळांमध्ये कराटे हा अति सरावाचा व कष्टाचा खेळ आहे. हा खेळ सुद्धा मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबातील खेळाडू खेळतात.

पिंपरी चिंचवड शहर स्तरावर टेनिस बॉल क्रिकेट व कराटे या दोन खेळांना प्राधान्य देण्यासाठी व मध्यमवर्गीय खेळाडूंना या खेळाविषयी अजून आवड निर्माण व्हावी व या खेळास एक उच्च व्यासपीठ प्राप्त व्हावे या अनुषंगाने वरील दोन्ही खेळ महापौर चषकामध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.बापु उर्फ शत्रुघ्न काटे** – मा. महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा. ज्ञानदेव थोरात –** मा. महापौर साहेब, उपूसचना स्वीकारली आहे.

**मा.राहुल कलाटे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह मला वाटत की गेल्या वर्षी पण आपण टेनिस या स्पर्धेला एक कोटी रुपये दिले होते. आयुक्त साहेब मला वाटत की या वर्षी पण परत पैसे देणार. पाच वर्षे देणार. हे तुम्ही आता पस्तीस लाख रुपये, त्यानंतर आता कटींगचे काम पण आपल्या अंगावर घेताय. मग आपण राज्य शासनाकडे काय काम ठेवायचे की नाही ठेवायचं. आणि जर खेळायला प्रोत्साहन देण्यास कुठलीही हरकत नाही. परंतु राज्य शासनाने काय करायचे की नाही करायचं. लॅण्डस्केप कटींग पण आपण करायची, पाणी वगैरे पण आपणच देतोय. म्हणजे काही दिवसांनी आम्हाला माहिती घ्यावी लागेल की शासनाकडून किती आले आणि आपण शासनाकडे किती दिले. मग ह्या स्पर्धेचा फायदा आपल्या शहराला काय आहे. आपल्या क्रिडा खेळाडूंना त्याच्यामध्ये काय फायदा आहे. आपल्या शहरातील खेळांडूंना त्याचा काहीतरी फायदा दया. नाही तर त्यांना त्यामध्ये समाविष्ट करुन घ्या. याचा कुठेतरी शहरातील नागरीकांना कसा फायदा होईल. याचा देखील आपण विचार करावा हि विनंती.

यानंतर उपसूचनप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

,

ठराव क्रमांक - ३३१ विषय क्रमांक - ३

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.क्रीडा/७अ/कावि/५७६/२०१८, दि.०४/१२/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३७७२
दि.४/१२/२०१८

केंद्र व राज्य शासनाचे संयुक्त विद्यमाने दि. ०९ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत मनपा हद्दीबाहेर शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे होणा-या द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अनुषंगाने मनपा हद्दीबाहेर शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे प्रस्तावात नमुद प्रमाणे विविध कामे करणेस व त्याकामी येणा-या खर्चास एकूण र.रु.३५,७३,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख, त्र्याहत्तर हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व सदरचा खर्च संबंधित विभागाचे संबंधित लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व सदर स्पर्धा अनुषंगाने मनपा हद्दीबाहेर शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे वरील विविध कामे करणेकामी दि. ०८ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत बालेवाडी येथे अग्निशामक दलाकडील १ सुसज्ज अग्निशामक वाहन व त्या सोबतचे तैनात कर्मचारी ताफा तैनात करणे सदर कार्याकरिता प्रती शिफ्ट प्रती वाहन र.रू.५,०००/- या प्रमाणे अग्निशामक वाहनासह कर्मचारी तैनात करणेचे एकूण शुल्क र.रु.१,९५,०००/- माफ करणेस तसेच द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अनुषंगाने बालेवाडी येथे नियुक्त केलेल्या कर्मचारी यांनी मनपा नियमानुसार अतिकालीन भत्ता मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मुख्य उद्यान अधिक्षक यांचेकडील पत्र क्र.उद्यान/६ /कावि/११०४/२०१८ दि.३०/११/२०१८ अन्वये "ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने गुणवंत व उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन व खेळाच्या प्रतीसाठी केंद्र शासनाद्वारे खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे येथे दि.८ ते २० जानेवारी २०१९ या कालावधीत आयोजित करणेत आलेले आहे. त्यानुसार उद्यान विभागाकडून शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी पुणे येथील हेजेस छाटणी,

,

सुशोभिकरण साफसफाई करणेचे कामकाजासाठी उद्यान विभागास येणा-या र.रु.२,००,०००/-चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

तसेच केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स २०१८, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे दि. ०९ ते २० जानेवारी २०१९ या कालवधीत आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे. याबाबत मा. विभागीय आयुक्त, विधानभवन, पुणे यांनी दि.१२/११/२०१८ चे पत्रान्वये पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडे -

१) शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे फायर हायड्रंट सिस्टीम दुरुस्ती करणे

२) शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे पथदिव्यांची दुरुस्ती करणे व नुतनीकरण करणे या जबाबदारी सोपविल्या आहे. त्या पार पाडणे आवश्यक आहे.

याकरिता शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे फायर हायड्रंट सिस्टीम दुरुस्ती करणे या कामासाठी मुख्य इमारत अग्निशमन यंत्रणा दुरुस्ती, पानांक १६७-१६८, अ.क्र.११ या लेखाशिर्षावर र.रु.२५ लाख इतकी तरतूद असून या कामासाठी प्रशासकीय मान्यता र.रु.२५ लाख व तरतूद र.रु.२०,००,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

शिव छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी येथे पथदिव्यांची दुरुस्ती करणे व नुतनीकरण करणे या जबाबदारी सोपविल्या आहे. त्या पार पाडणे आवश्यक आहे या कामासाठी मध्यवर्ती भांडार विभागाकडील - विद्युत साहित्य खरेदी करणे, पानांक १३८ अ.क्र.१४, या लेखाशिर्षावर र.रु.२० कोटी इतकी तरतूद असून या कामासाठी प्रशासकीय मान्यता र.रु.१५ लाख व तरतूद र.रु.१२,२३,०००/- वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच उपरोक्त विषयास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दरवर्षी होत असणा-या महापौर चषक क्रिडा स्पर्धेमध्ये टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा व कराटे स्पर्धा हे खेळ महाराष्ट्र ऑलम्पिक सोबत सलग्न नसल्यामुळे हे दोन खेळ आजपर्यंत महापौर चषक स्पर्धे मधून वगळण्यात आले होते.

महोदय आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये बरेचशी मुले हि मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. शहर पातळीवर खेळल्या जाणा-या खेळांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात टेनिस बॉल

,

क्रिकेट हा खेळ खेळतात. कारण हा खेळ खेळण्यासाठी जास्त खर्चिक नसून मध्यमवर्गीय मुलांना हा खेळ पेलवणारा असतो. व त्याच कारणामुळे सर्वाधिक मुले हा टेनिस बॉल क्रिकेट खेळ प्राध्यान्याने खेळतात. व त्या खालोखाल वैयक्तिक खेळांमध्ये कराटे हा अति सरावाचा व कष्टाचा खेळ आहे. हा खेळ सुद्धा मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबातील खेळाडू खेळतात.

पिंपरी चिंचवड शहर स्तरावर टेनिस बॉल क्रिकेट व कराटे या दोन खेळांना प्राधान्य देण्यासाठी व मध्यमवर्गीय खेळाडूंना या खेळाविषयी अजून आवड निर्माण व्हावी व या खेळास एक उच्च व्यासपीठ प्राप्त व्हावे या अनुषंगाने वरील दोन्ही खेळ महापौर चषकामध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.अश्विनी जाधव** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूमि/२/कावि/२१९/२०१८, दि.०४/१२/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३७७६ दि.४/१२/२०१८

पिंपरी चिंचवड अॅडव्हेकेटस बार असोशिएशन यांचे दि.१८/९/२०१७ रोजीच्या अर्जान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत मोरवाडी पिंपरी न्यायलयाचे मे.पिंपरी न्यायालयासाठी शासनाने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रातील मोशी बो-हाडेवाडी येथील पेठ क्रमांक १४ मधील ६.५७ हेक्टर (१५ एकर) न्यायसंकुलाच्या जागेवर नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत अजमेरा सोसायटी येथील मनपाचे शाळेसाठी बांधलेली तयार इमारती मधील जागेची मागणी ५ वर्ष कालावधी करीता केली आहे. महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागामार्फत भूमि आणि जिंदगी विभागास

,

मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. १०९ पै.व ११० पै.यासी सि.स.नं. ६३६५, ६३६६ पै. ६३६७ पै., ६३७० पै., व ६३७२ पै. या भूखंडावरील आ. क्र. ७३ (वाहनतळ), आ. क्र. ७४ (पोष्टऑफिस), आ. क्र.७५ (वाचनालय) व आ.क्र. ७६ (दवाखाना) ह्या समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसीत केलेल्या जमिनीचे मुल्यांकना अंतर्गत सन २०१७-१८ चे रेडी रेकनर दरानसार,तसेच जागेसाठीच्या रकमेवर ८ टक्के व बांधकाम क्षेत्रासाठीच्या रकमेवर १० टक्के उत्पन्न विचारात घेऊन वरिल समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसीत केलेल्या वाचनालय व दवाखाना बांधकामाच्या चटई क्षेत्रीनुसार मासिक भाडे र.रु. ४१.५० प्रति चौ.फुट व वाहृतळासाठी मासिक भाडे र.रु.१३.५० प्रती चौ.फुट या प्रमाणे नगररचना व विकास विभागाकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/०४/२०१८, दिनांक २/१/२०१८ अन्वये कळविलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने मुल्यांकनासाठी विचारात घेतलेले जमीनीचे क्षेत्र व बांधकाम क्षेत्र यासाठी वाचनालय व दवाखाना बांधकामाच्या चटई क्षेत्रानुसार मासिक भाडे र.रु.४१.५० प्रती चौ.फुट व वाहृनतळासाठी मासिक भाडे १३.५० प्रती चौ.फुट या प्रमाणे दर विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या एकूण बांधकाम क्षेत्र ४३७४.४३ चौ.मी.क्षेत्रासाठीची र.रू.८,७७,०२९/- व नगररचना विभागाने कळविलेल्या रक्कमेमध्ये फक्त ६८,३०१/- इतक्याच रक्कमेचा फरक असून उपरोक्त संदर्भिय प्रस्तावामध्ये भूमि आणि जिंदगीने विभागाने प्रस्तावित केल्या प्रमाणे र.रु.१०,७६,३२८/- इतका नाही. तथापी वरिल बाबीमध्ये र.रु.९,४५,३३०/- ही महानगरपालिकेने सन २०१७-२०१८ चे रेडीरेकनर दरानुसार तसेच जागेसाठीच्या रकमेवर ६ टक्के व बांधकाम क्षेत्रासाठीच्या रकमेवर ८ टक्के उत्पन्न विचारात घेऊन र.रु.८,७७,०२९/- निश्चित दिलेली आहे. महानगरपालिकेने सन २०१७-२०१८ चे रेडी रेकनर दरानुसार, तसेच जागेसाठीच्या रकमेवर ६ टक्के व बांधकाम क्षेत्रासाठीच्या रक्कमेवर ८ टक्के असे सार्वजनिक बांधकाम विभागा प्रमाणे उत्पन्न विचारात घेउन मुल्यांकनानुसार समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसीत केलेल्या वाचनालय व दवाखाना बांधकामाच्या चटई क्षेत्रानुसार मासिक भाडे र.रु.३२.६५ प्रती चौ.फुट व वाहनतळासाठी मासिक भाडे र.रु.१०.१० प्रती चौ.फुट याप्रमाणे येत असुन त्याप्रमाणे दर विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या एकुण बांधकाम क्षेत्र ४३७४.४३ चौ.मी. क्षेत्रासाठी येणारी रक्कम खालिल प्रमाणे

१) वाचनालय व दवाखाना बांधकामासाठी एकुण क्षेत्रासाठीची रक्कम

,

= (बिल्टअप बांधकाम क्षेत्र x ०.८०) x बांधकाम चटई क्षेत्राचा चौ.फुट दर x १०.७६४ = (१४६५.०५ चौ.मी.x०.८०) x र.रु.३२.६५ प्रती चौ.फुट x १०.७६४

= र.रु.=४,११,९०७/-(अ)

२) वाहनतळ बांधकामासाठी एकुण क्षेत्रासाठीची रक्कम

= वाहनतळाचे बांधकाम क्षेत्र x वाहनतळ क्षेत्राचा चौ.फुट दर x १०.७६४

= २९०९.३८ चौ.मी. x र.रु.१०.१० प्रती चौ.फुट x १०.७६४

= एकुण रक्कम = ३,१६,२९७/-(ब)

३) एकुण रक्कम = अ + ब

= ४,११,९०७ + ३,१६,२९७

= र.रु.७,२८,२०४/-

सदरची रक्कम ही सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविलेली र.रु. ८,७७,०२९/- रक्कमे पेक्षा कमी आहे तरी महानगरपालिकेचे हित विचारात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने एकुण बांधकाम क्षेत्र ४३७४.४३ चौ.मी. क्षेत्रासाठी कळविलेली र.रु.८,७७,०२९/- प्रति महिना ५ वर्ष कालावधी करीता निश्चित केलेल्या मासिक भाडे नुसार जागा ५ वर्ष कालावधी करीता वितरीत करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.साधना मळेकर** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके**– मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत एस.आर.ए.अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प राबविले जातात. यावेळी स्थानिक झोपडपट्टीधारकांना तात्पुरते स्थलांतरीत करावे लागते. यासाठी मनपाच्या जागा मोकळ्या जागा भाड्याने घेऊन स्थलांतरीत करावे लागते. अशी मागणी भविष्यात आल्यास अशा प्रकल्पांना मनपाची मोकळी जागा नाममात्र भाडे दराने देण्यास व त्यांचे अधिकार मा.आयुक्तांस देण्यास मान्यता देण्यात यावी. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

**मा.हर्षल ढोरे** - मा. महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा. संदिप वाघेरे -** सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आताचा जो विषय आहे तो कोर्टाचा विषय आहे. मोरवाडी आणि डिस्क्ट्रीक कोर्टाचा विषय आहे. ते

,

नेहरुनगरच्या जागेमध्ये आहे. तर साधारणपणे ५३०० स्के.फूटाचे पार्कीग आहे जवळजवळ. आणि आता कोर्टाने पार्कीग मागितले आहे. २९०० स्के.मी. साधारणपणे २२०० ते २३०० स्के.मी जास्त वापरणार आणि २५०० स्के.मी. बिल्डींग आहे आणि आपण देतो साधारणपणे १४०० ते १५०० स्के.मी. म्हणजे १००० स्के. मी. आपली जागा शिल्लक राहते. आणि बाकीच्या पार्कीगची जागा २२००-२३००. तर माझ असं म्हणणं आहे की आयुक्त साहेब हे २९०० स्के.मी. पार्कीग कोण घेणार आहे. आणि बिल्डींगची बाकीची राहिलेली जी जागा आहे ना २२०० स्के.मी. आणि बाकीची ती ६०० ते ७०० स्के.मी. ती कोर्टालाच भाडयाने दयावी. आणि जे पार्कीग आहे ५३०० स्के.मी. हे कव्हर्ड पार्कीग आहे आणि ओपन पार्कीग २७०० स्के. मी. आहे. साधारणपणे ८००० स्के. मी. हे टोटल पार्कीग आहे. आणि जर हे महापालिकेने स्वत: टेंडर करुन भाडयाने दिले. आज हे तीन लाख १६ हजार दर महिन्याला देणार आहेत. आता महापालिकेला जवळजवळ आठ लाख सत्त्यातर हजार या बिल्डींगसाठी देत आहेत. तर हे पार्कीग जर आपणच भाडयाने दिले जी त्यांना ७००-८०० स्के.मी जागा राहिलेली आहे. ती त्यांना चाळीस रुपये काही तरी दर दिलाय ती त्यांना त्याच्यामध्ये आपले दोनएक लाख रुपये वाढतील. आणि हे पार्कीग जर आपण स्वत: भाडयाने दिले तर पाच ते सहा लाख रुपये महीन्याला महापालिकेला इनकम होईल. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल. तर आयुक्त साहेब माझी एक विनंती आहे की पार्कीग स्वत: महापालिकेने टेंडर काढून दयावे आणि ही बिल्डींग पूर्ण कोर्टाला पाच वर्षासाठी भाडयाने दयावी, एवढ बोलून थांबतो.

**मा.राहुल कलाटे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपल्या शहरामध्ये न्यायालयाची चांगली इमारत असावी. न्यायालयासाठी चांगला परिसर असावा. या दृष्टीने न्यायालयाला आपण काही मोकळी जागा आणि बांधकाम याचे आपण वार्षिक भाडे आठ लाख सत्त्यातर हजार ठरविले आहे. न्यायालयाला इमारत दिली पाहिजे. इमारत देण्याबद्दल काही दुमत नाही. पण संदिपने सांगितलं. पण मोकळी पार्कीगची जागा आपण फक्त दहा रुपये स्के. फूटने देतोय. ते जर वाहनतळ पालिकेने दिले लिलाव पध्दतीने तर निश्चितच पालिकेला त्याचा फायदा होईल. आणि या विषयाला जी उपसूचना दिली आहे नामदेवरावांनी. तुम्ही हे सगळ डेव्हलप करीत असताना पालिकेच्या मोकळया जागा या लोकांना भाडयाने दयायच्या. साहेब ऑलरेडी आपल्या जागेवरंच अतिक्रमण आपण काढू शकत नाही. भविष्यात असं नको व्हायला एक झोपडपट्टी काढायला दुसरी झोपडपट्टी होत

,

आहे. म्हणून असे निर्णय घेताना आपण साहेब काळजीपूर्वक निर्णय घ्यावेत. आज आपल्या ताटातल सुध्दा आपण खाली करु शकत नाही. आज आपण आपले रस्ते सुध्दा ताब्यात घेऊ शकत नाही अशी आपली आता अवस्था आहे. एकतर आपल्याला पालिकेचा बंदोबस्त मिळत नाही. किंवा पोलीस बंदोबस्त मिळत नाही. असे असताना आपण डबल आपली मोकळी जागा त्यांनाच भाडयाने देतोय. मग नंतर अशी परिस्थिती होईल की ही जागा नाही आणि ती ही जागा नाही. या गोष्टीचा आपण काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आहे.

**मा.वैशाली घोडेकर** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याठिकाणी कमिशनर साहेब आपल्याला माहिती आहे की पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये आजपर्यंत एकही झोपडपट्टी पुर्नवसन झालेली नाही. मी फक्त एवढच कमिशनर साहेब म्हणेन की आपण एका बाजूला स्मार्टसिटी करतोय. आपण एका तरी झोपडपट्टीकडे लक्ष दिलयं का. आज एसआरएचे प्रोजेक्ट हे लास्ट स्टेजवर आहेत. त्याबद्दलच बोलताय ना जागा भाडयाने देणे. साहेब, आज एसआरएचे प्रोजेक्ट एकदम लास्ट स्टेजला आहे नारळ फोडायचेत. परंतु कोणताही खाजगी मालक त्यांना ट्रान्झीट कॅम्पसाठी जागा भाडयाने देत नाही. ते भाडे एसआरए प्रोजेक्टला परवडत नाही. विकसकाची ही जबाबदारी त्याला परवडत असेलतर तो करेल म्हणून आपल्या इथं झोपडपट्टी पुर्नवसन होत नाही. कमिशनर साहेबांना माझी एवढीच विनंती आहे की आज आपल्या मोकळया जागा आहेत. त्या फक्त ट्रान्झीट कॅम्प होईपर्यंत पुर्नवसन होईपर्यंत आपल्याला भाडयाने दयायच्या आहेत. त्याच्यानंतर ती खाली करण्याची जबाबदारी ही विकसकाचीच असेल. ती मोकळी जागा पुन्हा खाली करुन महापालिकेच्या ताब्यात दयायची असा त्यांचा भाडेकरार असतो त्यासाठी. एवढीच विनंती आम्ही याठिकाणी करतो की ती नाममात्र दराने दयावी एवढीच विनंती करायची आहे.

**मा.एकनाथ पवार** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर या सभागृहातल्या सगळयाना आनंदाने अभिमान वाटावा. परंतु ज्या पध्दतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोर्टाची परिस्थिती होती. आणि गेल्या अनेक वर्षापासून कोर्टाची असेल अनेक वकीलांची असेल न्यायधिशांची असेल पक्षकारांची ही मागणी होती. या शहरामध्ये अधिकाधीक कोर्ट अव्हॅलेबल झाले पाहिजे. खरतर कोर्टाला काही दिवसांपूर्वी राज्य शासनाकडून मोकळी जागा दिली होती. परंतु त्याचे बांधकाम पूर्ण होईल, त्याठिकाणी कोर्ट येतील. आजची कोर्टाची जर पिंपरी चिंचवड शहराची संख्या बघितलीतर खूप अपूरी संख्या

,

आहे. यापुढच्या काळामध्ये आपण जर महापालिकेच्या वतीने त्यांना जर पाच वर्षासाठी जागा देऊ शकलो त्यानिमित्ताने किमान वीस कोर्ट आपल्याला त्याठिकाणी अव्हॅलेबल होतील आणि आपल्याला सगळयांना कल्पना आहे की विशेषत: कोर्टाच्या संदर्भामध्ये इथल्या सर्वसामान्य माणसाला पुण्यामध्ये जाणे आणि आठ-आठ, दहा-दहा तास त्याठिकाणी बसणे आणि तो जाण्यायेण्याचा खर्च असेल किंवा छोटया छोटया पक्षकाराला तिथे जाऊन जो त्रास होतो. खरतर याठिकाणी पुढच्या काळामध्ये या शहरामध्ये वीस कोर्टची जर उपलब्धता झाली तर आपल्या सगळयांना निश्चितच म्हणजे महापालिकेच्या तिजोरीमध्ये कोर्टाच्या माध्यमातून खरतर आपल्या इन्शुरन्सच्या ज्या केसेस आहेत. खरतर त्या पुण्याच्या कोर्टामध्ये गेल्यात. इन्शुरन्सच्या कोर्टाचा जो पैसा आहे तो पुण्याच्या रेव्हेन्यूयमध्ये खरतर तो जमा होतो. मला खरतर या निमित्ताने आपल्या सगळयांचे आभार मानायचे आहे की कोर्टाला आपण जागा देण्यासाठी खरतर आपण सढळ हाताने चांगल्या पध्दतीची मदत करतोय. आणि संदिपदादा तुम्हीही सुचना दिली आहे. प्रशासनाला सांगेल की अश्या पध्दतीने कोर्टाला जागा दयायची आणि पार्कींग आपल्याला वापरुन चांगल्या पध्दतीने इनकम होईल. पुढच्या काळामध्ये अजुन ही दोनचार जर कोर्ट आले तरीही पुढच्या काळामध्ये आपल्याला निश्चितच मदत करता येईल. मी मा. महापौरांना विनंती करतो की खरतर सभागृहाचे अभिनंदन केले पाहिजे. आपल्याकडेही दोनचार वकील निश्चितच आहेत. याचाही निश्चितच पुढच्या काळामध्ये उपयोग होईल. या निमित्ताने सर्वांचे अभिनंदन करतो आणि मा. महापौर आपल्याला विनंती करतो की हा विषय मंजुर करुन पुढचा विषय घ्यावा.

**मा. अश्विनी जाधव** – मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसुचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ३३२ विषय क्रमांक – ४

दिनांक २०/१२/२०१८ विभाग–मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूमि/२/कावि/२१९/२०१८, दि.०४/१२/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३७७६ दि.४/१२/२०१८

पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस बार असोशिएशन यांचे दि.१८/९/२०१७ रोजीच्या अर्जान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत मोरवाडी पिंपरी न्यायलयाचे मे. पिंपरी

,

न्यायालयासाठी शासनाने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रातील मोशी बो-हाडेवाडी येथील पेठ क्रमांक १४ मधील ६.५७ हेक्टर (१५ एकर) न्यायसंकुलाच्या जागेवर नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत अजमेरा सोसायटी येथील मनपाचे शाळेसाठी बांधलेली तयार इमारती मधील जागेची मागणी ५ वर्ष कालावधी करीता केली आहे. महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागामार्फत भूमि आणि जिंदगी विभागास मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. १०९ पै.व ११० पै.यासी सि.स.नं. ६३६५, ६३६६ पै. ६३६७ पै., ६३७० पै., व ६३७२ पै. या भूखंडावरील आ. क्र. ७३ (वाहनतळ), आ. क्र. ७४ (पोष्टऑफिस), आ. क्र.७५ (वाचनालय) व आ.क्र. ७६ (दवाखाना) ह्या समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसीत केलेल्या जमिनीचे मुल्यांकना अंतर्गत सन २०१७-१८ चे रेडी रेकनर दरानसार,तसेच जागेसाठीच्या रकमेवर ८ टक्के व बांधकाम क्षेत्रासाठीच्या रकमेवर १० टक्के उत्पन्न विचारात घेऊन वरिल समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसीत केलेल्या वाचनालय व दवाखाना बांधकामाच्या चटई क्षेत्रीनुसार मासिक भाडे र.रु. ४१.५० प्रति चौ.फुट व वाहतळासाठी मासिक भाडे र.रु.१३.५० प्रती चौ.फुट या प्रमाणे नगररचना व विकास विभागाकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/०४/२०१८, दिनांक २/१/२०१८ अन्वये कळविलेले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने मुल्यांकनासाठी विचारात घेतलेले जमीनीचे क्षेत्र व बांधकाम क्षेत्र यासाठी वाचनालय व दवाखाना बांधकामाच्या चटई क्षेत्रानुसार मासिक भाडे र.रु.४१.५० प्रती चौ.फुट व वाहनतळासाठी मासिक भाडे १३.५० प्रती चौ.फुट या प्रमाणे दर विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या एकूण बांधकाम क्षेत्र ४३७४.४३ चौ.मी.क्षेत्रासाठीची र.रू.८,७७,०२९/- व नगररचना विभागाने कळविलेल्या रक्कमेमध्ये फक्त ६८,३०१/- इतक्याच रक्कमेचा फरक असून उपरोक्त संदर्भिय प्रस्तावामध्ये भूमि आणि जिंदगीने विभागाने प्रस्तावित केल्या प्रमाणे र.रु.१०,७६,३२८/- इतका नाही. तथापी वरिल बाबीमध्ये र.रु.९,४५,३३०/- ही महानगरपालिकेने सन २०१७-२०१८ चे रेडीरेकनर दरानुसार तसेच जागेसाठीच्या रकमेवर ६ टक्के व बांधकाम क्षेत्रासाठीच्या रकमेवर ८ टक्के उत्पन्न विचारात घेऊन र.रु.८,७७,०२९/- निश्चित दिलेली आहे. महानगरपालिकेने सन २०१७-२०१८ चे रेडी रेकनर दरानुसार, तसेच जागेसाठीच्या रकमेवर ६ टक्के व बांधकाम क्षेत्रासाठीच्या रक्कमेवर ८ टक्के असे सार्वजनिक बांधकाम विभागा प्रमाणे उत्पन्न विचारात घेउन मुल्यांकनानुसार समावेशक आरक्षणा अंतर्गत विकसीत केलेल्या वाचनालय व दवाखाना बांधकामाच्या चटई क्षेत्रानुसार मासिक भाडे र.रु.३२.६५ प्रती चौ.फुट व वाहनतळासाठी

,

मासिक भाडे र.रु.१०.१० प्रती चौ.फुट याप्रमाणे येत असुन त्याप्रमाणे दर विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या एकुण बांधकाम क्षेत्र ४३७४.४३ चौ.मी. क्षेत्रासाठी येणारी रक्कम खालिल प्रमाणे

१) वाचनालय व दवाखाना बांधकामासाठी एकुण क्षेत्रासाठीची रक्कम

= (बिल्टअप बांधकाम क्षेत्र X ०.८०) X बांधकाम चटई क्षेत्राचा चौ.फुट दर X

१०.७६४ = (१४६५.०५ चौ.मी.X०.८०) X र.रु.३२.६५ प्रती चौ.फुट X १०.७६४

= र.रु.=४,११,९०७/-(अ)

२) वाहनतळ बांधकामासाठी एकुण क्षेत्रासाठीची रक्कम

= वाहनतळाचे बांधकाम क्षेत्र X वाहनतळ क्षेत्राचा चौ.फुट दर X १०.७६४

= २९०९.३८ चौ.मी. X र.रु.१०.१० प्रती चौ.फुट X १०.७६४

= एकुण रक्कम = ३,१६,२९७/-(ब)

३) एकुण रक्कम = अ + ब

= ४,११,९०७ + ३,१६,२९७

= र.रु.७,२८,२०४/-

सदरची रक्कम ही सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविलेली र.रु. ८,७७,०२९/- रक्कमे पेक्षा कमी आहे तरी महानगरपालिकेचे हित विचारात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने एकुण बांधकाम क्षेत्र ४३७४.४३ चौ.मी. क्षेत्रासाठी कळविलेली र.रु.८,७७,०२९/- प्रति महिना ५ वर्ष कालावधी करीता निश्चित केलेल्या मासिक भाडे नुसार जागा ५ वर्ष कालावधी करीता वितरीत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत एस.आर.ए. अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसनाचे प्रकल्प राबविले जातात. यावेळी स्थानिक झोपडपट्टीधारकांना तात्पुरते स्थलांतरीत करावे लागते. यासाठी मनपाच्या जागा मोकळ्या जागा भाड्याने घेऊन स्थलांतरीत करावे लागते. अशी मागणी भविष्यात

,

आल्यास अश्या प्रकल्पांना मनपाची मोकळी जागा नाममात्र भाडे दराने देण्यास व त्यांचे अधिकार मा. आयुक्तांस देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा. लक्ष्मण उंडे-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ५

दिनांक २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/कावि/परिवहन/ १/२०१८ दि.०७/१२/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३८३६ दि.११/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पी.सी.एम.सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए या मार्गाच्या केलेल्या डी.पी.आर.चा अहवाल महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कंपनी यांनी जा.क्र.Maha-Metro/Pune/DPR/Ext./2018/804 Date 05/12/2018 चे पत्रान्वये महानगरपालिकेस सादर करणेत आलेला आहे. सदर अहवालात नमुद केलेनुसार पी.सी.एम,सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए मार्गाची एकुण लांबी ४.४१३ कि.मी. इतकी आहे. तसेच सदर मार्गावर ३ मेट्रो स्टेशन चिंचवड स्टेशन, आकुर्डी, निगडी येथे प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्पाचे काम तसेच भूसंपादन करणे व सेवा वाहिन्यांचे स्थलांतर करणे, इ. कामे करणेसाठी एकुण र.रु.१०४८.२२ कोटी खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कंपनी मार्फत पी.सी.एम.सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए या मार्गाच्या डी.पी.आर. च्या अहवालास मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यकता आहे. तदनंतर सदरचा अहवाल महाराष्ट्र शासना मार्फत केंद्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत येणार आहे. तरी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.कंपनी मार्फत पी.सी.एम,सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ ए दरम्यानच्या केलेल्या डी.पी.आर.च्या अहवालास मान्यता देणेस तसेच सदर प्रकल्पास पुणे मेट्रो ऐवजी "पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो" असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

,

**मा. हर्षल ढोरे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर आमच्यासाठी आनंदाची गोष्ट आहे की दापोडी ते पिंपरी हा टप्पा पूर्ण होत असताना पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रो व्हावी यासाठी सभागृहातून सर्व नगरसेवकांनी तीव्र इच्छा दर्शविली होती त्याचप्रमाणे या शहरातील विविध संघटनांनी एनजीओएसनी याच्यासाठी वेळोवेळी लक्षवेधी आंदोलने केली आणि त्या संदर्भातला डीपीआर सन्मा. आयुक्त साहेब तुम्ही सादर केला आणि स्थायी समितीने तो मंजुर केला त्याबद्दल मी सर्व नगरसेवकांचे, मा.स्थायी समितीचे सर्व सदस्य आणि मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब आपले मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे शहरातील दोन्ही आमदार, तिन्ही खासदार या सर्वांचेच मी मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. आणि आयुक्त साहेब काल जो तुम्ही डीपीआर सादरीकरण केला. त्याच्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की २०२४ पर्यंत निगडीपर्यंत मेट्रोचे काम पुर्ण होणार आहे. तर आमची प्रामुख्याने मागणी असेल की २०२४ नव्हे तर २०२२ च्या आतमध्ये तो डीपीआर तयार होवून पुर्ण झाला पाहिजे ही आमची प्रामुख्याने मागणी राहील. आणि आयुक्त साहेब, महापौर साहेब या प्रकल्पासाठी महापालिकेची मंजुरी मिळाली असल्यामुळे आपल्याला राज्य शासनाची आणि केंद्रशासनाची मंजुरी घ्यायची आहे. तर यासाठी सुध्दा आपल्याला काय मदत लागेल त्यासाठी आम्ही सगळेजण आपल्या बरोबर आहोत. लवकरात लवकर ही सर्व मंजुरी घेऊन आपण हे चालू करावे अशी मी मागणी करतो. दुसरी गोष्ट महापौर साहेब हा डीपीआर पुन्हा एकदा सर्व नगरसेवकांसमोर दाखविण्यात यावा अशी मी तुम्हाला मागणी करतो. की जेणेकरुन सर्व नगरसेवकांना कळेल की कुठे चिंचवड, आकुर्डी व निगडीचे नगरसेवक सगळया नगरसेवकांना कळेल की कुठे मेट्रो स्टेशन होणार आहे. ही सर्व सविस्तर माहिती त्यांना देण्यात यावी. अशी मी तुम्हाला मागणी करतो, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर मेट्रोच्या विषयी गेली अनेक दिवस आमच्या सर्वांची मागणी होती की पिंपरीपर्यंत मेट्रो आलेली आहे ती निगडीपर्यंत जावी आणि त्या माध्यमातून आज इथं आपल्यासमोर डीपीआर सादर करणेत आलेला आहे. प्रेझेंटेशन पण दाखविले होते. त्या कार्यक्रमाला मला जमले नाही. मी मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला विनंती करतो की याची सविस्तर माहिती दयावी. याचे स्टेशन्स कुठे आहेत नंतर निगडी, चिंचवड आणि पिंपरी असे तीन

,

स्टेशन आपण दिलेले आहेत. त्याची थोडीशी वस्तुस्थितीची माहिती हवी. या 10.48 ला आपण आपला निधी किती असणार आहे. राज्य शासनाचा, केंद्र शासनाचा निधी कसा असणार आहे. का आपणच हा सगळा प्रकल्प राबविणार आहे. त्याबाबत थोडासा खुलासा करणेत यावा. आणि जस नाशिकफाटा ते पिंपरी काम चाललेले आहे किंवा दापोडीपर्यंत काम चाललेले आहे. तिथं ज्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. त्यानंतर तो कॉलम खराब झाला. त्यावेळेस डायरेक्ट आम्ही त्याठिकाणी जाऊन पाहणी केली. तो कॉलम दुरुस्त झाला नाही झाला त्याचे संबंधित त्या कामाचे आम्हाला महापौर साहेब आजपर्यंत डिटेल्स कळालेले नाही. मेट्रोचे अधिकारी आपल्या संपर्कात आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. ज्यावेळेस आपण काही तक्रारी त्यांना देतो. त्या तक्रारींचे निराकारण करणे किंवा त्याच्यावर काहीतरी मार्ग काढलाय. ते आपल्या संबंधित लोकांना कळवीत नाहीत. असं या निमित्ताने मी आपल्याला सांगू इच्छितो आयुक्त साहेब. कारण मागच्या वेळेस आपल्याला सर्वांना माहिती आहे. की अल्फा लाव्हलच्या समोर एक २५६ नंबरचा पोल तो डिस्कॉलीफाय करण्यासाठी ऑर्डर काढली होती. तिथे कुठल्या अधिका-यांना सस्पेंड केले. ते फक्त आम्ही पेपरला वाचले परंतु वस्तुस्थिती ज्यावेळेस जो तक्रार करतो. त्याच्या तक्रारीचे निराकरण करणे हे त्या कंपनीचे काम आहे. महापौर साहेब हा सिरीअसली विषय आहे. त्यामुळे आपण त्यापध्दतीने आयुक्त साहेब आपण याचा खुलासा करावा. समजा आपल्या एखादया नगरसेवकांच्या काही अडचणी असतील, किंवा तिथे राहुलदादा आपल्या कार्पोरेशनचा बोर्ड दिसतोय. बीआरटी मार्ग आणि आपला पिलर याच्यामधला दोघांचा जर विचार केला तर मला वाटतं की बस एलीव्हेटेड कट टू कट बसणार आहे. तो सुध्दा विचार करणे खूप गरजेचे आहे. असंच पुढे जाताना निगडीपर्यंत आपले दोन ब्रीज आहेत तर सगळा विचार करुन तो कसा नेणार आहे. नाहीतर हा पिलर तोड दुसरा जोड तिसरा जोड. याच्या तोडण्या जोडण्याचा पण प्रकार याच्यापूर्वी सुध्दा आपले तीनचार पिलर तोडण्याचे काम झाले. तो उचलून दुसरीकडे शिफ्ट करण्याचे झाले. याचा ही खर्च कोणी दयायचा. त्याचेही पत्र आम्ही दिले होते. त्याचे आजपर्यंत उत्तर मिळालेले नाही. त्याचा खर्च आपण केलाय का. का कंपनीने बेअर केला. का अन्य कोणी केलाय. त्याच्यावर जो खर्च झालेला आहे. तो कोणी बेअर केलाय. याच सुध्दा आजपर्यंत आम्हाला उत्तर मिळलेले नाही. म्हणून ही कंपनी आयुक्त साहेब तुमचे ऐकतात का हे आम्हाला माहीत नाही. पण आम्हाला सुध्दा याचे कुठलेही उत्तर दिले जात नाही. कटाक्षाने याबाबत आपण नोंद घ्यावी. ज्या ज्या घटना इथं घडलेल्या आहेत किंवा पोल शिफ्टींग

,

झालेत. त्याची डिजाईन काहीतरी चुकली होती त्याला जबाबदार कोण. आपले अंसिसटंट तिथे कोणी असतील. त्यांच्यावर आपण काय कार्यवाही केली आहे का. आणि पिंपरीपासून निगडीपर्यंतचा जो डीपीआर आहे. त्याचा सविस्तर आपण खुलासा करावा. त्याचे पैसे सादरीकरण कसं करणार आहे. आपण त्यांना किती देणार आहोत. त्याचा थोडासा खुलासा करावा अशी मी विनंती करतो. परत महापौर साहेब मला बोलायचं आहे.

**मा.प्रमोद कुटे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज खरोखरच आनंदाची गोष्ट आहे की आज आपल्यासमोर मेट्रोचा डीपीआर तरी येतोय. आपण पिंपरी ते निगडीपर्यंत मेट्रो नेणार आहे म्हणजे भविष्यात येणा-या काळामध्ये ही मेट्रो निगडीपर्यंत पोहोचणार आहे हे नक्की. आपण आता हे केलेले आहे. की पिंपरी ते निगडी यामध्ये चिंचवडस्टेशन, आकुर्डी आणि निगडी असे तीन मेट्रो स्टेशन्स प्रस्तावित केलेले आहेत. मी याठिकाणी आपल्याला एक सुचना करु इच्छितो की याठिकाणी जे तीन मेट्रो स्टेशन्स आहेत ते चिंचवड ते आकुर्डी यामध्ये काळभोरनगर, मोहननगर हा जो भाग येतो तेथे मोठया प्रमाणावर लोकवस्तीचा राहणारा भाग आहे. त्याठिकाणी काळभोरनगर येथे सुध्दा एक मेट्रोचे स्टेशन आपण ॲड करावे. जेणेकरुन तिथल्या नागरीकांना त्यांचा लाभ घेता येईल.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- ‘प्रस्तावित पिंपरी ते निगडी मेट्रो स्टेशन मध्ये काळभोरनगर येथे एक मेट्रोस्टेशन करणेस मान्यता देणेत यावी.’

**मा.निलेश बारणे** - मा.महापौर साहेब, उपसुचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - पिंपरी ते निगडी मेट्रोबाबत सादरीकरण करणेत येत आहे ते सर्वांनी पाहून घ्यावे.

[ यानंतर एलईडी स्क्रीनवर पिंपरी ते निगडी मेट्रोबाबतचे प्रेझेटेंशन दाखविण्यात आले. ]

**मा. महापौर** – मेट्रो संदर्भात जो विषय आहे तो २४ तारखेला सोमवारी विरोधी पक्षनेते, गटनेते, आणि पिंपरी ते निगडीपर्यंत जी मेट्रो जाणार आहे त्याठिकाणचे जे संबंधित नगरसेवक आहेत त्यांची मिटींग सादरीकरणासाठी आयुक्तसाहेबांचे ऑफिसमध्ये आयोजित करणेत यावी.

,

**मा.राहुल कलाटे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब काल जे सादरीकरण झाले त्यामध्ये काही गोष्टी आम्ही सांगीतल्या होत्या पण त्या आज सुध्दा तशाच आहेत. एक स्टॅम्प डयूटीचा विषय होता, १ टक्केचा. पूर्वी एलबीटी होती एलबीटी गेली तरी तशीच आहे. परत हा एक टक्का वाढला त्याच्यावर मॅडमनी सांगितलं होत की त्यातली काही आम्हाला रक्कम दया. तसं दुरुस्ती यामध्ये कराना. साहेब तुम्ही असेच पाठविले तर शासनाकडून असेच मंजुर होऊन येईल. त्यानंतर जवळजवळ ११२ कोटीचा तुमचा जीएसटी आहे. पक्षनेते ११२ कोटीचा आपल्याकडून जीएसटी जातोय. यासाठी आपण आपल्या लेव्हलला काहीतरी केले तर आपल्या शहराचेच पैसे वाचतील. आणि साहेब याच्या पुढचा विषय तुम्ही हिंजवडी मेट्रोचा घेतलेला आहे.

**मा.एकनाथ पवार** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर सचिन चिखले तुमच्या मागणीला ख-या अर्थाने यश आले. तुमची मागणी होती आणि ज्यावेळेस ज्या ज्या संघटनांनी खरतर मी त्यांना पहिली बैठक प्राधिकरणामधल्या ज्येष्ठ नागरीक संघासमवेत निगडी, आकुर्डी, प्राधिकरण भागामधल्या सर्व सन्माननीयांबरोबर, काका तुमची खरतर ही मागणी होती आणि त्या मागणीला ख-या अर्थाने मूर्त स्वरुप देण्याचे काम खरतर आम्ही केलयं. याचंही कुठेतरी कौतुक करावे. आणि काल काका तुम्ही ज्या वेळेस बोलत होते. खरतर काल मेट्रोच्या संदर्भामध्ये सर्व सन्माननीय गटनेत्यांना एक प्रेझेंटेशन दिले आहे. कदाचित तुम्ही पार्टी मिटींगमध्ये असल्यामुळे बिझी असाल. आणि जेव्हा मंगलाताईंनी सांगितले की सगळया नगरसेवकांना प्रेझेंटेशन दया. सगळया भागातल्या नगरसेवकांना प्रेझेन्टेशन पाहिजे. खरतर ताई आता आपण १०० टक्के प्रेझेंटेशन देऊ. आता महापौर साहेबांनी डेटही फायनल केली आहे. आणि खरतर किती स्टेशन होणार आहेत काय होणार आहेत. या संदर्भामध्ये मा. मुख्यमंत्र्यासोबत, मेट्रोच्या अधिका-यांबरोबर आपल्याला चर्चा करावी लागणार आहे. आणि कोणीतरी सन्माननीयांनी याच्यामध्ये प्रश्न विचारला की महापालिका किती पैसे देणार आणि काय देणार. खरतर हा डीपीआर आपल्याला राज्य शासनाकडे पाठवावा लागणार आहे या संदर्भामध्ये उपसूचना आहे. १५५ कोटी रुपये महापालिकेच्या स्वनिधीतून देणार आहोत. उरलेला जो ११५० कोटीचा आज याठिकाणी जो डीपीआर आहे तो केंद्र आणि राज्य शासनाच्या फंडातून आपल्याला करता यावा अशा पध्दतीची उपसूचना आपण देऊन हा प्रस्ताव सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या कडे गेल्याच्यानंतर

,

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या माध्यमातून त्याला मंजुरी मिळाल्यानंतर खरतर हा लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने तो २०१९ ला याची जी सुरुवात आपण करतोय दोनचार महिन्यांमध्ये, येणा-या पुढच्या काळामध्ये डीपीआर राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने मंजुर केला तर खरतर ही जी मेट्रो आपल्याला पिंपरी पासून दापोडी शिवाजीनगर पर्यंत जाणार आहे. तर मला असं वाटत की ते काम पुर्ण होईपर्यंत हे काम आपल्याला जर पूर्ण झाले तर पहिली मेट्रो आपल्याला निगडीपासून ते शिवाजीनगरपर्यंत नेण्यासाठी निश्चितपणे मदत होईल.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- 'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पी.सी.एम.सी. ते निगडी कॉरीडॉर क्र. १ ए चा डीपीआर मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी सादर केलेले आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मेट्रोच्या मंजुर डीपीआर नुसार राज्य शासनाचा हिस्सा पिंपरी ते निगडी या विस्तारीत मार्गासाठी राज्य शासनामार्फत देणेत यावा. त्यानुसार या कामासाठी येणा-या खर्चातील राज्यशासनाचा हिस्सा मिळणेसाठी मागणी मनपाने करावी. सदर कामास राज्य शासनाने निधी देण्याचे अमान्य केल्यास सदरचा खर्च र.रु. १५५ कोटी उपलब्धतेनुसार मनपाने स्वनिधीतून करण्यास मान्यता देणेत यावी.'

**मा.ढाके नामदेव-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उंडे लक्ष्मण-** मा. महापौर साहेब, उपसूचनां स्वीकारल्या आहेत.

**मा.सिमा सावळे -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. प्रथमत: मी याठिकाणी केंद्रशासनाचे आणि राज्य शासनाचे मनापासून अभिनंदन करते. परवाच आपण हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो नेली. आणि त्या भागातील नागरीक जे आहेत ते आपल्याकडचे पण आहेत. आणि येताना जो काय त्रास होतो, जी काही ट्रॅफीक जाम होते त्यावरती सर्वोत्तम उपाय म्हणजे मेट्रो. आणि मेट्राचे आपण भूमिपूजन केले मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री मा. फडणवीस साहेब यांच्या हस्ते परवा उदघाटन झाले. आमची विनंती अशी राहील की ज्यादिवशी आपण आपल्या येथून जो नवीन रुट करणार आहेत त्यासाठी सुध्दा मा. प्रधानमंत्री व मा. मुख्यमंत्र्यांना उदघाटनासाठी याठिकाणी बोलविण्यात यावे अशी मी सुचना करते मा. महापौर साहेब. आपले शहर झपाटयाने वाढतयं त्या शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन मेट्रो असेल, तुमच्या ट्राम असतील, ज्या काय योजना आहेत या योजनांचे स्वागत केले पाहिजे. कारण त्याच्या शिवाय आपल्याला पर्याय

,

पण नाही. मला मान्य आहे की मेट्रोचे काम चालू असताना आता प्रचंड मोठी ट्रॅफीक जाम होत आहे. बीआरटी येतेय बीआरटीमुळे सुध्दा ट्रॅफीक जाम आहे. कमिशनर साहेब वारंवार आपल्याला म्हणजे फोनवरुन सुचना केल्या. तुपे साहेबांना सुध्दा केल्या. की बीआरटी जेव्हा आपल्या महापालिकेच्या समोर उभी असते. बीआरटीला रेड सिग्नल असतो. आणि बाकीच्या पलीकडच्यांना ग्रीन सिग्नल असतो. पण बीआरटीचा ड्रायव्हर तो न बघता डायरेक्टच बस घेऊन जातो. त्यामुळे अपघाताचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे तरी दक्षता घ्या. उपक्रम चांगला असतो परंतु त्याला गालबोट लागल की उपक्रम हा चांगला राहात नाही आणि त्यामुळे आपण त्याकडे लक्ष दयावे. परत एकदा मा. महापौर साहेब आपण, विरोधी पक्षनेते असतील पक्षनेते असतील सर्वांनी जे काही सहकार्य याठिकाणी या डीपीआरमध्ये दाखविलेले आहे. खरतर मागच्या स्टँडीगमध्ये असल्यापासून साहेब महापालिकेपासून निगडीपर्यंत ही मेट्रो न्यावी. त्याचबरोबर नवीन एक सुचना आपल्याला आहे की हिंजवडी पासून ते डायरेक्ट आपली हद्द मोशीपर्यंत आहे तीथपर्यंत आपण नवीन प्रस्ताव तयार करावा. केंद्राला आणि राज्य शासनाला तो प्रस्ताव आपण पाठवावा. आणि साहेब आपल्या शहरामध्ये सुध्दा तीन चार ठिकाणी मेट्रो फिरली पाहिजे. की जेणेकरुन जी वाहतूक कोंडी आहे त्या वाहतुक कोंडीचा मार्ग मोकळा होईल आणि लोक सुध्दा आपल्या गाडया रस्त्यावरती कमी काढतील. हा एकमेव पर्याय आपल्याकडे राहिलेला आहे. पुढच्या काळामध्ये आपण तो सुध्दा लवकरात लवकर अंमलात आणावा. आपणा सर्वांचे सत्ताधारी पक्ष असतील, विरोधी पक्ष असतील सर्वांचे याठिकाणी आभार मानते. आणि थांबते जयहिंद जयमहाराष्ट्र.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ३३३ विषय क्रमांक – ५
दिनांक – २०/१२/२०१८ विभाग-मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/कावि/परिवहन/
१/२०१८ दि.०७/१२/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३८३६
दि.११/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पी.सी.एम.सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ ए या मार्गाच्या केलेल्या डी.पी.आर.चा अहवाल महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कंपनी यांनी

'

जा.क्र.Maha-Metro/Pune/DPR/Ext./2018/804 Date 05/12/2018 चे पत्रान्वये महानगरपालिकेस सादर करणेत आलेला आहे. सदर अहवालात नमुद केलेनुसार पी.सी.एम,सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए मार्गाची एकुण लांबी ४.४१३ कि.मी. इतकी आहे. तसेच सदर मार्गावर ३ मेट्रो स्टेशन चिंचवड स्टेशन, आकुर्डी, निगडी येथे प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्पाचे काम तसेच भूसंपादन करणे व सेवा वाहिन्यांचे स्थलांतर करणे, इ. कामे करणेसाठी एकुण र.रु.१०४८.२२ कोटी खर्च अपेक्षित आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कंपनी मार्फत पी.सी.एम.सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए या मार्गाच्या डी.पी.आर. च्या अहवालास मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यकता आहे. तदनंतर सदरचा अहवाल महाराष्ट्र शासना मार्फत केंद्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत येणार आहे. तरी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.कंपनी मार्फत पी.सी.एम,सी. ते निगडी कॉरीडॉर क्र.१ ए दरम्यानच्या केलेल्या डी.पी.आर.च्या अहवालास मान्यता देणेस तसेच सदर प्रकल्पास पुणे मेट्रो ऐवजी "पुणे व पिंपरी चिंचवड मेट्रो" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तावित पिंपरी ते निगडी मेट्रो स्टेशन मध्ये काळभोरनगर येथे एक मेट्रोस्टेशन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पी.सी.एम.सी. ते निगडी कॉरीडॉर क्र. १ ए चा डीपीआर मा.महापालिका सभेपुढे मान्यतेकामी सादर केलेले आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मेट्रोच्या मंजुर डीपीआर नुसार राज्य शासनाचा हिस्सा पिंपरी ते निगडी या विस्तारीत मार्गासाठी राज्यशासनामार्फत देणेत यावा. त्यानुसार या कामासाठी येणा-या खर्चातील राज्यशासनाचा हिस्सा मिळणेसाठी मागणी मनपाने करावी. सदर कामास राज्यशासनाने निधी देण्याचे अमान्य केल्यास सदरचा खर्च र.रु. १५५ कोटी उपलब्धतेनुसार मनपाने स्वनिधीतून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.प्रियांका बारसे –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

,

ठराव क्रमांक - ३३४ विषय क्रमांक - ६
दिनांक – २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बीआरटीएस/ ९५१/२०१८ दि.१०/१२/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३८३७ दि.११/१२/२०१८

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन ३ या उन्नत मार्गावर प्रस्तावित मेट्रो प्रकल्पास संकल्पना करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, वापरा व हस्तांतरित करा (DBFOT)या तत्वावर सार्वजनिक खाजगी सहभागाने (PPP) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करणेस महाराष्ट्र शासन मंत्रिमंडळ बैठक दि.०२/०१/२०१८ (संदर्भक्र.१) अन्वये मान्यता प्रदान करणेत आली आहे. सदर मेट्रो प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाने निकडीचा व महत्वपुर्ण नागरी प्रकल्प घोषित केला आहे. मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरिता व कार डेपोसाठी आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी रेल्वे अधिनियम, ११७८/पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६, नवीन कैंद्रिय भुसंपादन व पुर्नवसन व पुर्नवसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करणेस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. तसेच कैंद्र शासन, भारत सरकार अधिसुचना दि.१८/०९/२०१८ (संदर्भ क्र.३) अन्वये सदर प्रकल्प मेट्रो रेल्वे (बांधकाम निर्माण) अधिनियम (१९७८ चा ३३) अंतर्गत अनुसुचित समावेशित केला आहे.(Added in the Schedule of the Act).पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांचेकडील संदर्भ क्र.५मध्ये कळविलेनुसार खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

१) प्रस्तावित स्थानके व मुख्य रस्त्यांना जोडणा-या जिन्यांचे स्थान नकाशावर दर्शविल्याप्रमाणे मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी परवानगी द्यावी.

२) सदर उन्नत मार्ग प्रकल्प काम प्रत्यक्ष हाती घेण्याच्या दृष्टीने प्रस्तावित मेट्रो संरेखा सर्वसाधारण रुंदी १०.२३ मी. उपलब्धसाठी त्या-त्या प्राधिकरण क्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणांने प्रस्तावित/मान्य अंतिम विकास आराखड्यातील रस्त्या रुंदी प्रमाणे जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदर मेट्रो मार्ग कामे उच्चतम प्राधान्याने हाती घेणेसाठी जागा उपलब्धता असलेबाबत तातडीने “ना-हरकत” या कार्यालयास कळवावी.

,

३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण बैठक दि.२८/१२/२०१६ मधील ठराव क्र.३ मधील (२१) नुसार महानगरपालिका हद्दीताल रस्त्याखालील जागा विना मोबदला, विना अडथळा उपलब्ध करुन देणे व स्टेशन, जिन्यासाठी आवश्यक जागा आपल्या नियोजन विभागाकडुन योग्य त्या मोबदल्यात या प्राधिकरणास रितसर मालकी हक्काने हस्तांतरीत करावे.तसेच या प्रकल्पासाठी महानगरपालिका हद्दीतील आवश्यक खाजगी जमिनीचे संपादन देखील FSI/TDR स्वरुपात मोबदल्याद्वारे महानगरपालिकेमार्फत करुन द्यावे. या प्रकल्पाच्या निविदा तरतुदीनुसार प्रस्तावित रेल्वे स्टेशनवर मेट्रो प्रकल्प सवलत दरास वाणिज्यक विकास व जाहिरात हक्क देण्यात आले असुन त्याद्वारे त्यांना उत्पन्न उपलब्धी होणार आहे.

४) अ.क्र.२ मध्ये नमूद केलेल्या जागा प्रस्तुत मेट्रो प्रकल्पासाठी हाती घेणेकरीता आवश्यक ROW उपलब्धता असल्याबाबत व अस्तितत्वातील रस्त्यांच्या मध्यावर अथवा प्रस्तावित संरेखेप्रमाणे मेट्रोचे स्तंभ उभे करणेस संमती द्यावी.

तसेच सदरचे काम करताना या कामामुळे बाधीत होणा-या अत्यावश्यक सेवा वाहिन्या(Utiltiy Services) उदा. पाणीपुरवठा लाईन,ड्रेनेज लाईन, पावसाळी लाईन, विद्युत केबल, टेलिफोन केबल्स इ. यांचे स्थलांतर हे पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांचे खर्चाने व संबंधित विभागाचे मार्गदर्शनानुसार व देखरेखी खाली करणे बंधनकारक राहील.

तरी वरील बांबीचे अवलोकन होऊन पुणे मेट्रो लाईन-३, हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्प करीता खालील बाबींस मान्यता देणेत येत आहे.

१) प्रस्तावित स्थानके व मुख्य रस्त्यांना जोडणा-या जिन्यांचे स्थान नकाशावर दर्शिवल्याप्रमाणे मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी परवानगी मिळणेस.

२) प्रस्तावित मेट्रो संरेखा सर्वसाधारण मार्गिका रुंदी जागा उपलब्धता अंतिम विकास आराखड्यातील रस्ता रुंदी प्रमाणे जागा उपलब्ध करुन देणेस.

३) मनपा हद्दीतील रस्त्याखालील जागा विना मोबदला विना अडथळा उपलब्ध करुन देणेस व स्टेशन जिन्यासाठी आवश्यक जागा मनपाच्या भुमी आणि जिंदगी विभागाकडुन योग्य त्या मोबदल्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास रितसर मालकीहक्काने हस्तांतरित करणेस, तसेच प्रकल्पासाठी मनपा हद्दीतील आवश्यक खाजगी जमिनीचे संपादन आवश्यक तेथे FSI/TDR स्वरुपात आणि जेथे FSI/TDR स्वरुपात जागा ताब्यात येणार नाही तेथे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या खर्चाने जागा ताब्यात घेणेस.

,

४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतिम विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्ता रुंदीनुसार जागा उपलब्ध करुन देणेस.

५) भुजबळ चौकातील, उड्डाणपुल राष्ट्रीय महामार्ग, नजीकचे वाहनतळाचे आरक्षण यांच्या एकत्रित विचार सुयोग्य नियोजन करुन वाहतुक सुधारणा विषयक कामे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करणेचा

६) या कामामुळे बाधित होणा-या सेवा वाहिन्यांचे स्थालांतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वखर्चाने व संबंधित विभागाचे मार्गदर्शन व देखरेखी खाली करणेस

७) सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व भविष्यात समाविष्ठ होणा-या भागातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन ३ प्रकल्पाचे कामातील स्तंभ पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडील पुलाचा विचार करुन साधारण-१५ मी. उंचीवर घेणेस तांत्रिकदृष्टया योग्य होईल. तसेच याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील सल्लागार मे.स्तुप कंन्सल्टंट यांचेशी समन्वय साधुन नियोजन करणेत यावे.

८) सदरचा मेट्रो प्रकल्प पुर्ण करणेसाठी लगतच्या आवश्यकत्या परवानग्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्वखर्चाने घेणेच्या आहेत.

९) तांत्रिक निकषानुसार व आवश्यकता नुसार हिंजवडी ते शिवाजीनगर दरम्यानच्या मेट्रो मार्गामध्ये आवश्यक ते फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास आराखड्यतील रस्त्याच्या आखणी व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार मेट्रो मार्गाची आखणी करणेस.

१०) प्रस्तावित मेट्रो ३ मार्गाच्या आखणी बाबत व टी.ओ.डी. (TOD) धोरणाबाबत मे.शासनाच्या आदेशानुसार कार्यवाही करणेस.

तरी हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या कामास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत पीएमआरडीएला मान्यता देणेत येत आहे.

**मा. संगिता भोंडवे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.आरती चोंधे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

,

विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग - मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१३/कावि/५३२/२०१८ दि.२८/११/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३८३८ दि.११/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील आजी नगरसदस्य व त्यांचे कुटुंबीय (पती/ पत्नी व २ अपत्य -२१ वर्षा पर्यंत) यांचा वार्षीक र.रु.५,००,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख फक्त) इतक्या रक्कमेचा आरोग्य विमा योजना लागु करणेत आलेली आहे. सदर योजनेत महापालिकेतील माजी महापौर यांचा समावेश करणेस तसेच प्रत्यक्ष विमा हप्त्याचे २५ टक्के हिस्सा हा संबंधित सदस्यामार्फत व ७५ टक्के हिस्सा हा महापालिकेमार्फत अदा करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.योगीता नागरगोजे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - माजी महापौर यांची संख्या कमी असल्याने व शहर विकासामध्ये त्यांचे महत्वपुर्ण योगदान असल्याने माजी महापौर व त्यांचे कुटुंबीय म्हणजेच पती/पत्नी व दोन अपत्य ( २१ वर्षापर्यंत अथवा नियमानुसार) यांचा पाच लाखापर्यंत आरोग्य विमा उतरविणेस व दरवर्षी विमा हप्त्याचे नुतनीकरणाची रक्कम महापालिकेमार्फत भरणेस व त्याकरीता माजी महापौर यांचे वतीने १००% विमा हप्त्याची रक्कम महापालिकेमार्फत अदा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सागर आंगोळकर -** मा. महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम-** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हा विषय फक्त महापौरांसाठीच केलेला आहे. आम्ही ज्यावेळेला मागच्या टर्ममध्ये ही योजना आणली होती. त्यावेळेला नगरसेवक आणि माजी नगरसेवक, महापौर जरी असेल तरी तो माजी होतो. पण माजी नगरसेवक हा शब्द त्याच्यामध्ये होता. माजी नगरसेवकांची कागदपत्रे सुध्दा सगळी जमा झालीत आपल्याकडे. तर माझी सभागृहाला विनंती आहे की माजी नगरसेवक सुध्दा सगळे त्याच्यामध्ये घ्या. आपण पेपर सुध्दा गोळा केलेत. त्यांच्याकडून सगळे कागदपत्रे आलेले आहेत. परंतु त्यांना दिलेले नाही. कारण तुम्ही बघा. शासनाच्या इथं माजी आमदारांना ते दिले जाते. मग आपल्याकडे माजी नगरसेवकांना का नाही देणार.

,

आपण ऑलरेडी त्यांच्याकडे पेपर पाठविले होते. त्यांच्याकडून आपल्याकडे ब-यापैकी पेपर जमा पण झालेले आहेत. मग याच्यामध्ये माजी नगरसेवकांना का नाही देणार. माजी फक्त महापौरांना दयायचे आणि बाकीच्या का नाही दयायचं. म्हणजे नशीबाने कर्मयोगाने एक महापौर होतो. माजी महापौरांना तुम्ही देणार मग माजी नगरसेवकांना तुम्ही का नाही देणार.

**मा. महापौर** – ताई ते धोरण पहिले मंजुर झालेले आहे. हा फक्त महापौरांचा विषय आहे.

**मा. मंगला कदम** – मग महापौर साहेब, तसा तुम्ही खुलासा करावा.

**मा. महापौर** – ते धोरण मंजुरच आहे त्याचा खुलासा काय करायचा.

**मा. मंगला कदम** – महापौर साहेब, मागच्या वेळेला माजी नगरसेवकांना, ऐकाना तुमच्याच क्रेडीटचा विषय आहे. असं काय करता मागचा आता १७ एप्रिलला हा विषय परत येणार सेकंड इअरसाठी. १७ एप्रिलला हा विषय परत दुस-या वर्षासाठी होणार आहे त्यावेळेला तुम्ही सांगा, आव्हान करा. माजी नगरसेवकांनी सुध्दा पेपर जमा करावेत.

**मा. महापौर** – दरवर्षी तो विषय येतो त्याच्यामुळे ताई तुम्ही बोलल्या.

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, ताई त्याच्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील आजी नगरसेवक आणि माजी सुध्दा नगरसेवक. यामध्ये माजी नगरसेवकांना ऑलरेडी मागच्या काळामध्ये झालेले आहे. पण त्यांना मिळालेले नाही. त्याच्यामागचे कारण डॉ. रॉय यांच्याकडे चौकशी केली. पाच-सहा नगरसेवकांनी मागच्या म्हणजे माजी नगरसेवकांनी कागदपत्र दिले नाही, पण त्याच्यामध्ये आपण बदलच नाही करत.

**मा. मंगला कदम** – मा. महापौर साहेब, माझं म्हणण असं आहे की जे लोकं पेपर देतील. त्यांना तुम्ही दया. ज्यांना गरज नाही वाटत. ते देणार नाहीत.

**मा. एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, ताई म्हणतात तसं करा.

**मा. मंगला कदम** – मा.महापौर साहेब, माजी नगरसेवकांना तुम्ही पाठवा. जर त्यांनी दिले नाही तर तो विषय संपला. परंतु जे मागणी करतील त्यांना दया.

**मा. महापौर** – मा.मंगलाताईंच्या मागणी नुसार वैदयकीय विभागाने कारवाई करावी.

**मा.मंगला कदम** - माजी नगरसदस्य यांना देखील आरोग्य विमा योजना लागू करणेस व त्यांचेकडून स्वहिस्सा म्हणून १० % (दहा टक्के) रक्कम घेणेस मान्यता देणेत यावी.

,

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा. आरती चोंधे -** मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ३३५ विषय क्रमांक ७

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१३/कावि/ ५३२/२०१८ दि.२८/११/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३८३८ दि.११/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील आजी नगरसदस्य व त्यांचे कुटुंबीय (पती/पत्नी व २ अपत्य -२१ वर्षा पर्यंत) यांचा वार्षीक र.रु.५,००,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख फक्त) इतक्या रक्कमेचा आरोग्य विमा योजना लागु करणेत आलेली आहे. सदर योजनेत महापालिकेतील माजी महापौर यांचा समावेश करणेस तसेच प्रत्यक्ष विमा हप्त्याचे २५ टक्के हिस्सा हा संबंधित सदस्यामार्फत व ७५ टक्के हिस्सा हा महापालिकेमार्फत अदा करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी माजी महापौर यांची संख्या कमी असल्याने व शहर विकासामध्ये त्यांचे महत्वपुर्ण योगदान असल्याने माजी महापौर व त्यांचे कुटुंबीय म्हणजेच पती/पत्नी व दोन अपत्य ( २१ वर्षापर्यंत अथवा नियमानुसार) यांचा पाच लाखापर्यंत आरोग्य विमा उतरविणेस व दरवर्षी विमा हप्त्याचे नुतनीकरणाची रक्कम महापालिकेमार्फत भरणेस व त्याकरीता माजी महापौर यांचे वतीने १००% विमा हप्त्याची रक्कम महापालिकेमार्फत अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच माजी नगरसदस्य यांना देखील आरोग्य विमा योजना लागू करणेस व त्यांचेकडून स्वहिस्सा म्हणून १० % (दहा टक्के) रक्कम घेणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा. उषा मुंढे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

,

विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१२/कावि/१७२/२०१८, दि.२७/०७/२०१८
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३७ दिनांक - १४/०९/२०१८
३) मा.विधी समिती सभा ठराव क्र. ५१ दि.०५/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील जुने/निरुपयोगी भंगार साहित्य नेहरुनगर येथील गोडावुन व अन्य ठिकाणी जमा करुन ठेवण्यात आलेले आहे. सदरचे साहित्य निरुपयोगी झाले असुन फेरवापरास अयोग्य असल्याचे संबधित विभागप्रमुख यांनी प्रमाणीत केलेले आहे. प्रस्तुत साहित्याची शासकिय मुल्यांकनदार मे.ए.व्ही.शेवडे अन्ड असोशिएट पुणे यांचेक़डुन प्रत्यक्ष पहाणी करुन (मुल्यांकन) अंदाजे विक्रीमुल्य काढणेत आलेले आहे. त्यानुसार मनपाचे विविध विभागाकडील भंगार साहित्याचे एकुण अंदाजे विक्रीमुल्य र.रु १,३५,८९,८६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) कळविले आहे. प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढण्य़ात आलेली आहे. उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विक्री/विल्हेवाट खुल्या लिलावाने करणे प्रस्तावीत आहे. सदर लिलावासाठी महानगरपालिका अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखापाल, लेखापरिक्षक, भांडार अधिकारी व संबधित विभागाचे शाखाप्रमुख यांची लिलाव समिती गठीत करण्यात येत आहे. सदर भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु. १,३५,८९,८६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) इतकी आहे. उपरोक्त नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम मधील कलम ७९ (क) नुसार महापालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करणेस महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भंगार साहीत्याची विक्री लिलाव समितीचे निर्णयानुसार लिलावाव्दारे करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी “उक्त भंगार साहित्याची विक्री लिलावाने करणे ऐवजी विभागाकडून चालू बाजारभावानुसार काढलेल्या भंगार साहित्याचे एकूण अंदाजित मुल्यापेक्षा ५ टक्के

,

अधिक (जीएसटी सह) दराने मे.स्टील इंडिया कंपनी (STEEL INDIA COMPANY) या ठेकेदारास थेट पध्दतीने उक्त भंगार साहित्याची विक्री करण्यास मान्यता देणेत यावी.”

**मा.सुजाता पालांडे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- सदर विषयातील दाखल उपसुचना वगळून मा.आयुक्त यांचेकडील मुळ प्रस्ताव मंजुर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सागर आंगोळकर-** मा. महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा. उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ३३६ विषय क्रमांक – ८

दिनांक २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१२/कावि/
१७२/२०१८, दि.२७/०७/२०१८
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३७ दिनांक - १४/०९/२०१८
३) मा.विधी समिती सभा ठराव क्र. ५१ दि.०५/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील जुने/निरुपयोगी भंगार साहित्य नेहरुनगर येथील गोडावुन व अन्य ठिकाणी जमा करुन ठेवण्यात आलेले आहे. सदरचे साहित्य निरुपयोगी झाले असुन फेरवापरास अयोग्य असल्याचे संबधित विभागप्रमुख यांनी प्रमाणीत केलेले आहे. प्रस्तुत साहित्याची शासकिय मुल्यांकनदार मे.ए.व्ही.शेवडे अन्ड असोशिएट पुणे यांचेक़डुन प्रत्यक्ष पहाणी करुन (मुल्यांकन) अंदाजे विक्रीमुल्य काढणेत आलेले आहे. त्यानुसार मनपाचे विविध विभागाकडील भंगार साहित्याचे एकुण अंदाजे विक्रीमुल्य र.रु १,३५,८९,८६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) कळविले आहे. प्रस्तुत किंमत चालू बाजारभाव गृहीत धरुन अंदाजे काढण्य़ात आलेली आहे. उक्त भंगार साहित्याची किंमत अंदाजे असल्याने प्रत्यक्ष खुल्या लिलावात कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत साहित्याची विक्री/विल्हेवाट खुल्या लिलावाने करणे प्रस्तावीत आहे. सदर लिलावासाठी महानगरपालिका अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखापाल, लेखापरिक्षक, भांडार अधिकारी व संबधित

,

विभागाचे शाखाप्रमुख यांची लिलाव समिती गठीत करण्यात येत आहे. सदर भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु. १,३५,८९,८६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी पस्तीस लाख एकोन्नवद हजार आठशें साठ फक्त) इतकी आहे. उपरोक्त नमुद केलेनुसार महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम मधील कलम ७९ (क) नुसार महापालिकेची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता विक्री करणेस महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार उक्त भंगार साहीत्याची विक्री लिलाव समितीचे निर्णयानुसार लिलावाव्दारे करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते-

ठराव क्रमांक – ३३७ विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/४/कावि/
११७/२०१८, दि.२०/१०/२०१८

२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.६३ दि.१६/११/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह विभागामार्फत खाजगी व महानगरपालिकेच्या जागेत जाहिरात करणेसाठी देण्यात येणा-या परवानगीसाठी आवश्यक असलेले बाह्य जाहिरात धोरण ( Outdoor Advertising Policy ) ठरविणेकामी प्रपत्र अ मध्ये ( मराठी व इंग्रजी ) तयार करणेत आलेले आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा. महापौर साहेब ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विलास मडिगेरी-**मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

ठराव क्रमांक -३३८ विषय क्रमांक – १०
दिनांक – २०/१२/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/१०/कावि/०२/२०१८, दि.०७/१२/२०१८
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७१ दि.७/१२/२०१८

महाराष्ट्रातील औद्यागिक विकास, तंत्रज्ञानाची उपलब्धता, तसेच शैक्षणिक संस्थाची उपलब्धता यामुळे, मुंबई, नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, औरंगाबाद, शहराचा विकास झपाटयाने झाला आहे. या आर्थिक विकासाचा बोजा नैसर्गिक साधन संपत्तीवर पडत आहे. तसेच हवामान बदलाच्या परिणामुळे जल संसाधने व व्यवस्थापनात अनियमितता येत आहे. पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रात प्रतीदिन ५२० दशलक्ष लिटर इतका पाणी पुरवठा होत आहे. परंतु शहराच्या विकास दर लक्षात घेता भविष्यात मोठया प्रमाणात पाणीपुरवठा आवश्यक आहे. सद्यस्थितीत शाश्वत जल स्त्रोत निर्मिती, पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन व नियोजनपूर्ण वापर ही काळाची गरज आहे. देशातील घरगुती व औद्योगिक पाणी वापराच्या अनुक्रमे ८०% व ९७.५% सांडपाणी निर्माण होते. पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रात प्रतीदिन ३१२ दशलक्ष लिटर मलजल निर्माण होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६३(३), १५४ नुसार व जलप्रदूषण व नियंत्रण अधिनियम १९८६ च्या कलम ६ व कलम २५ अनुसार नागरी भागातील सांडपाण्यावर प्रक्रीया करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रायोगिक तत्वावर एका प्रभागात २०१६ साली सांडपाण्यावर प्रक्रीया करुन पुर्नवापर करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविला आहे. जलप्रदूषण व नियंत्रण अधिनियम १९८६ च्या २०१७ मधील सुधारणामध्ये सांडपाण्याचा पुर्नवापर व पुर्नचक्रीकरण (Recycle and Reuse) यासाठी प्रोत्साहन देण्याचे सूचित केले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२५९/नवि.३३ दिनांक ३० नोव्हेंबर २०१७ रोजी धोरण निश्चित केले आहे.

१. सदर शासन निर्णयानुसार राज्यातील नागरी भागात तयार होणा-या सांडपाण्यावर प्रक्रीया करणे व पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर करणे हे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्राथमिक कर्तव्य राहील. सांडपाणी व्यवस्थापन क्षमता निर्माण करुन त्याचे

,

पुर्नचकीरकरण व पुर्नवापर करणेबाबत शहरासाठी आराखडा तयार करुन (Master Plan) निधीच्या उपलब्धते नुसार त्यांची अमंलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. शहरामध्ये निर्माण होणा-या सांडपाण्यावर द्वितीय व तृतीय स्तरीय प्रक्रीया करण्याच्या अनुषंगाने करावयाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करताना पारंपारीक तंत्रज्ञानाबरोबरच आय.आय.टी/निरी (NEERI) यांच्या मार्फत विकसित केलेल्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानांचा उपयोग प्राधान्याने करण्यात यावा.

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्थापित केलेल्या व भविष्यात स्थापित होणा-या सांडपाणी प्रक्रीया क्षमतेतून निर्माण होणा-या प्रक्रीयायुक्त पाण्याचा पुर्नवापर करण्याचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

i. औष्णिक विद्युत केंद्रांना प्रक्रीयायुक्त पाणी पुरविणेसाठी पुर्नवापर.

ii. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक क्षेत्रांना प्रक्रीयायुक्त पाणी पुरविण्यासाठी पुर्नवापर.

iii. रेल्वे किंवा अन्य मोठया प्रमाणात खरेदीदार यांना प्रक्रीयायुक्त पाणी पुरविण्यासाठी पुर्नवापर.

iv. शहरातील बांधकाम व्यवसायिक, सर्व्हीस सेंटर, लॉन्ड्रीज, इतर व्यावसायिक इमारती, कुलींग टॉवर, हौसिंग सोसायटया, विविध उद्याने ,पार्क, खेळाची मैदाने इ. ठिकाणी होणारा पिण्याच्या व्यतिरिक्त पाण्याच्या वापरासाठी पुर्नवापर.

v. कृषी प्रयोजनार्थ पाणी पुर्नवापर.

४. पिण्यास योग्य नसलेल्या (Non-Potable) घटकांसाठी पाण्याचा पुर्नवापर.

५. यापैकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिक्षेत्रातील उद्योगांना त्यांच्या सभोवतालच्या ५० कि.मी. परिघातील उपलब्ध प्रक्रीया युक्त सांडपाणी प्राधान्याने वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे.

६. नागरी भागातील सांडपाण्यावर प्रक्रिया व पुर्नवापर करण्याच्या अनुषंगाने निर्माण करावयाच्या पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेला निधी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतून किंवा पीपीपीच्या माध्यमातून उभारण्यात यावा. सदर धोरणानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत प्रक्रीया केलेल्या पाण्यापासून मिळणा-या रक्कमेवर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा वित्तीय हक्क असेल.

,

शासनाच्या सदर धोरणास अनुसरुन पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रासाठी पुढीलप्रमाणे धोरण व कृती आराखडा प्रस्तावित आहे.

उद्दिष्ट :

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८९ नुसार नवीन जल स्त्रोतनिर्माण करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठयांच्या ३०% ते ५०% पर्यंत पाणीवापर सांडपाण्यावर प्रक्रीया केलेल्या पाण्याने पुर्नचक्रीकरण व पुर्नवापरच्या माध्यमातून करणे. पिंपरी चिंचवड शहरातील महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ अखत्यारितील औद्योगिक विभाग, हिंजवाडी,चाकण,तळवडे या महाराष्ट्र औद्योगिक महामंडळातील औद्योगिक आस्थापनांना प्राधान्याने पाणीपुरवठा करुन बचत होणारे पाणी पिण्याचे पाणी म्हणून वापर करणेस प्राधान्य देणे आवश्यक आहे.

प्रक्रीयायुक्त पाण्याचा वापर :

- शहरातील औद्योगीक,व्यावसायिक आस्थापनांना पिण्याच्या व्यतिरिक्त (Non-Potable) घटकाच्या वापरासाठी प्रक्रीया पाण्याचा पुर्नवापर करणे बंधनकारक राहील.
- शहरातील महानगरपालिकेतर्फे होणारी बांधकामे तसेच खाजगी बांधकामे,गृहसंकुले याकरीता लागणारे पाणीही प्रक्रीयायुक्त पाणी पुरवठाद्वारे करणे बंधनकारक राहील. शहरातील सार्वजनिक शौचालये, सरकारी आस्थापना, बगीचा,खेळाची मैदाने याकरिता प्रक्रीयायुक्त पाण्याचा वापर केला जाईल.
- शहरात होणा-या नवीन बांधकामांना Dual Plumbing करणे बंधनकारक राहील. बांधकाम परवानगीसाठी एकूण पाण्याच्या साठवणुकीच्या टाकीमध्ये पाणी वापरापैकी Flushing Gardening साफसफाईकरीता ३०% पाणी क्षमता स्वतंत्र Plumbing पध्दती असणे आवश्यक राहील. सदर टाकीमध्ये डासांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी वेळोवेळी उपाययोजना करण्यात याव्या.
- शहरातील पाणी पुरवठयासाठी धातूच्या DI, MS, CI प्रकारच्या वाहिन्या व जोडणी असल्याकारणाने प्रक्रीयायुक्त पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र प्रकारच्या वाहिन्या असणे आवश्यक आहे. प्रक्रीयायुक्त पाण्याच्या वाहिन्या व जोडणी याकरिता HDPE अथवा तत्सम प्रकारच्या सामुग्रीच्या वापर वितरणासाठी करण्यात येईल.

,

- पिण्यायोग्य पाणी व प्रक्रीया केलेले पाणी यांच्या नळ जोडणीचा रंग (शक्यतो लाल) वेगळा असावा. पिण्याचे पाणी जोडणी व प्रक्रीयायुक्त पाण्याची जोडणी चुकीने एकत्र होऊ नये यासाठी वेळोवेळी पाहणी करण्यात यावी.
- शहरातील प्रक्रीयायुक्त पाण्यासाठी स्वतंत्र पाणी मीटर प्रत्येक जोडणीसाठी असेल. स्वतंत्र मीटर रीडिंगची दर महिन्याला पडताळणी घेऊन प्रचलित पाणी दरानुसार देयक वितरीत करण्यात येईल. सदर प्रक्रीयायुक्त पाण्याचे दर प्रचलित घरगुती दराच्या ५०% कमी तर औद्योगिक वापराच्या ५०% इतके असतील.
- प्रक्रीयायुक्त पाण्याकरिता Central Public Health and Environment Engineering organization (CPHEEO) केंद्रीय लोकआरोग्य व पर्यावरण अभियांत्रिक संस्था यांनी दिलेल्या मानांकानुसार(तत्का परिशिष्ठ म्हणून जोडला आहे) बंधनकारक राहतील.
- पिण्याच्या व्यतिरिक्त वापरासाठी सदर प्रकारच्या मानकानुसार पाणी पुरवठयाकरीता Ultra Filtration व Ultra Violet अथवा तत्सम प्रणालीचा वापर मार्गदर्शक तत्वानुसार योग्य राहील.
- तसेच औद्योगिक अथवा इतर संस्थांकडून मागणी झाल्यास Reverse Osmosis तंत्रज्ञानाचा वापर करुन पिण्यायोग्य पाणी तयार केले जाऊ शकते. यासाठी मागणीनुसार व्यवहार्य प्रस्ताव महानगरपालिका आवश्यकतेनुसार यंत्रणा राबवू शकते.
- दुष्काळ अथवा पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे आणीबाणीच्या प्रसंगामध्येही नदीपात्रात व तळयात पाणी साठवणूक करुन Reverse Osmosis अथवा तत्सम तंत्रज्ञानाद्वारे पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जाऊ शकतो. सदर प्रकारच्या तांत्रिक निर्णय IIT Bombay व NEERI या अग्रगण्य संस्थेतील तज्ञांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात येईल.
- सदर प्रक्रियायुक्त पाणी पुरवठयाकरीता सल्लागारामार्फत शहरासाठी विस्तृत आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर मास्टर प्लॅननुसार शहराच्या भौगोलिक रचनेनुसार चार भाग करण्यात आले आहेत.

१. भाग क्र.१ : पिंपळे सौदागर, वाकड, हिंजवाडी, MIDC चिंचवड

२. भाग क्र.२ : चिखली MIDC

३. भाग क्र.३ : निगडी प्राधिकरण व तळेगाव MIDC

४. भाग क्र.४ : चाकण MIDC

,

- सदर प्लॅननुसार संपूर्ण शहरासाठी प्रतीदिन १२० दशलक्ष लिटर एवढया प्रक्रीयायुक्त पाण्याचा वापर केला जाऊ शकतो. याशिवाय हिंजवडी, चाकण, तळेगाव MIDC Area साठी प्रतीदिन दशलक्ष लिटर प्रक्रीयायुक्त पाण्याचा वापर केला जाऊ शकतो.
- सदर प्रक्रीयायुक्त पाण्याच्या वितरणाकरीता संपूर्णपणे नवीन जाळे आर्थिक दृष्टया व्यवहार्य नसल्याने याअनुषंगाने ६०७ किं.मी.चे प्राथमिक जाळे उभारणी आवश्यक आहे. व गरजेप्रमाणे पुढील जाळे विस्तारित करता येईल.
- या मास्टर प्लॅनपैकी पहिल्या टप्यामध्ये स्मार्ट सिटीच्या अंतर्गत Area Base Development (ABD) मधील पिंपळे सौदागर, व वाकड, हिंजवडी MIDC Area याकरीता कासारवाडी मलनि:सारण प्रक्रीया केंद्रातून प्रतीदिन ७५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करणे प्रस्तावित आहे.
- च-होली मैलाशुध्दीकरण केंद्रातुन प्रक्रीया केलेले पाणी या भागात नव्याने विकसित होत असलेल्या बांधकाम व्यवसायासाठी व सोसायटयांसाठी पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी करणेचे प्रस्तावित आहे.
- या पहिल्या टप्याची उपांगे पुढीलप्रमाणे आहेत.

१. Ultra Filtration व Ultra Violet पध्दतीचा वापर करुन प्रतीदिन ७५ दशलक्ष लिटरचे प्रक्रीया केंद्र कासारवाडी येथे उभारणी करणे तसेच पंपींग केंद्र उभारणे व चिखली येथे प्रतीदिन ५ दशलक्ष प्रक्रीया केंद्राची उभारणी करणे.

२. प्रक्रीयायुक्त पुर्नवापराकरीता २८५ कि.मी. चे पाणी वितरण व्यवस्था उभारणे.

३. ५ ML क्षमतेचे जलकुंभ कासारवाडी MIDC येथे १ दशलक्ष लिटर क्षमतेचे २ जलकुंभ वाकड आणी पिंपळे सौदागर, हिंजेवाडी फेज १ येथे ०.७ दशलक्ष लिटर फेज २ येथे ०.५५ दशलक्ष क्षमतेचे २ आणि हिजेंवाडी फेज ३ येथे १.९ दशलक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ उभारणे.

४. सदर योजनेचा एकूण अंदाजे खर्च रुपये ४०० कोटी इतका असेल.

- अंदाजित खर्च केवळ महानगरपालिकेच्या स्व:निधीतून करणे शक्य नाही. प्रकल्पातील तंत्रज्ञानाची जोखीम उचलण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नाही. प्रक्रीयायुक्त पाण्याची मागणी व पुरवठाचा समन्वय साधण्यासाठी मोठया प्रमाणात विपणन व्यवस्था असणे आवश्यक आहे.

,

- औद्योगिक व व्यापारी वापरासाठी पाण्याची गुणवत्ता राखणे व खर्च समपातळीत व कमीतकमी ठेवणे याकरिता प्रकल्प खाजगी लोक सहभागातून (PPP पध्दतीने) राबविण्यासाठी प्रस्तावित आहे.
- नमामी गंगे व NHAI सारख्या राष्ट्रीय महत्वाच्या प्रकल्पामध्ये प्रचलित Hybrid Annuity Model पध्दतीचा वापर प्रस्तावित आहे. त्यानुसारही हा प्रकल्प राबविता येईल.
- सदर पध्दतीमध्ये महानगरपालिकेतर्फे ४०% भांडवलीखर्च कंत्राटदारास प्रकल्प उभारणीच्या कालावधीत टप्याटप्याने प्रस्तावित राहील उर्वरित ६०% हिस्सा प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून ७ वर्षात त्रैमासिक पध्दतीने वितरीत करण्यात येईल.
- प्रकल्प उभारणीचा कालावधी २ वर्ष अधिक देखरेखीचा कालावधी २० वर्ष प्रकल्प उभारणीचा एकूण कालावधी राहील. प्रकल्पासाठीची जागा खाजगी कंत्राटदारास लायसन्स पध्दतीने वापरण्यासाठी दिली जाईल. त्यासाठी प्रतिवर्षी प्रत्येक स्केअर मीटरसाठी १ रुपया दर आकारणी प्रस्तावित आहे.
- विकासकास देखभाल दुरुस्तीसाठी प्रती मासिक पध्दतीने खर्च अदा करण्यात येईल सदर खर्च TAKE OR PAY पध्दतीने ठराविक क्षमतेसाठी अदा करण्यात येईल.
- खाजगी कंत्राटदार/विकासकास सध्याचे मलनिस्सारण प्रक्रीया केंद्र व प्रस्तावित तृतीय स्तरीय प्रक्रीया केंद्र या दोन्ही घटकाची जबाबदारी करारनाम्यानंतर हस्तांतरीत करण्यात येईल. खाजगी कंत्राटदार/विकासकास तृतीय स्तरीय (Third Treatment) प्रक्रीया अनुषंगाने आवश्यक बदल मलनि:स्सारण प्रक्रीयात करता येईल.
- प्रक्रीयायुक्त पाणी TAKE OR PAY पेक्षा जास्त विकले गेल्यास कंत्राटदारास Incentive, Bonus रक्कम देण्यात येईल. प्रक्रीयायुक्त पाणी मानकानुसार न दिल्यास कंत्राटदाराच्या देय रक्कमेतून दंड रक्कम वळती करण्यात येईल.
- महानगरपालिका वतीने विकासातर्फे Public Awareness Campaign वेळोवेळी राबविण्यात येईल. सदर खर्च प्रक्रीया सात वर्षासाठी भांडवली खर्चात समाविष्ठ असेल, तदनंतर महानगरपालिकेच्या अनुमती देखभाल दुरुस्ती खर्चात समाविष्ठ करण्यात येईल.

,

- मलनि:स्सारण प्रक्रीया केंद्रामध्ये बदल करतांना Biogas निर्मिती/Sludge पासून खत निर्मिती केल्यास सदर प्रकार उत्पन्न विकसकास करारनाम्यांच्या कालावधीत मिळवता येऊ शकेल.

  प्रकल्प अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १७७ ६६अ, कलम ६६ च्या पोटकलम ४१ अ नुसार लोक खाजगी सहभागातून (PPP) पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर प्रक्रीया केंद्र व यंत्रणा उभारणी, व कलम १०९ नुसार विविध निधी पुरवठादाराद्वारे निधी उभारणेसाठी मा.आयुक्त यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे. तरी मा.आयुक्तसो यांना सदर प्रकल्पासाठी प्राधिकृत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. बाबासाहेब त्रिभवून** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.राहुल कलाटे -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब काल या विषयावर प्रेझेंटेशन जे आपल्या कार्यालयामध्ये दिले गेले. शहरासाठी दररोज ७५ एमएलडी पाणी तुम्ही तयार करणार आहात. पाण्याची अवस्था काय आहे. असं म्हणल जातं की जगातल पुढच युध्द कशासाठी होईल तर ते पाण्यासाठी होईल. अशावेळी आपण हा विषय आणला आहे. या विषयावर साहेब काल ही चर्चा झाली त्याप्रमाणे आपण जे म्हणतोय की सात टक्के खाजगी भागीदार असावा असे प्रस्तावित आहे. त्यामध्ये खाजगी भागीदार व्याज लावणार आहे. त्यापेक्षा महापालिकेने हे जर केले तर ते व्याज आणि आपण केलेली फिजीबीलीटी हे आपण चेक करावे आणि आमचा परिसर सौदागर असेल, वाकड असेल खरतर हिंजवडी या परिसरामध्ये जास्तीत जास्त सोसायटया आहेत. त्या परिसरामध्ये पहिल्या तुम्ही घ्याव्यात. आणि हा प्रोजेक्ट करताना म्हणजे खूप दिवसांनी चांगला प्रोजेक्ट सभागृहासमोर येतोय असं प्रथमदर्शनी तरी आम्हाला वाटतय. तर याची पुढची प्रक्रिया आपण व्यवस्थित राबवावी. अशी मी आयुक्त साहेब आपल्याला विनंती करतो. आणि खाजगी करण्यापेक्षा आपण पालिकेकडून जर केला तर खरच ७५ एमएलडी चांगले पाणी उपलब्ध झालं तर निश्चितच आज जी बोअरची परिस्थिती आहे. आमच्या भागामाध्ये तीन-तीन, चार-चार हजार बोअर झाल्या आहेत. तर लोकांना कुठेतरी हा सपोर्ट या प्रोजेक्टच्या माध्यमातून मिळेल फक्त सौदागर, वाकड या सोसायटया भागामध्ये आपण डिस्ट्रीब्यूशन करताना

,

पाईपलाईन करताना ती कशी करणार. नव्याने आता आपण टेंडर काढलेले आहे. हया सगळया गोष्टींचा आपण विचार करावा. आपण घाईघाईमध्ये ही प्रक्रिया न राबविता व्यवस्थित अभ्यास आपण करावा. अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.मंगला कदम -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. प्रत्येक विषयामध्ये काय होतं माझं काही म्हणणे नाही. गटनेत्यांबरोबर मिटींग झाली पाहिजे. परंतु ज्यावेळेला विषय येतो त्या वेळेला त्याचा खुलासा सर्व सभासदांना झाला पाहिजे. जर सभासदांना खुलासा झाला नाही तर सभागृहामध्ये आणि मागे जे पत्रकार आहेत. त्या लोकांना काही कळणार नाही. तर विषयाचे गांभीर्य आज जर आपण म्हणतो की पाणी रिसायकल करणे ही काळाची गरज आहे सर. हा विषय आम्ही मागे पण केलेला आहे. आमचं दुमत नाही. परंतु हे तुम्ही आता चार सांगितलेत पिंपळे सौदागर असेल, चिखली असेल, निगडी प्राधिकरण असेल, चाकण असेल. तुम्ही पीपीपी तत्वावर करणार आहात. त्यात कोणत्या कंपन्या तुमच्याकडे येणार आहेत. कोण देतात साठ टक्के शेअरींग. माझ म्हणण हेच आहे की हया सभागृहामध्ये हे चार लोक जर सोडले तर बाकीच्या हया कोणाला माहिती आहे का विचारा बरं. एकाने सांगावे की आम्हाला हा सगळा विषय माहित झालाय. कोणालाही विचारा तुम्ही की हा विषय समजला आहे का. फक्त चार लोकांमध्ये हा विषय होत नाही. किंवा राहुल म्हणाले की माझ्या वॉर्डामध्ये करा असं होत नाही, सगळीकडे करा. आख्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये करा.

[ सभागृहामध्ये गोंधळ ]

**मा. महापौर** – ताई हे सुध्दा प्रेझेंटेशन आपण २४ तारखेला सोमवारी ठेवू.

**मा. मंगला कदम –** मा.महापौर साहेब, म्हणूनच माझं हेच म्हणण आहे की विषय आपण मंजुर करतो. मला असं म्हणायच आहे की सगळया सदस्यांना पण कळू दया ना. की आपण पाण्यावर कशा प्रकारे प्रक्रिया करणार आहेत. ज्याठिकाणी हा प्रोजेक्ट राबविला गेला. तिथे त्या नागरीकांना पाणी मिळतं का. हा पण विषय बघितला गेला पाहिजे ना. का करोडो रुपयांची आपण लाईन टाकणार आहे. आणि ते पाणी मिळणार नाही. आज माझ्याकडे प्रोजेक्ट करुन दोन वर्षे पुर्ण झालेली आहेत. आज एकदा सुध्दा नागरीकांना त्याच्यातून स्टारटींगला आपण घेत होतो. परंतु त्याच्यानंतर एक आठ-पंधरा दिवसांनंतर ते पाणी परत

,

नागरीकांना मिळत नाहीय. त्या त्या वेळेला वारंवार मी चौकशी करते. ते काय सांगतात इथं लाईन ब्रेकअप झाली. तिथं लाईन ब्रेकअप झाली. मग तो मेटेंनन्स करणार होता तो आख्या शहरासाठी राबवणार आहात. मग हया गोष्टीसाठी ज्यावेळेला आपण विचार करतो. आपण हे बघितल गेले पाहिजे. आपण राबविणार आहात ती आमची इच्छा आहे. ही शहरामध्ये गार्डन्स असतील. सगळया काही गोष्टी असतील. ज्यांना ज्यांना पाणी पाहिजे त्यांना हे पाणी दिलं गेल पाहिजे. परंतु हे पाणी देताना आपण त्याच्यामध्ये किती प्रकार आहेत. जर पहिल्यांदा ट्रायल बेसवर केल आहे. तिथे हे पाणी मिळत का. तुम्ही एक चौकशी केली का. प्रेझेंटेशन ज्यांनी बघितले त्यांनी हा प्रश्न विचारला का. की जिथं आपण ही ट्रायल घेतलेली आहे त्या भागाला पाणी मिळत का. तर तुम्ही आज चौकशी करा. माझ्या वॉर्डामध्ये ट्रायल घेतलेली आहे. माझ्याकडे एक कोटीची लाईन टाकून झाली. त्याच्यानंतर त्या माणसाने आम्हाला किती दिवस पाणी दिले, त्या लाईनवरुन आम्हाला किती दिवस पाणी मिळाले. आठ दिवस सुध्दा मिळाले नाही. केशव घोळवे आहेत इथं ते सांगतील. तक्रार सगळीकडे आहे. आम्हाला त्या लाईनमधून पाणीच मिळालेले नाही लोक मागतात. आणि एकतर पाण्याचे शॉर्टेज झाले तर लोक म्हणतात की आम्हाला तुम्ही ते पाणी दया. परंतु त्याच्यावर त्या नळाला पाणी येत नाही. २४ तासामध्ये कधीही ते पाणी येत नाही. मग हे करताना सारांसार हया सगळया गोष्टींचा विचार केला गेला पाहिजे. आपण हे करताना हया सगळया गोष्टी बघा. हे केल्यानंतर ते पाणी लोकांना मिळणार आहे का. का दर वेळेस खोदाई केली. लाईट फुटली, तुटली परत ती दुरुस्तच करणार नाही. मा. कमिशनर साहेब या गोष्टींचा पहिला सारांसार विचार करा. तुम्ही सोमवारी जे प्रेझेंटेशन देणार आहात त्याबरोबर हे देखील दाखवा. पण मग आमच्या इथं का पाणी येत नाही हा पण खुलासा करा ना मग त्यातून. आज लोकांना आपण शॉर्ट पाणी देतोय. पूर्वीसारखे पाणी नाही देत. तर मग तुम्ही लाईन टाकलेले मॉडेल वॉर्ड त्याच्यामध्ये तुम्ही देता की नाही. देता की नाही हे तुम्ही पहिलं बघून घ्या. आणि मग मा. कमिशनर साहेब तुम्ही या गोष्टींवर जा. माझा विरोध नाही. आख्या शहरामध्ये करा काळाची गरज आहे. परंतु ज्याठिकाणी आपण केलय त्याठिकाणी होऊ शकत की नाही हे बघा ना.

**मा.एकनाथ पवार** – सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर पाणी हा विषय सर्व लोकांसाठी खूप महत्वाचा आहे. मा. महापौरांनी २४ तारखेला सोमवारी

,

प्रेझेंटेशन दाखविण्यापेक्षा ताई पाण्याच्या रिसायकलींगच्या संदर्भामधले प्रेझेंटेशन आता आपण सभागृहामध्ये बघु. खर आहे की आपल्याला माझ्या अगोदर कोणीतरी सांगितले की पुढचे महायुध्द पाण्यासाठी होईल. राहुलदादा ही वस्तुस्थिती आहे. आणि खरतर पाणी आपण आणायचे किंवा आता जे पाणी वाया जातं. पाणी वाया जाण्याच्या मधून जे आपल्याला पुढच्या काळामध्ये पाण्याची बचत होणार आहे. खरतर पुन्हा एकदा त्याच्यासाठी सर्व सन्माननीय आणि खरतर सगळया नगरसेवकांना बोलावल होते. आज सभागृहामध्ये मॅक्झीमम नगरसेवक उपस्थित आहेत. दहा मिनिटांचा वेळ जाईल. मला असं वाटतं की मा. महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो की याठिकाणी पाण्याच्या रिसायकलींग संदर्भामधले प्रेझेंटेशन सभागृहाच्या समोर आता सादरीकरण करावे. आणि मग या विषयाला मंजुरी दयावी.

**मा. महापौर –** सादरीकरण करावे.

**मा.आयुक्त –** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृह. पिंपरी चिंचवड शहरामधील पाण्याच्या बाबतीत मागच्या वेळेला या सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली त्यावेळेला महत्वाचा जो मुद्दा मांडला होता तो असा होता की पाण्याची स्थिती ही सर्वंकष आणि भविष्यासाठी ही सस्टेनेबल पध्दती सुधरायची असेल तर ज्या पध्दतीने आपण धरणातील पाण्याचा किंवा नदीतील पाण्याचा वापर करणार आहोत त्या सोबतच पाण्याचा पुर्नवापर, पुर्नचक्रीकरण हे देखील तितकचे महत्वाचे राहणार आहे. अन्यथा भविष्यामध्ये या शहराला पाण्याचा तुटवडा भासेल. त्याच भूमिकेला अनुसरुन आपण राज्य शासनाने केलेली पॉलिसी, त्या अनुषंगाने निर्गत केलेला जीआर यापुर्वी इतर अन्य शहरामधल्या महानगरपालिकांनी केलेली पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर धोरणाची अंमलबजावणीचे उदाहरण हे विचारात घेऊन आपण पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठयाच्या सस्टेंनेबीलीटीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सांडपाण्यावरती प्रक्रिया करुन पुर्नचक्रीकरण आणि पुर्नवापराची ही पॉलीसी, धोरण आपण तयार करतो आहोत. सुरवातीलाच मी सांगतो की याच्यामध्ये आपण टारगेटेड एरियाज आयडेंटीफाय केलेले आहेत. पण अजुन एक्झॅट प्रकल्पांची निविदा प्रक्रिया आपण सुरु केलेली नाही. धोरण मंजुरीनंतर त्याचा एक्झॅट डीपीआर तयार करुन आपण त्याची निविदा प्रक्रिया करणार आहोत. धोरणामध्ये केंद्र व राज्य शासनाने प्रत्येक महानगरपालिकेला मँडेंट दिलेले आहेत की महानगरपालिकांनी त्यांच्या शहरात निर्माण

,

होणा-या सांडपाण्याचा पुर्नचक्रीकरण आणि पुर्नवापर करुन कशा रितीने त्याचा वापर करायचा, याचेही धोरण अवलंबणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवरती जर पुर्नचक्रीकरणाचा वापर कसा होतो त्याचा जर विचार केला तर सिंगापूर, इस्त्राईल यासारख्या राष्ट्रांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी सुध्दा पुर्नचक्रीकरण करुन केलेल्या पाण्याचा वापर सुरु झालेला आहे. अन्य काही देशांमध्ये पिण्याचे सोडून अन्य जे सेकंडरी युजेस आहेत याच्यासाठी पुर्नचक्रीकरण केलेल्या पाण्याचा वापर सुरु झालेला आहे. भारतामध्ये देखील औदयोगिक वापरसाठी पुर्नचक्रीकरण केलेल्या पाण्याचा वापर सुरु झालेला आहे. नागपुर महानगरपालिकेमध्ये मी कार्यरत असताना ११० एमएलडी पाणीपुरवठावर सांडपाण्यावरती वेगवेगळया ट्रीटमेंट करुन आपण तो कोराडी येथील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाला हे पाणी विकल आणि त्यांनी पुन्हा पुर्नचक्रीकरण केलेल्या ११० एमएलडी पाण्याचा वापर करुन त्यांच्या वापरासाठी ते पाणी वापरलं. जेवढ पाणी ते धरणातून रॉ वॉटर म्हणून उचलत होते. त्याच्या बदल्यात आपण त्यांचे आरक्षण या माध्यमातून स्वॅप करु शकलो आणि नागपूर शहराला अधिक पाण्याची उपलब्धता त्याच्या माध्यमातून आपण निर्माण करुन देवू शकलो. त्याच पध्दतीने याच धर्तीवरती केंद्रशासनाच्या वीज विभागाने ट्रान्सफर थ्रू टॅरीफ या नावाची पॉलिसी आणली. ज्या ज्या ठिकाणी शहराच्या ५० किमी परिघामध्ये कुठेही औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प जर असेल तर त्या शहराच्या सांडपाण्यावरती प्रक्रिया करुन निर्माण होणारे चांगले पुर्नचक्रीकरण केलेले पाणी औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांनी वापरावे आणि त्यासाठी होणारा खर्च हा औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाने करावा. आणि त्याचा खर्च ट्रान्सफर थ्रू टॅरीफ या पॉलीसीच्या माध्यमातून अंतिम युजरकडे ट्रान्सफर करावा. या धोरणाचा भाग म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देखील या सर्व पर्यायांचा विचार करुन आपल्या शहराची परिस्थिती, आपल्या शहरामध्ये एकूण कंझुमेअर करण्यासारखे दर्शनी ट्रीटेड वॉटर कंझंमशन कोण करु शकतील याचा एकदंरीत अभ्यास करुन आपण हे धोरण आता सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेलं आहे. धोरणामध्ये जर आपण माहिती घेतली तर साधारणत: आपण आज ५०० एमएलडी पाणी दररोज उचलतो. त्यापैकी एक्च्यूएल जर वापर गळती वगैरे वगळता आपण गृहीत धरला तर साधारणत: ३५० एमएलडी इतके पाणी एक्च्यूएल आपल्याकडे कंझूम होते. आणि त्याच्या माध्यमातून साधारणत: २७० ते २९० एमएलडी इतके आपल्याकडे सिव्हेजची दररोजची निर्मिती होते. या सिव्हेजमध्ये आपल्या शहरामध्ये विविध ठिकाणी ३३३ एमएलडी कॅपॅसिटीचे सिव्हेज ट्रिटमेंट प्लँटची क्षमता आज

,

आपल्याइकडे प्रस्तावीत ऑलरेडी अस्तित्वात आहे. अन्य तीन ठिकाणी जे अनकव्हर्ड एरियाज होते त्या भागामध्ये आपण ऍडीशनल कॅपॅसिटीचे करतो आहोत. या सगळयांचा एकत्रित विचार करता भविष्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये सिव्हेज ट्रीटमेंट वॉटर आज आपल्याकडे तयार होतेय. हे सध्याच्या स्थितीमध्ये आपण काही सेकंडरी युजेससाठी वापरतोय. जस की गार्डन विभाग आपल्याकडे टॅंकरच्या द्वारे याच सिव्हेज ट्रीटमेंट प्लॅंटमधन पाणी भरुन आपल्याकडे गार्डन्स्ला वापरतात. काही ठिकाणी सीएमईला आपण त्याच पाणी देतो. काही गार्डन्समध्ये पाणी वापरले जाते. भविष्यामध्ये अन्य कुठल्या प्रकारचा वापर याच्या माध्यमातून आपल्याला करता येईल. त्याचा आपण याच्यामध्ये विचार केला आहे. आणि याच्या अनुषंगाने राज्य शासनाने दरम्यानच्या कालावधीमध्ये ३० नोव्हेंबर २०१७ रोजी नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर धोरण निश्चित करणेबाबत जो शासन निर्णय निर्गमित केला. त्याच्या अनुषंगाने अभ्यास करुन जलप्रदूषण व नियंत्रण अधिनियम १९८६ च्या सुधारणांचा विचार करुन आपण आपल्या शहराचे धोरण तयार करतो आहोत. या धोरणामध्ये महत्वाची जी बाब राहील ती आपल्या शहरामध्ये पुर्नवापर करण्यासाठी कोणते घटक तयार आहेत. आपल्या शहराचा जर विचार केला तर आपल्या शहरामध्ये मोठया प्रमाणामध्ये औद्योगिक केंद्रे आहेत काही औद्योगिक घटक आहेत. कमर्शियल घटक आहेत आणि मोठया प्रमाणामध्ये रेसिडेन्शियल घटक आहेत. यासोबतच आपल्या दोन्ही बाजूला चाकण आणि तळेगाव ही इंडस्ट्रीयल इस्टेट आहे. तसेच हिंजवडीमध्ये आपल्याकडे सॉफ्टवेअर पार्क आहे. यांचा देखील पोटेंशियल कस्टमर म्हणून आपण या पूर्ण धोरणामध्ये विचार केलेला आहे. यासोबत जो आपल्या शहरातील वॉटर डेक्सीज एरियाज आहेत जे आपल्या टेलला आहेत. जसं की वाकड, पिंपळे सौदागर, पिंपळे निलख हया स्वरुपांचे ते भाग आहेत. त्यांना देखील या भागामध्ये नवीन विकसित होत असताना अनेक सोसायटयांना सेकंडरी पाईप लाईनची देखील तरतूद आपल्याच बांधकाम परवानगी विभागाच्या डीसीआरमध्ये असल्याने त्याठिकाणी सेकडंरी पाईप लाईनची उपलब्धता अनेक इमारतींमध्ये आहे. हया सा-यांचा विचार करुन या सगळया पुर्नवापर केलेल्या पाण्यासाठी पुर्नचक्रीकरण केलेल्या पाण्याचा वापर करण्यासाठी जो काही टारगेट एरिया आहे. तो आपण या सगळया बाबींचा विचार करुन धोरणानुसार आपल्या शहराचा विचार करतो आहोत. आता हे पुर्नचक्रीकरण कशा रितीने होणार याची जर आपण थोडक्यात माहिती घेतली तर याच्यामध्ये सेकंडरी ट्रीटमेंट आज आपल्याकडे प्रत्येक एसटीपीला उपलब्ध आहे. सेकंडरी

,

ट्रीटमेंटनंतर जे काही पाण्याची निकष जे आहेत हे डेली क्वॉलिटी पाण्याचे निकषापर्यंत आपण आज त्याचे ट्रीटमेंट करत असतो. आणि याच्यामध्ये आपल्याला सुधारणा करुन आपल्याला पोटेबल ग्रेडपर्यंत पाण्याची आज आपल्याला सुधारणा करायची असेल तर त्यासाठी दर्शनी ट्रीटमेंट वॉटर आपल्याला आणाव लागतय आणि त्यामुळे एक ॲडीशनल ट्रीटमेंट प्लॉट आपल्याला आपल्या एसटीपीमध्ये ॲड करावा लागेल. आणि याकरीता Reverse Osmosis या तंत्रज्ञानाचा आपण वापर करणार आहोत. Reverse Osmosis हे तंत्रज्ञान आहे.

[ एलईडी स्क्रीनवर सादरीकरण दाखविण्यात आले ]

**मा.आयुक्त-** मा.महापौर सहेब, याच्यामध्ये या चित्रामध्ये दाखविल्याप्रमाणे हे मेमरेन्स वापरली जातात. बायोलॉजिकली मेमरेन्सचा वापर करुन याच्या माध्यमातून आपण विविध प्रकारचा सूक्ष्मातील सुक्षम आकाराचा जे काही प्रदूषक आहे त्या सगळयांचे आपण त्याच्या मधून विलगीकरण करत असतो. याच्यामध्ये जर आपण थोडक्यात पाहिलेतर याच्यामध्ये साधारणत: मोठे जे घटक असतात ते म्हणजे कोल्स पार्टीकल म्हणजे कोळशाचे घटक असतात. ते मोठया आकाराचे असतात. त्यांचा साधारणत: १०० ते १००० मायक्रो मि.मी. इतका आकार असतो. मातीचे कण असतात, वाळूचे कण असतात. विविध प्रकारचे त्याच्यामध्ये असते. बॅक्टेरिया असतात, जिवाणू असतात, विषाणू असतात. हवेतील जी डस्ट असते ती त्याच्यामध्ये विरघळलेली असते. हे जे घटक आहेत हे सेकंडरी ट्रीटमेंट मधून देखील बाहेर पडलेले असतात. आणि त्यांचे फरदर फिलट्रेशन करण्याची आवश्यकता ट्रिटमेंटला आहे. याच्या खाली जाऊन व्हायरेसेस आहेत. डिझॉल्ट सॉल्ट आहेत की जी जीवनास अपायकारक आहेत. हे देखील लेव्हलला असतात. आणि सगळयात त्याच्याखाली काही एक्टीव्हेटेड अल्टरस असतात. जर आपण Reverse Osmosis या तंत्रज्ञानाचा वापर केला तर ०.००१ मायक्रॉन या साईजचे देखील फिल्ट्रेशन याच्यामधून पॉसीबल आहे. आणि हे तंत्रज्ञान वापरुन आपण पोटेबल ग्रेडचे पाणी देखील त्याच्या माध्यमातून निर्माण करु शकतो. याच्यामध्ये बॅक्टेरिया, व्हायरेसेस यांच्यावरती देखील कार्यवाही करतो. याच्यासाठी आपण सपोर्टीव्ह असे युव्ही तंत्रज्ञानाचा देखील वापर याच्यामध्ये प्रस्तावीत करतो आहोत. युव्हीचा वापर केल्यामुळे जे विषाणू असतात. ते विषाणू मधील डीएनएस स्ट्रक्चर ब्रेक करण्यासाठी युव्ही किरण उपयुक्त ठरतात आणि त्याच्यानंतर विषाणुंचा देखील नायनाट केला जातो.

,

आणि अशा माध्यमातून आपण सीपीएचओ, एमआयडीसी यांनी जे प्रस्तावीत केलेले पॅरामीटर्स आहेत हया पॅरामीटर्समध्ये बसणारे असं ग्रेडचं पाणी आपण याच्यामध्ये बनविणार आहोत. आज जरी आपल्याला पोटेबल ग्रेडसाठी आपण पुर्नचक्रीकरण वापर प्रस्तावीत करत असलो तरी भविष्यात विशेष असा दुष्काळ पडल्यास शहराची वाताहत होऊ नये या करीता आपल्याला तो रेडीनेस ठेवायला पाहिजे. युव्ही, Reverse Osmosis या दोन्ही तंत्रज्ञानाचा वापर करुन भविष्यात असा कधी आयुष्यात प्रश्न येऊ नये अशीच सर्वांची इच्छा आहे. मात्र जशा पध्दतीचे उदगार आज आपण सभागृहामध्ये ऐकलेत. अनेक लोकं तसे उदगार काढतात. भविष्यातील युध्द हे पाण्यावरुन होतील. अशी परिस्थिती उदभवू नये आणि आपल्याला जर अशी वेळ आलीच तर आपल्याकडे तशी काही तरी तयारी असावी. याची एक कुठेतरी आपल्याकडे रेडीनेस याच्या माध्यमातून राहणार आहे. त्यामध्ये ही टेक्नॉलॉजी वापरली जाते. हे आरओची सिलेंडरस आहेत. याच्या मध्यामातून आपण संपुर्ण ट्रीटमेंट करतो. याच्यापुढे आपण युव्हीचे फिल्टर लावतोय. युव्हीचे फिल्टरच्या माध्यमातून ट्रिटेट करुन अंतिमत: फिल्टर वॉटर आपल्याकडे उपलब्ध होणार आहे. त्याच्या टेक्नॉलॉजीची एक छोटशी फिल्म आहे. .२ मॉयक्रॉन या आकाराचे फिल्ट्रेशन या टेक्नॉलॉजीमधून होत असते. हे फायबरच्या माध्यमातून इतक्या लहान आकाराचे कण त्याच्या माध्यमातून आत जातात आणि ते बाकीचे कण बाहेर अडकून राहतात आणि शुध्द पाणी आतमध्ये फिल्ट्रेट होऊन वाहून नेले जाते अशा पध्दतीची ही टेक्नॉलॉजी आहे. आणि असा सगळा अभ्यास केल्यानंतर आपण प्राथमीक तत्वावर फर्स्ट पेजमध्ये सगळयात जे चांगले स्टॅटेजेकली लोकेटेड आपल्याकडे येतो, एसटीपी आहे तो आहे कासारवाडी येथील. तिथे १२० एमएलडीची ट्रीटमेंट कॅपॅसिटी आज आपल्याकडे उपलब्ध आहे. साधारणत: ८० एमएलडी पाणी आज आपण तिथे दररोज ट्रीट करीत आहोत. तो सेकडंरी ट्रीटमेंट प्लॉट आहे त्याचा आपण प्लँटमध्ये जर कन्व्हर्ट केले तर त्याठिकाणी सुमारे ७५ एमएलडी पर डे इतक्या साठयाचे आपल्याकडे सेकंडरी ट्रीटेट पाणी उपलब्ध होणार आहे. आणि मग त्या भागामध्ये ७५ एमएलडी पाणी जे उपलब्ध होईल ते कुठल्या कुठल्या जवळच्या भागामध्ये आपल्याला ते विकता येऊ शकते किंवा वापरता येऊ शकते याचा विचार करणारे हे चित्र आपल्यासमोर सादर करीत आहोत. याच्यामध्ये जर महत्वाचा विचार जर केला तर आपल्या उत्तरपूर्व भागामध्ये हा इंडस्ट्रीयल एरिया आहे त्याठिकाणी मोठया प्रमाणामध्ये आपल्याला हे पाणी उपलब्ध करुन देता येऊ शकते. भोसरी त्याचबरोबर इंडस्ट्रीयल बेट आहेत. त्याच्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये पाण्याची

उपलब्धता होऊ शकते. यासोबत पिंपळेसौदागर, वाकड आणि याला लागूनच असलेला हिंजवडीचा मोठा जो वाढीव होत असलेला भाग येथे देखील कमर्शियल आणि सेकडंरी रेसिडेन्सीयल वापरासाठी इंडस्ट्रीयल वापरासाठी या पाण्याचा वापर होऊ शकतो. त्यासाठी आपल्याला केवळ ट्रीटमेंट प्लॉंटच निर्माण करावे लागणार नसून त्यासोबत आपल्याला त्याची यंत्रणा डिस्ट्रीब्यूशन सिस्टीम देखील तयार करावी लागेल. आणि त्याच्यामध्ये काही डिस्ट्रीब्यूशन मेन लाईन्स, सेकंडरी लाईन्स आणि काही ठिकाणी गरज पडल्यास हिंजवडी मधली मोठी डिमांड आपल्याकडे येत आहे ती जर टॅकल करायची म्हटलं तर आपल्याला काही टाक्यांची व्यवस्था याच्यासाठी वेगळयाने करावी लागेल. यासोबतच ज्या इमारतींना सेकंडरी पाईपलाईनची व्यवस्था आहे त्यांच्यापर्यंत आपल्याला डिस्ट्रीब्यूशन नेटवर्कची देखील व्यवस्था करावी लागेल. साधारणत: या प्राथमिक व्यवस्थेकरीता सुरुवातीला ६०० कि.मी.च नेटवर्क आपल्याला क्रिएट कराव लागेल असे सुरुवातीचे आपले एस्टीमेट आहे. डिटेल एस्टीमेट केल्यानंतर त्याचे डिटेल्स आपल्यासमोर येतील. एकंदरीत आपल्याला याच्यामध्ये साधारणत: चार ते पाच ठिकाणी आपल्याला टाक्या उभ्या कराव्या लागतील. जेणेकरुन आपल्याला हिंजवडी पर्यंत देखील याच पाणीपुरवठा करता येऊ शकेल. या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करण्याकरीता पिंपळेसौदागर, वाकड हिंजवडी, एमआयडीसी फेज वन, चिखली एमआयडीचा फेज टू, निगडी प्राधिकरण आणि तळेगाव एमआयडीसी मध्ये फेज थ्री आणि शेवटी चाकण एमआयडी पर्यंतचा फेज फोर अशा स्वरुपाची आपण फेजवाईज रचना आपण आता सध्या प्रस्तावित करीत आहोत. या पध्दतीने काम करीत असताना आपल्याला जो वेस्ट एनर्जी प्लॉंट आहे. वेस्ट एनर्जी प्लॉंटला देखील आपण पुर्नचक्रीकरण केलेलेच पाणी प्रस्तावित केलेले आहे. आणि ५ एमएलडी चिखलीच्या एसटीपीमधून आपण त्याचा पुर्नवापर करणे प्रस्तावित करतो आहोत आणि त्यासाठी देखील तीथे ट्रीटमेंट प्लॉंटची आवश्यकता आहे. या पध्दतीने आपल्याला अल्ट्रा फिल्ट्रेशन आणि अल्ट्रा व्हॉयलेट पध्दतीचा वापर करुन ७५ एमएलडीचे प्रक्रिया केंद्र आपल्याला कासारवाडी येथे पहिल्या टप्प्यामध्ये उभे करणे चिखली येथे प्रतिदिन पाच एमएलडी प्रक्रिया केंद्र आपण निर्माण करणे आणि त्याकरीता वितरण व्यवस्था निर्माण करणे असं पहिल्या टप्प्यामध्ये या धोरणाचा भाग म्हणून आपण प्रस्तावित करतो आहोत. याठिकाणी एकंदरीत अंदाजे खर्च ५७७ कोटींचा आहे. त्याच्यामध्ये संपुर्ण वितरण व्यवस्था देखील इनक्ल्यूडेड आहे. याच्यामध्ये देखील आपण फिल्टींग करणार आहोत आणि ही प्रक्रिया आपण आता ज्याप्रमाणे सन्मा. नगरसदस्य राहुलजी कलाटे

,

यांनी म्हटल्याप्रमाणे स्वत: करता येईल का हे पहावे असे त्यांनी सजेशन दिलेले आहे. मात्र आपल्या धोरणामध्ये प्रस्तावित करताना असे म्हणतो आहोत की पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर याच्याकरीता संपुर्ण देशभर सध्या तरी कार्यरत असलेले जे मॉडेल आहे. ते आहे Hybrid Annuity Model. इव्हन गंगा प्लॉटमध्ये देखील सर्व शहरांसाठी ज्या प्रकारचे आज ट्रीटमेंट प्लॉंट पुर्नचक्रीकरणासाठी आणि पुर्नवापरासाठी करण्यात येत आहेत. ते हयाच तत्वावरती निर्माण करणेत येत आहे. की ज्याच्यामध्ये पीपीपीचा वापर मोठया प्रमाणात करणेत येत आहे. पीपीपीचा वापर करणेच्या मागे फायदा असा की विक्री करण्यासाठी हे जे पाणी आहे त्याच्यासाठी प्रायव्हेट प्लेअर एफीसिएंट अधिक यशस्वी त्याच्यामध्ये होऊ शकतात. ते त्याच्यामध्ये प्रायव्हेट तंत्रज्ञ अधिक चांगल्या रीतीने आणु शकतात. प्रायव्हेट एफिसियन्सीचा वापर करुन आपला निधी आपल्याकडे आहे तो ४० टक्के निधी हा आपण अडव्हान्स स्वरुपामध्ये दयायचा आणि उर्वरित ६० टक्के निधी Annuity Model मध्ये पुढील सात वर्षापर्यंत आपण देत राहायचा. अशा स्वरुपाचे हे मॉडेल आपण प्रस्तावित करीत आहोत. ऑपेरशन आणि मेटेंटन्स हा देखील १५ वर्षापर्यंतचा निधी त्याच युजरकडे राहणार आहे. आणि याच्यानंतर जो काही दर वसुल करावयाचा असेल तो मात्र महानगरपालिका त्यांनी विक्री केलेल्या पाण्याच्या युजरकडन करणार आहेत. याच्यासाठी प्रस्तावित केलेले जे दर आहेत हे मात्र आज अस्तित्वात असलेल्या पाण्याच्या दरापेक्षा निश्चितपणे २० टक्के हे रेसिडेन्शिअल भागासाठी इंडस्ट्रीयल भागासाठी साधारण ३० टक्के हे इतके हे दर कमी राहणार आहेत. त्यामुळे निश्चितपणे नागरीकांना स्वस्तातल पाणी विविध वापरांसाठी या माध्यमातून उपलब्ध करुन देणार आहोत. इंडस्ट्रीजमध्ये देखील पाण्याची किंमत कमी झाल्यामुळे इंडस्ट्रीजबला देखील या पाण्याचा वापर करणे अधिक किफातशीर पडणार आहे. आणि त्यामुळे इंडस्ट्रीज हा आपला प्राईम युजर, प्राईम कंझूमर ऑफ धीस वॉटर राहणार आहे. इंडस्ट्रीजला वापर केल्यानंतर कमर्शियल जे काही एस्टॅब्लीशमेंट देतील त्यांना हे पाणी आपण विकणार आहोत. त्यांना देखील कमर्शियला जर थोडक्यात पाणी उपलब्ध झाले तर त्याच्यामध्ये ते देखील इंटरेस्टेड राहतील. आणि त्यामुळे पुर्नचक्रीकरण केलेल्या पाण्याचा वापर करुन आपण मेजेर युजेसचा आपण वापर करु. त्यासाठी इंडस्ट्रीयल आणि कमर्शियल रेसिडेन्सीयल युजरसाठी नागरीकांसाठी मोठया प्रमाणामध्ये पाण्याची उपलब्धता या शहरामध्ये वाढणार आहे. जर समजा ७५ एमएलडी पाण्याची उपलब्धता जर रेसिडेन्सीयलला झाली तर पुढील सात ते आठ वर्षापर्यंतचा या शहराचा पाण्याचा प्रश्न पुढील वाढ गृहीत धरुन

,

हा देखील मिटणार आहे. आणि त्यामुळे निश्चितपणे शहराच्या व्यापक हितासाठी हे धोरण आहे. यासोबतच अन्य ठिकाणी आपले असलेले सिव्हेज ट्रीटमेंट जे प्लाँट आहेत. त्यांचा देखील टप्प्याटप्प्याने आपण पुर्नचक्रीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आणले आणि त्या त्या भागातल्या कमर्शियल किंवा अन्य युजरसाठी जर हे पाणी आपण वापरु शकलो तर मोठया प्रमाणावर स्वावलंबीत्व पाण्याचा वापराबाबत आपल्या शहरामध्ये येणार आहे. माझी विनंती आहे की आता सध्या हे आपलं फक्त धोरणात्मक स्वरुपावरती आहे. त्याचा सविस्तर डिपीआर केल्यानंतर त्याची निविदा प्रक्रिया केली जाईल. मला विश्वास आहे की पूर्ण देशपातळीवरती आता Hybrid Annuity Model चांगल्या रितीने एस्टॅब्लीश होत आहे. आपल्या इकडे त्याचा देखील वापर लोक करतील आणि निश्चितपणे या शहराला त्याच्यामध्ये यशस्वीता प्राप्त होईल असा मला विश्वास आहे तरी माझी सभागृहाला विनंती आहे की हे धोरण आपण मंजुर करावे.

**मा.सिमा सावळे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह कमिशनर साहेब तुमचं मनापासून अभिनंदन. नॉन पोटेबल वॉटरसाठी आपण जे काही प्रक्रिया करण्याचे धोरण आता सभागृहापुढे आणले आहे. त्यामध्ये निश्चितपणे आमचे काही प्रश्न होते. जसं मंगलाताई मगाशी म्हटल्यां तुम्ही गटनेत्यांना दाखवतात सर्व नगरसेवकांना पण सादरीकरण दाखवा. एखादा चांगला प्रोजेक्ट असेल आणि त्यामध्ये सभागृहाची मान्यता घ्यायची असेल तर मा. महापौर आपणांस विनंती करेन की आपण अशा प्रोजेक्टला माहिती कमी असल्यामुळे विरोधच होतो आणि त्यामुळे सर्वांनाच जर आपण प्रेझेंटेशन दयायला लागलो. कारण का की तेवढंच नॉलेज वाढते आणि एक चांगल्या गोष्टीची सुरुवात करायची असेल तर त्याला नकार होत नाही. मा. महापौर साहेब मा. कमिशनर साहेब मगाशी इथं आपण सांगितलं की याच्यासाठी अभ्यास धोरण पुढे याच्यामध्ये खुप डेव्हलपमेंट होणार आहे. अनेक वर्षापासून आताच आपण पाणी टंचाईला सामोरे जातो, दर महिन्याला मला वाटतं की गुरुवार आला की भिती वाटायला लागते साहेब तुमच्या मेसेजची. आज ह्या ना त्या कारणांमुळे पंपींग स्टेशन बंद असल्यामुळे पाणी येणार नाही. लाईन तुटली पाणी येणार नाही, शटडाऊन आहे पाणी येणार नाही. दर गुरुवारचे हे नाटक झालेले आहे. किमान लोकांना वापरण्यायोग्य जरी नॉन पोटेबल पाणी आपण ट्रीटमेंट करुन देऊ शकलो तर मला वाटत की पिण्याच्या पाण्याची जी समस्या आहे ती टंचाई आहे ती खूप कमी होईल. आणि गेली वर्षभर म्हणजे

,

मा. लक्ष्मणभाऊ जगताप असतील, मी असेल, महेशदादा असतील आम्ही वारंवार तुमच्या पाठीमागे लागलो होतो की असे काही तरी असेल तर निश्चितपणे त्याच्यावरती काम करायला आम्हाला सुध्दा खुप आवडेल. एकदम इनोव्हेटीव्ह आहे नाविन्यपूर्ण आहे. हा तडीस कसा जाईल याच्याकडे आपण फार लक्ष देण्याची गरज आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे याच्यामध्ये आपला काय सहभाग आहे का. तर राहुल कलाटे मगाशी म्हणाले की आपला सहभागातून करा. याचे कारण असं आहे की येणारे उत्पन्न ते पाणी आपण विकणारच आहोत. त्यामध्ये आपला सहभाग कसा राहील, प्रोजेक्ट कसा राहील. याकडे आपण लक्ष देणे फार गरजेचे आहे मा महापौर साहेब. यामध्ये साहेब आपण सांगितलय की दोनतीन मुद्दे आपल्याला सांगते. DI, MS, CI या प्रकारच्या वाहिन्या व जोडणी असल्याकारणाने प्रक्रीयायुक्त पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र प्रकारच्या वाहिन्या असणे आवश्यक आहे. याकरीता स्पेशल वाहिन्या टाकाव्या लागतील मग त्याचा खर्च वेगळा लागेल ना. तो ५७७ कोटीमध्ये आला. आणि मीटर फ्री ऑफ कॉस्टमध्ये देणार का कॉस्टवरती, ते कॉस्टवरती देणार यावरती आपण विचार करावा. नॉमिनल कॉस्टवरती आपल्याला जर देता आलं तर खूप चांगल होईल. आणि आता आपण जे ६०७ किमी हे आपण जाळ करायचं म्हणतो. उर्वरित जो टप्पा आहे. म्हणजे आता आपण स्मार्ट सिटीचे काम करतोय. वेगवेगळया खोदकामांना आपण परवानग्या दिलेल्या आहेत. त्यामध्ये याच्यामध्ये तुम्हाला कितपत जास्त फास्ट गतीने जाता येईल. तितक्या फास्ट गतीने आपण गेले पाहिजे. कारण की आता शहरामध्ये खोदाई होणार आहे त्यामध्ये ब-यापैकी भाग हा नवीन आहे. आपण स्मार्ट सिटीमध्ये जो भाग घेतला तो आपण बापू काटेंच्या प्रभागातला घेतला आहे. तर वारंवार खोदाई करण्यापेक्षा त्यावेळेस जर का आपण खोदाई केली तर मला वाटत की जास्त चांगल होईल. यामध्ये आणखी एक मुद्दा आपण धोरणामध्ये सांगितला आहे की महानगरपालिके तर्फे ४० टक्के आणि साठ टक्के आणि सात वर्षे त्रैमासिक पध्दतीने वितरीत करण्यात येईल. म्हणजे आपण कॉन्ट्रॅक्टरला १५ वर्षासाठी करतो. जागा आपण एक रुपया प्रती मीटरसाठी सांगीतली आहे. प्रकल्प तर आपलाच आहे मग आपण जागेसाठी कशाला पैसे देतोय. बाकी सर्व मुद्दे आपण याच्यामध्ये ब-यापैकी कव्हर केलेले आहेत. परत एकदा तुम्हाला शुभेच्छा आणि प्रक्रिया केलेल्या पाण्यावरती आपण घरगुती जे पाणी देतो. याच्यामध्ये तुम्ही ५० टक्के म्हणाला आहात. तुम्ही ५० टक्के लिहिलय साहेब. सदर प्रक्रीयायुक्त पाण्याचे दर प्रचलित घरगुती दराच्या ५० टक्के कमी तर औद्योगिक वापराच्या ५० टक्के इतके असतील. साहेब, मला ते कळाले नाही

,

म्हणून विचारतेय. म्हणजे आपण सांगतांना २० टक्के सांगितलं आणि इथं ५० टक्के आलेलय. चूक असेल तर ती आपण दुरुस्त करुन घ्यावी. २० टक्के, ३० टक्के प्रस्तावीत जर केलं असेल तर साहेब इथं आपल्याला दुरुस्ती करावी लागेल. मा. महापौर साहेब तशी आपण धोरणामध्ये दुरुस्ती करुन घ्यावी. त्यासाठी उपसूचना घेऊन टाका तुम्ही. बाकीचे तुम्ही केलेला हा प्रोजेक्ट चांगला आहे. त्याबद्दल तुमचे मनापासून अभिनंदन करते. आणि लवकरात लवकर प्रोजेक्ट कार्यान्वीत होईल याकडे आपण लक्ष घालावे.

**मा.मंगला कदम** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह कमिशनर साहेबांनी आता प्रेझेंटेशन दिले आहे. कमिशनरांनी जे टारगेट ठेवले आहे. त्यांना इंडस्ट्रीयल, पिंपळे सौदागर आणि हिंजवडी अशा भागामध्ये या पाण्याची आपण विक्री करु शकतो. असं कमिशनरांना वाटतयं असं मला वाटतं. परंतु कमिशनर साहेब आम्ही ज्यावेळेला हा प्रोजेक्ट करायला पूर्वी सुरुवात केली होती. आम्ही इंडस्ट्रीजला विचारले आपण ज्या वेळेला पाण्यावर प्रक्रिया करायला सुरुवात करतो. त्यावेळेला येणारा खर्च आपण नुकसान सहन करुन तर समोरच्याला विकणार नाही. मग तुम्ही हे पण कॅलक्यूलेशन केले पाहिजे की आपण त्याच्यावर ज्यावेळेला प्रक्रिया करणार आहोत. त्याच्यावर किती रुपये खर्च येणार आहे. आपण म्हणतो पर लिटर म्हणजे किती रुपये खर्च येणार आहे. आणि आपण समोरच्याला विकणार आहोत. जरी ६० आणि ४० टक्के असले आणि जरी प्रायव्हेट माणसाला १ रुपया स्के.मीटरने जरी तुम्ही जागा दिली तरी. जर १ रुपया स्के.मीटरने जागा देणार त्या जागेचा किती वर्षे आपण त्यांच्याबरोबर करार करणार तो विषय. जसा ई-वेस्टसाठी आपण मागे केला होता. पुढे त्याचे काही दिसलेच नाही, झालेच नाही. परंतु ती जागा एखादया संस्थेच्या नावावर पीपीपी करणा-या माणसाच्या नावावर आपण केली तर ती जागा आपल्याला परत मिळणे फार अवघड असते. आणि म्हणून जी ही संस्था किंवा ज्या कोणाबरोबर आपण करार करणार आहोत. म्हणजे या संस्थेबरोबर आपण करार करणार आहोत. एक रुपया स्के.मीटर म्हणजे काही कमी नाही. म्हणजे फुकटच जागेचा करार करणार आहोत की जागेचा हक्क आमचा आहे. आणि जागा तुम्ही वापरायची. इंडस्ट्रीजला ज्यावेळेस आम्ही रिक्वेस्ट केली. जस तुम्ही म्हणताय की सीएमईला आम्ही पाणी का दिलं. सीएमईला पाणी का दिले त्यावेळेला. साहेब सीएमईमध्ये इंटरनॅशनल लेव्हलचे लोक आहेत म्हणून त्यांना आपण पाणी दिले. किंवा आपण त्यांना हजारो झाडे लावायला दिली. त्या झाडांना पाणी

,

म्हणून आपण पाणी दिले. अशा पध्दतीने आपल्याला प्रक्रिया करुन त्यांना जर अशा पध्दतीने पाणी दयावे लागले. इंडस्ट्रीज तयार होत नाहीत. ते स्पष्ट सांगतात की आमचा प्लांट आम्ही बसवू. आजपर्यंत कोणत्याही इंडस्ट्रीजने आपल्याला होकार दिलाय का. याची सुध्दा माहिती आपण करुन घेतली पाहिजे. प्रोजेक्ट तुमचा चांगला आहे. त्याच्याबद्दल तुम्हाला काळाची गरज आहे. त्या प्रोजेक्टबद्दल मला म्हणायचं नाही. पण ज्यावेळेला आपण रन करणार आहोत. त्यावेळेला नुकसान सहन करून समोरच्याला पाणी आपण देणार आहोत का. हा पण आपण विचार केला पाहिजे. ती तीतकी पिओरीटी आपल्याला त्या पध्दतीने मिळणार आहे का. साहेब दोन वर्षांनी तुम्ही या पिंपरी चिंचवड शहरामध्ये असणार आहे का. किंवा कुठे असाल तिथून आम्ही तुम्हाला बोलावू शकत नाही. हे चक्र आहे असंच. त्यामुळे तुम्ही एवढं सुंदर प्रोजेक्ट केलतं. जर याला विक्री करायला माणसेच मिळाली नाहीत. ते म्हणतील जिथं आम्ही इंडस्ट्रीजचा प्लॉट घेतलेला आहे त्यांची जबाबदारी आहे आम्हाला पाणी पुरविणे. एमआयडीसीच्या भागामध्ये जर म्हणत असांल तर की आम्ही पाणी तुम्हाला देणार. का एमआयडीसी म्हणली की आम्हीच तुम्हाला पाणी देणार आहे. मग ते पाणी सोडून आपलं पाणी घेणार का. एमआयडीसीमधील लोक इंडस्ट्रीजचे लोक. मग चाकण असू दे, आळंदी असू दे अजुन रांजणगाव असू दे. कोणालाही तुम्हाला दयायचे असेल तर ते पाणी घेणार का. साहेब आपण एमआयडीसीकडून पाणी विकत घेतो. आपल्याकडून ही इंडस्ट्रीयल लोक पाणी घेणार का. साहेब, हा जर सगळा विचार केला तर साहेब आपण सगळया गोष्टींचा सारांसार विचार करा. प्रोजेक्ट जरी चांगला असला तरी तो रन करताना तो होताना जरी आपण पीपीपी तत्वावर देणार असलो तरी सुध्दा आपण या सगळया गोष्टींचा विचार केला गेला पाहिजे. तरच हा प्रोजेक्ट होऊ शकतो. आम्ही मला आठवतय चांगल २००५-०६ वेळेला आम्ही सुध्दा इंडस्ट्रीजवाल्यांना विचारलं की आम्ही तुम्हाला पाणी दयायला तयार आहोत. त्यावेळेला सुध्दा आपल्याकडे जर्मनीचे लोक आले, जपानचे लोक आले. कोरियाचे लोक आले ते म्हणले आम्ही स्वत: प्लांट टाकायला तयार आहोत. सगळया गोष्टी म्हणायला तयार असतात. परंतु हे प्रॅक्टीकली सर आजपर्यंत घडलेले नाही. तुमच्या हयाला यश आले आम्हाला वाईट वाटणार नाही. परंतु हे पाणी घेणारे ग्राहक मिळायला पाहिजेत. जस आपण एखादा बिझनेस करतो. त्यावेळेला पहिलं मार्केटींग शोधतो. साहेब मार्केटींग तुमच्याकडे नसेल तर तुमचा प्रोजेक्ट फेल होतो. त्याच पध्दतीने हे मार्केटींग पहिल्यांदा आपल्याला बघितलं गेलं पाहिजे. नाहीतर ५७७ कोटी जातील आणि ती लाईन टाकून त्या लाईनमध्ये

,

पाणीच येणार नाही. ती लाईन आपल्याला परत कुठल्याही गोष्टीला वापरता येणार नाही. म्हणून आपले स्वत:चे पिंपरी चिंचवडचे जर पैसे वाचत असतील ५७७ कोटी. ते विश्वस्तांचे नागरीकांचे असतील. तर आपण मार्केटींग पहिले केलं गेलं पाहिजे. नाहीतर आपला हा बिझनेस फेल जाईल. त्या दृष्टीकोनातून सगळा विचार करावा साहेब. माझा विरोध नाहीय पण या सगळया गोष्टी आम्ही प्रॅक्टीकली बघितल्या आहेत. ते होऊ शकत नाही. आजपर्यंत घडले नाही. म्हणून कमिशनर साहेब या सगळया गोष्टींचा तुम्ही विचार करुन नंतरच पुढची पावले उचलावीत हीच विनंती.

**मा.आयुक्त** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृह जे प्रश्न आता उपस्थित केले गेले आहेत. त्याचा थोडक्यात खुलासा करु इच्छितो की मार्केटींगशिवाय ही योजना चालणार नाही याची पूर्णपणे नोंद घेऊनच आपण हा प्रोजेक्ट केला आहे. कारण याकरीता मूळ मुद्दा म्हणजे पीपीपी आणण्याचे मागे की आपण ब-याच वेळेला या गोष्टी पूर्ण करु शकत नाही. जे इनव्हेस्टर आहेत ते त्या गोष्टी चांगल्या रितीने करु शकतात. हा त्याच्यामागचा उद्देश होता. दुसरी गोष्ट अशी आहे की आपल्या इथं काही एरियाज आहेत त्यांना पाण्याची कमतरता आहे. हा त्याच्यातला दुसरा महत्वाचा मुद्दा. आणि सगळयात महत्वाचा तिसरा जो मुद्दा आहे इंडस्ट्रीजच्या बाबतीतला. तो आपल्या फेव्हरमध्ये आज आहे. तो असा की राज्यशासनाची आतापर्यंत पॉलिसी नव्हती. जी आता राज्यशासनाची रिसायकल पॉलिसी मंजुर झालेली आहे. तसा जीआर झालेला आहे. आणि अशा पॉलिसीच्या आधारे अन्य शहरांमध्ये असा प्रकल्प सुरु झालेला आहे. या तीन गोष्टींचा विचार करुन यासोबतच संपूर्ण पॉलिसी करीत असताना आपल्याकडे जे कंन्सल्टंट आहे त्यांच्या माध्यमातून हिंजवडी असोसिएशन असेल, कमर्शियल जी लोक वापरणार आहेत. एकंदरीत डेफिसीएट ऐरीयाज किती आणि इंडस्ट्रीयल कंझमशन किती त्याचा आधीचा अभ्यास करुनच आपण ही पॉलिसी करतो आहोत. सर्व सांगितलेले मुद्दे निश्चितपणे आपल्याला ज्यावेळेला अक्टीव्हेट टेंडरींग यामध्ये करण्यात येईल त्यावेळेला तो करावा लागेल या गोष्टीची नोंद प्रशासन घेत आहे. त्याच्या अनुषंगाने त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न राहील. कारण निश्चितपणे हा प्रकल्प मोठा आहे. आणि निश्चितपणे त्याचा इंपॅक्टही लॉगटर्मच्या दृष्टीने हा जास्त आहे. आता आपण फक्त फायनांनसियल कॉस्टचाच विचार करतो आहोत. पण याची इकॉनॉमिक कॉस्ट आणि शहराला असणारे इनटॅमीबल

,

बेनिफीटचा जर विचार केला तर त्याचे वित्तीय मूल्य हे निश्चितपणे ५७७ कोटीच्या कितीतरी पट अधिक असणार आहे. हे मला नमुद करावसं वाटतं.

**मा. महापौर** – मा. आयुक्तांचे अभिनंदन करुन हा विषय मंजुर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा. उषा मुंढे**– मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७२ दि.७/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट - अ अभिनामाची ०३ पदे र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये मंजूर असून रिक्त आहेत. श्री.दत्तात्रय एकनाथ रामगुडे, उप अभियंता, स्थापत्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट - अ पदाचे पदोन्नती करिता पात्र असून सेवाजेष्ठ आहेत. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्थापत्य विभागातील कामकाजाचा अनुभव व उप अभियंता, स्थापत्य पदावर एकूण १२ वर्षे सेवा आणि स्थापत्य विभागामधील एकूण ३० वर्षाची सेवा विचारात घेता श्री.दत्तात्रय एकनाथ रामगुडे, उपअभियंता स्थापत्य यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट- अ वेतनश्रेणी र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. मनिषा पवार** – मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

,

**मा.नामदेव ढाके-** मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिका अस्थापनेवर सहशहर अभियंता (स्थापत्य) या अभिनामाची एकुण ३ पदे र.रु. १५६००-३९१०० ग्रेडवेतन ७६०० मध्ये शासन मंजुर आहेत. सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोठ्यातील या प्रवर्गाच्या रिक्त पदावर किंवा नजीकच्या भविष्यात रिक्त होणा-या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात र.रु. १५६००-३९१०० ग्रेडवेतन ७६०० या वेतनश्रेणीत सेवाजेष्ठतेनुसार श्री. श्रीकांत श्रीनिवास सवणे, कार्यकारी अभियंता (स्था.) हे सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असल्याने त्यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी. तुर्तास नियमित पदोन्नतीने देण्यापुर्वी तात्पुरती पदोन्नती (Adhoc) देण्यासही मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.पी.सी.सी-३००५/३००७/प्र.क्र.२१५/२००५/नवि-२२ दि. १३/१०/२०१० अन्वये उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखा परिक्षक) हे पद (१०६५०-१५८५०) ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये पदोन्नतीने भरणेबाबत मंजूर आहे. प्रस्तुतचे पद भरताना –

१) वाणिज्य शाखेचा अकाऊंटट ऑडिटिंग या नियमासह पदविका.

२) महापालिकेतील उपमुख्यलेखा परिक्षक किंवा लेखाधिकारी या पदावर कामकाजाचा सलग १० वर्षे अनुभव.

लेखा संवर्गातील सेवाजेष्ठ कर्मचारी श्री.इंगुळकर विजय मारूतीराव, लेखाधिकारी यांची लेखाधिकारी पदावर ९ वर्षे सेवा झालेली असुन मा.अप्पर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.एस.आर.व्ही.-२०१४/प्र.क्र.-३५४/१४/क.१२ दि.०५/१०/२०१५ चे शासन निर्णय प्रमाणे प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती देताना किमान सेवेची अट हि ३ वर्षे निश्चित केलेली आहे. तसेच ज्या पदांना पदोन्नतीसाठी किमान कालावधी ३ वर्षे पेक्षा जास्त विहित केला असेल आणि अशा प्रकारची निम्न संवर्गात विहित सेवा कालावधी पुर्ण केलेले कर्मचारी उपलब्ध नसल्या कारणास्तव पद रिक्त रहात असतील तर निम्न संवर्गात आवश्यक किमान सेवेचा ९०% नियमित सेवा झाल्यानंतर अनुभवाची अट शिथिल करता येईल.

,

श्री.इंगुळकर विजय मारुतीराव, लेखाधिकारी यांची मनपा अस्थापनेवर ३५ वर्षे सेवा झालेली असुन त्यातील लेखा अंतर्गत २३ वर्षे सेवा झालेली आहे. म्हणजेच ते किमान सेवा ९०% ची अट पुर्ण करित असुन ते सेवाजेष्ठतेनुसार क्र.१ वर असल्याने त्यांची मनपा अस्थापनेवरील उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखा परीक्षक) गट अ वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या पदावर अट शिथिल करुन नेमणुक करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच सह शहर अभियंता ३ मंजूर पदांपैकी १ पद पदविकाधारकास ठेवण्यात आलेले आहे. सह शहर अभियंता पदास शासनाने विषयपत्रात नमूद केलेप्रमाणे अटी नमूद केल्या आहेत. सदर अटींची पूर्तता भविष्यात व नजीकच्या काळात कोणताही अभियंता पूर्ण करण्यात पात्र ठरणार नाही. त्यामुळे सदर अर्हतेमध्ये 'ब' मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णय क्र. पीसीसी ३०१०/२२५/प्र.क्र. ६६ नवि, दिनांक ०७/०६/२०१० मध्ये पदविका किंवा पदवी धारकास १) उपअभियंता पदावर १० वर्षे सलग सेवा २) कार्यकारी अभियंता पदावरील ३ वर्षे अशी सुधारणा करण्यात येऊन अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेत यावी. सह शहर अभियंता पदावरील पदविकाधारक गटातील अनुसूचित जाती संवर्गातील श्री.आर.व्ही.दुधेकर हे नुकतेच निवृत्त झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर अनुसूचित जाती संवर्गातील श्री.संजय जनार्दन भोसले हे सेवाजेष्ठतेने पात्र ठरत असल्याने पदविका धारकांसाठी असलेल्या पदावर त्यांना मूळ विषयपत्रात नमूद केलेल्या सर्व याचिकेच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच त्वरीत कार्यवाही करणेत येऊन सुधारित अटींस कार्योत्तर शासन मान्यता घेण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. सागर आंगोळकर** – मा. महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा. उषा मुंढे** - मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ३३९ विषय क्रमांक - ११

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग-मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७२

दि.७/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट - अ अभिनामाची ०३ पदे र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये मंजूर

,

असून रिक्त आहेत. श्री.दत्तात्रय एकनाथ रामगुडे, उप अभियंता, स्थापत्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट - अ पदाचे पदोन्नती करिता पात्र असून सेवाजेष्ठ आहेत. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्थापत्य विभागातील कामकाजाचा अनुभव व उप अभियंता, स्थापत्य पदावर एकूण १२ वर्षे सेवा आणि स्थापत्य विभागामधील एकूण ३० वर्षाची सेवा विचारात घेता श्री.दत्तात्रय एकनाथ रामगुडे, उपअभियंता स्थापत्य यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट- अ वेतनश्रेणी र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महापालिका अस्थापनेवर सहशहर अभियंता (स्थापत्य) या अभिनामाची एकुण ३ पदे र.रु. १५६००-३९१०० ग्रेडवेतन ७६०० मध्ये शासन मंजुर आहेत. सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीच्या कोठ्यातील या प्रवर्गाच्या रिक्त पदावर किंवा नजीकच्या भविष्यात रिक्त होणा-या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात र.रु. १५६००-३९१०० ग्रेडवेतन ७६०० या वेतनश्रेणीत सेवाजेष्ठतेनुसार श्री. श्रीकांत श्रीनिवास सवणे, कार्यकारी अभियंता (स्था.) हे सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असल्याने त्यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तुर्तास नियमित पदोन्नतीने देण्यापुर्वी तात्पुरती पदोन्नती (Adhoc) देण्यासही मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगर विकास विभाग यांचेकडील आदेश क्र.पी.सी.सी-३००५/३००७/प्र.क्र.२१५/२००५/नवि-२२ दि. १३/१०/२०१० अन्वये उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखा परिक्षक) हे पद (१०६५०-१५८५०) ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये पदोन्नतीने भरणेबाबत मंजूर आहे. प्रस्तुतचे पद भरताना –

१) वाणिज्य शाखेचा अकाऊंटट ऑडिटिंग या नियमासह पदविका.

२) महापालिकेतील उपमुख्यलेखा परिक्षक किंवा लेखाधिकारी या पदावर कामकाजाचा सलग १० वर्षे अनुभव.

लेखा संवर्गातील सेवाजेष्ठ कर्मचारी श्री.इंगुळकर विजय मारुतीराव, लेखाधिकारी यांची लेखाधिकारी पदावर ९ वर्षे सेवा झालेली असुन मा.अप्पर मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.एस.आर.व्ही.-२०१४/प्र.क्र.-३५४/१४/क.१२ दि.०५/१०/२०१५ चे शासन निर्णय प्रमाणे प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती देताना किमान सेवेची

,

अट हि ३ वर्षे निश्चित केलेली आहे. तसेच ज्या पदांना पदोन्नतीसाठी किमान कालावधी ३ वर्षे पेक्षा जास्त विहित केला असेल आणि अशा प्रकारची निम्न संवर्गात विहित सेवा कालावधी पुर्ण केलेले कर्मचारी उपलब्ध नसल्या कारणास्तव पद रिक्त रहात असतील तर निम्न संवर्गात आवश्यक किमान सेवेचा ९०% नियमित सेवा झाल्यानंतर अनुभवाची अट शिथिल करता येईल.

श्री.इंगुळकर विजय मारुतीराव, लेखाधिकारी यांची मनपा अस्थापनेवर ३५ वर्षे सेवा झालेली असुन त्यातील लेखा अंतर्गत २३ वर्षे सेवा झालेली आहे. म्हणजेच ते किमान सेवा ९०% ची अट पुर्ण करित असुन ते सेवाजेष्ठतेनुसार क्र.१ वर असल्याने त्यांची मनपा अस्थापनेवरील उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखा परीक्षक) गट अ वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या पदावर अट शिथिल करुन नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सह शहर अभियंता ३ मंजूर पदांपैकी १ पद पदविकाधारकास ठेवण्यात आलेले आहे. सह शहर अभियंता पदास शासनाने विषयपत्रात नमूद केलेप्रमाणे अटी नमूद केल्या आहेत. सदर अटींची पूर्तता भविष्यात व नजीकच्या काळात कोणताही अभियंता पूर्ण करण्यात पात्र ठरणार नाही. त्यामुळे सदर अर्हतेमध्ये 'ब' मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णय क्र. पीसीसी ३०१०/२२५/प्र.क्र. ६६ नवि, दिनांक ०७/०६/२०१० मध्ये पदविका किंवा पदवी धारकास १) उपअभियंता पदावर १० वर्षे सलग सेवा २) कार्यकारी अभियंता पदावरील ३ वर्षे अशी सुधारणा करण्यात येऊन अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे. सह शहर अभियंता पदावरील पदविकाधारक गटातील अनुसूचित जाती संवर्गातील श्री.आर.व्ही.दुधेकर हे नुकतेच निवृत्त झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर अनुसूचित जाती संवर्गातील श्री.संजय जनार्दन भोसले हे सेवाजेष्ठतेने पात्र ठरत असल्याने पदविका धारकांसाठी असलेल्या पदावर त्यांना मूळ विषयपत्रात नमूद केलेल्या सर्व याचिकेच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच त्वरीत कार्यवाही करणेत येऊन सुधारित अटींस कार्योत्तर शासन मान्यता घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा. उषा मुंढे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

,

ठराव क्रमांक – ३४० | विषय क्रमांक – १२
दिनांक – २०/१२/२०१८ | विभाग-मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव-
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७३ दि.७/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी हे पद रिक्त असून या विभागा अंतर्गत १८ विद्यालये चालविली जातात. विद्यालयांचे आवश्यकतेनुसार माध्यमिक विभागाकरीता शिक्षणाधिकारी पदाची आवश्यकता आहे. सध्या शिक्षण मंडळ विभागाकडील सहा.प्रशासन अधिकारी श्री.पराग मुंढे यांना अतिरिक्त पदभार देणेत आलेला आहे. श्री.मुंढे सहा.प्रशासन अधिकारी (शैक्षणिक पात्रता बी.ए.बी.एड.) यांनी महानगरपालिकेत उपशिक्षक म्हणून दि.०१/०७/१९८५ ते १०/०४/२००७ काम केलेले आहे. त्यांना अध्यापनाचा एकूण २२ वर्षाचा अनुभव आहे. तसेच परिक्षेत्रीय अधिकारी (पर्यवेक्षक) दिनांक ११/०४/२००७ ते ०२/०८/२०१२ अनुभव ०५ वर्षे, दिनांक ०३/०८/२०१२ ते आज अखेर सहा.प्रशासन अधिकारी पदावर काम केलेले आहे. दिनांक २२/०५/२०१८ ते ०१/०६/२०१८ पर्यंत प्रशासन अधिकारी म्हणून शिक्षण विभागाचे कामकाज केलेले आहे. तसेच दिनांक २२/०५/२०१८ ते आज अखेर माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी या पदाचे कामकाज संभाळत आहे. त्याबरोबर शिक्षण विभागाचे सहा. प्रशासन अधिकारी या पदाचे कामकाज करीत आहे. माध्यमिक विभागाचे १८ विद्यालये असून विद्यार्थी गुणवत्तेसाठी इतर उपक्रम राबविले आहेत. या पूर्वी १० वी व १२ वी बोर्ड परिक्षा भरारी पथकामध्ये पथक प्रमुख म्हणून कामकाज केलेले आहे. ११ वी ऑनलाईन कमिटी मध्ये झोन ऑफिसर म्हणून कामकाज केलेले आहे. त्यांना जिल्हा परिषद, एस.एस.सी.बोर्ड या कार्यालयाकडील कामकाजाचा चांगला अनुभव आहे. त्यांची शिक्षण क्षेत्रात ३४ वर्षे सेवा झालेली आहे. त्यांनी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी या पदावर ३ महिन्यांपासून चांगल्या प्रकारे कामकाज केलेले आहे. तरी श्री.पराग मुंढे, सहा.प्रशासन अधिकारी यांना शिक्षणाधिकारी या पदावर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. मनिषा पवार** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

,

**मा. बापु ऊर्फ शत्रुघ्न काटे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर मगाशी हा विषय राहून गेला होता. मा.महापौर साहेब या सभागृहामध्ये जे नगरसदस्य आलेत ते लोकप्रतिनिधी म्हणून आलेत. कुठल्याही विषयाची जर आपल्याला माहिती मागवावयाची असेल तर साधारण किती दिवस लागले पाहिजेत माहिती दयायला संबंधित अधिका-याने. अशा अधिका-याने मला वाटत की माहिती लपविलीतर आपण त्यांचेबद्दल काय कार्यवाही करणार किंवा उशीरा दिलीतर. म्हणजे आपण एखादी छोटीसी माहिती मागविण्यासाठी जर तुम्हाला एक महिना लागत असेल तर एवढ लपविण्याच कारण काय. विषय साधा आणि सिंपल आहे. प्रशासन अधिकारी ज्योत्सना शिंदे यांचेकडे मी एक पत्र दिले होते. एकतर्फी पतीपत्नी मा. महापौर साहेब मगाशी तो विषय तुम्ही मंजुर केला, मंजुर केलातर काही हरकत नाही. आमच्या सारख्या एखादया नगरसेवकांने पत्र देऊन जर एखादी माहिती मागविली तर लपवून ठेवण्याचे कारण काय. फक्त आपण यादी मागविली. संबंधित अधिकारी तुम्हाला नीट उत्तर देऊ शकत नाही का. या सभागृहाला माझी विनंती आहे मा.महापौर साहेब तुम्हाला विनंती आहे की अशा अधिका-यावरती कारवाई झाली पाहिजे. ती पण निलंबनाची कारवाई झाली पाहीजे. तुम्ही कार्यवाही करणार आहे की नाही ते आम्हाला सांगावे. नाहीतर उदयापासून आम्ही सभागृहातून वॉक आऊट करतो. किरकोळ विषय आहे अगदी. तेच सांगतोय संबंधित अधिका-याने माहिती लपविण्याचे कारण काय. मुंढेच्या विषयावर मी बोलत नाही. मी त्या विषयाला धरुन बोलतोय. मुंढे हा विषय नाहीय. मगाशी मला एवढचं बोलायचं होतं. तुम्ही जो विषय मंजुर केला. त्याच्याशी मला काय घेण-देणं नाहीय. म्हणजे इथं बसणा-या नगरसेवकांना काही किंमत आहे की नाही. काल परवा तुम्ही सुध्दा इकडे या खुर्चीवर होतातना महापौर साहेब. महापौर साहेब तुम्ही तयारीत आहात. तुम्हाला शुभेच्छा आहेत. ऐका ना विषयाचे गांभीर्य लक्षात घ्या. आज या संपुर्ण सभागृहाचा हा विषय आहे.

**मा. महापौर** – संबंधित अधिकारी ज्योत्सना शिंदे मॅडम कोणत्याही सदस्यांची याठिकाणी जर अशी कंप्लेट आली तर तुमचेवर कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**मा. बापु ऊर्फ शत्रुघ्न काटे** – मा. महापौर साहेब, आता काय कारवाई करणार ते सांगा. एक तर ते संबंधित अधिकारी जर जबाबदार असतीलतर त्यांचे निलंबन झाले पाहिजे. जर त्यांनी कोणाला खालच्या अधिका-यांना सांगितले असेल तर त्यांच निलंबन झाल पाहीजे.

,

**मा.महापौर** – पहिला विषय तुम्हाला सांगतो की आपण राज्य शासनाकडे ती उपसूचना मंजुर करुन पाठविली. की आम्हाला दुसरा शिक्षण अधिकारी दया. ऑलरेडी पाठविलेली आहे.

**मा.बापु ऊर्फ शत्रुघ्न काटे** – मा. महापौर साहेब, या सभागृहाने त्यांना विचारा की माहिती लपविली की नाही लपविली. उशिरा का दिली. आज जनरल बॉडी आहे म्हणून काल माहिती दिली. माझ्याबरोबर बाकींच्याची हीच परिस्थिती आहे.

**मा. महापौर** – बापूंच्या प्रश्नाचा खुलासा करा.

**मा.बापु ऊर्फ शत्रुघ्न काटे** - मा. महापौर साहेब, आयुक्तसाहेब आहेत त्यांना खुलासा करु दया. मी काल आयुक्तसाहेबांशी या विषयावर बोललो आहे. शिंदे मॅडम काय खुलासा करणार आहेत त्या. तीनशे लोकांची माहिती दयायला एक महिना लागतो का. मला आयुक्तसाहेबांनी खुलासा करावा व त्यांच्यावर कारवाई करा. महापौर साहेब, त्यांच्याकडून खुलासा मला नकोय. आज सभागृहामध्ये मला खुलासा नकोय. त्यांच्यावर काय कारवाई करणार आयुक्तसाहेब मला तेवढंच सांगा फक्त. अहो कशाला खुलासा काय खुलासा करणार आहेत.

**मा.ज्योत्सना शिंदे** [प्रशासन अधिकारी, शिक्षणमंडळ] - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. काटे साहेबांनी जे पत्र दिले होते ते २७/११ ला आमच्याकडे इनवर्ड झालेले आहे. आणि त्याच मी त्यांना उत्तरही दिलेले आहे. पण कर्मचा-यामुळे थोडीशी दिरंगाई झालेली आहे. मी त्याबद्दल त्यांना दिलगिरी सुध्दा व्यक्त केली होती. आमच्याकडून देऊ शकत नाही असे म्हटले नव्हतं. देऊ शकले नाही त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त केली होती. तर त्यांना मी माहिती पुरविलेली आहे.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, तुम्हाला फक्त तीनशे लोकांची यादी दयायला सांगीतली होती सभागृहात आज विषय होता. तुम्ही काल मला ती माहिती दिली आहे. ते पण मी फोन केल्यावर. याचे कारण काय. तुम्ही का देऊ शकले नाहीत. तुम्ही संबंधित कोण आहेत त्याचे निलंबन करा. नाहीतर आयुक्तसाहेब तुम्ही यांचे निलंबन करा. हे उत्तर नाहीय. साधा आणि सिंपल प्रश्न आहे. तीनशे लोकांची यादी. जे तुमच्याकडे अर्ज आलेत त्याची मी यादी मागविली होती. मी तुम्हाला वेगळा विषय काय हा जीआर, तो जीआर हे नव्हतं मागितलं. आयुक्त साहेब हे उत्तर बरोबर नाहीय.

,

**मा. ज्योत्सना शिंदे** [ प्रशासन अधिकारी, शिक्षणमंडळ ] – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याबाबतीत मी खुलासा करु इच्छिते की जरी अंतिम जबाबदारी माहिती दयायची विभागप्रमुख म्हणून माझी असली तरी प्रथम जबाबदारी ही माझ्या जन माहिती अधिका-याची असते. ती संबंधित लिपिकाची असते. तरीही आम्ही तुम्हाला ती माहिती पुरविलेली आहे.

[ सभागृहामाध्ये गोंधळ ]

**मा.बापू ऊर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, संबंधित अधिकारी म्हणून तुम्ही जबाबदार असाल किंवा तुमच्या खालचा लिपिक जबाबदार असेल विभागप्रमुख म्हणून तुम्ही जबाबदार आहात. माझी माफी मागण्याची काही गरज नाही. माझी माफी नका मागू. सन्मा. सदस्यांनी माहिती मागितली. कुठले ही अधिकारी असू दया. कुठलेही डिपार्टमेंट असू दया. तो विषय आलाय. कुठल्याही महानगरपालिकेमध्ये माहिती दयायची संबंधित नगरसेवकांना तो अधिकारच नाही का. हे काही तुम्ही आमच्यावर उपकार करीत नाही. जमत नसेल तर नोकरी सोडून घरी जा. काहीही आमच्या महापालिकेत यायची गरज नाही. आम्ही विश्वस्त म्हणून काम करीत आहोत. तीनशे लोकांची यादी घेऊन आम्हाला त्यांच काय करायचं नव्हतं. तुम्ही जे काय करताय हे आमच्यापर्यंत येऊ दया ना. हया महापालिकेत कोणाची पत्नी कुठे आहे. कोणाची पती कुठे आहे याचे काय आम्हाला देणघेण नाही. शिक्षण खात्याचे काय चाललय ते तुम्ही प्रभागात येऊन बघा. काय तुमचं शिक्षण आहे हो. माझ्या प्रभागात महानगरपालिकेची स्कुल आहे. एकतरी पालक येवून म्हणतो का माझ्या मुलाला ॲडमिशन दया म्हणून. तुम्ही मला सांगा की महानगरपालिकेच्या शाळेमध्ये. कोणीही त्यांची बाजू घ्यायची गरज नाही. माझं काय म्हणणं आहे. कोणीही त्यांची बाजू घ्यायची गरज नाही. मी आयुक्तांशी बोलतो. तुम्ही जर बाजू घेणार असेल ना तर मी चुकीचे काही बोलत नाही. मी चुकीचं बोलतोय का. संबंधित अधिका-यांना मी दहा वेळा फोन केला ना. त्यांना विचारा मॅडम माझा फोन तुम्हाला किती वेळा आला. माझा फोन तुम्हाला आला की नाही.

**मा.ज्योत्सना शिंदे** [ प्रशासन अधिकारी, शिक्षणमंडळ ] – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एकदा फोन आला होता. परवा दिवशी एकदा फोन आला होता. मी काल सकाळी तुम्हाला माहिती दिली आहे आणि तीही माहिती दिलगीरी व्यक्त करुन दिलेली आहे.

,

**मा.बापू ऊर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मी तुम्हाला तीन वेळा फोन केला होता. ऐका ना ती माहिती तुम्ही मला मी फोन केल्यानंतरच दिली आहे. महापौर साहेब, माझ काय म्हणणं आहे की संबंधित अधिका-याने परत असं काही करता कामा नये.

[सभागृहामाध्ये गोंधळ]

**मा.महापौर-** विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा. उषा मुंढे –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३४१ विषय क्रमांक- १३

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.मनिषा पवार, मा.संगीता ताम्हाणे यांचा प्रस्ताव-

२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७४

दि.७/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवर "मुख्य अग्निशमन अधिकारी" गट अ अभिनामाचे पद र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये मंजूर असून रिक्त आहे. सदर पदावर श्री.किरण बाळमुकुंद गावडे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे एकमेव सेवाज्येष्ठ अधिकारी पदोन्नती करिता पात्र आहेत. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे विभाग प्रमुख म्हणून कामकाजाचा अनुभव व उप मुख्य अग्निशमन अधिकारी पदावर एकूण ०५ वर्षे सेवा आणि अग्निशमन विभागामधील एकुण ३१ वर्षांची सेवा विचारात घेता श्री.किरण बाळमुकुंद गावडे, उप मुख्य अग्निशमन अधिकारी यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "मुख्य अग्निशमन अधिकारी" गट-अ वेतनश्रेणी र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु.६६००/- या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. मनिषा पवार** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

,

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक १४

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग – आयुक्त

संदर्भ- १) मा.डॉ.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव-
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३४
दि.१४/११/२०१८

पिंपरी येथील आरक्षण क्र.७१ स.नं.१०६ हे आरक्षण माध्यमिक विद्यालयासाठी आरक्षित असून पिंपरी येथील माध्यमिक शाळेची निकड पाहता सदर आरक्षणाची जागा त्वरीत भूसंपादन करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. सागर आंगोळकर** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो– मौजे ताथवडे स.नं. १५७ मधील खाली नमुद केलेले ७६.१५ आर क्षेत्र तसेच सर्व्हे नं. ८०/२३७/११ हेक्टर ९ आर. मुंबई– बँगलोर हायवेस लागुन असुन सदरचे क्षेत्र मौजे ताथवडे गावाच्या विकास योजना आराखड्यात इंडस्ट्रीयल विभागात आहे. (मिळकतीचे वर्णन स.नं. १५७ ताथवडे–पुर्व– बँगलोर– मुंबई महामार्ग, पश्चिम– ओढा, दक्षिण– साई पेट्रोल पंप पैकी उर्वरीत क्षेत्र, उत्तर– स.नं. १५८ क्षेत्र) तरी सदरचे क्षेत्र इंडस्ट्रीयल विभागातुन वाणिज्य विभाग या प्रयोजनासाठी विकास योजनेत आरक्षीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल, तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शहरीकरण व त्याअनुषंगाने वाढणा-या लोकसंख्येचा विचार करता मौजे दापोडी येथील परिसरातील नागरिकांसाठी खेळाचे

,

मैदान व जलतरण तलावाची अत्यंत आवश्यकता असुन सद्यस्थितीत मनपाच्या अस्तित्वातील स.न. ३६ येथील कार्यान्वित मैलाशुध्दीकरण प्रकल्प भविष्यात विस्तारीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मौजे दापोडी येथील स.न. ३६ मधील ३०.०० मी. सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजुची मनपा मंजुर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागातील जागा वगळुन खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी तसेच मैलाशुध्दीकरण प्रकल्प विस्तारीकरणासाठी सुमारे ३.० हेक्टर क्षेत्र आरक्षित करणेसाठी म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल प्रस्तावित करुन त्यास शासनाची मंजूरी घेऊन आरक्षण विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे.

मौजे दापोडी येथील स.न. ३६ मधील ३०.०० मी सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजुची मनपा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागातील जागा वगळून खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी तसेच मैलाशुध्दीकरण प्रकल्प विस्तारासाठी सुमारे ३.० हेक्टर क्षेत्र आरक्षीत करणेसाठी म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेरबदलाची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच क क्षेत्रीय कार्यालयाकडील विकास कामांसाठी बो-हाडेवाडी ग. न. 670 दक्षिण उत्तर 18 मीटर रस्ता या रस्त्यामध्ये 80% जागा ताब्यात आली आहे. पण 20% जागा ग.न. 670 मध्ये आहे. पण जागा मालक हि जागा ताब्यात देत नाही, त्यामुळे रस्त्याचे काम अर्धवट आहे, रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी या जागेत भूसंपादन करणे आवश्यक आहे.

क क्षेत्रीय कार्यालयाकडील विकास कामांसाठी बो-हाडेवाडी ग. न. 670, 697 पुर्व पश्चिम 18 मीटर रस्ता या रस्त्यामध्ये 80% जागा ताब्यात आली आहे. पण 20% जागा ग.न. 670 व 697 मध्ये आहे. पण जागा मालक हि जागा ताब्यात देत नाही, त्यामुळे रस्त्याचे काम अर्धवट आहे, रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी या जागेत भूसंपादन करणे आवश्यक आहे.

,

वरील प्रमाणे २ रस्त्यांचे भुसंपादन तातडीने करावे लागणार आहे, सदर क्षेत्राचा भुसंपादनाने ताबा घ्यावयाचा असल्याने सदर भुसंपादनाकामी येणा-या सर्व खर्चास व त्यासंबधीत इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच मौजे च-होली येथील सर्व्हे नं. नविन ४३२ (जुना सर्व्हे नं. ४८८) मधुन १८ मीटर रुंद रस्ता विकास आराखडयातील ९० मीटर रुंद विकास आराखडयातील रस्ता याना जोडणारा ९ मीटर रुंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये घोषीत करणेस मान्यता देणेत यावी. सदरचा रस्ता १८ मीटर रुंद रस्ता व ९० मीटर रुंद रस्ता वाहतुकीचे सोयीसाठी जोडणे आवश्यक आहे. सदरचा ९ मीटर रस्ता घोषीत करताना संबंधित जागा मालकांना टीडीआर/एफएसआय/ मोबदला देण्याचे मान्यतेकामी सदरचा ठरावात अंतर्भाव करुन घोषीत करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील स.नं. १४७, १४८, १५६ मधील गणेशनगर कॉलनी क्र. २,५,९ व १३ येथील मंजुर विकास योजनेत पुर्व-पश्चिम अनुक्रमे १८.० मी. एक व १२.० मी. तीन रस्ते आहेत. सदरचे रस्ते व अस्तित्वातील रस्ते यामध्ये जागेवर तफावत दिसून येते. मनपामार्फत अस्तित्वातील रस्ते विकसीत करणेत आलेले आहेत. सदरचे अस्तित्वातील रस्त्यास रस्तारुंदी ९.० मी. केलेस जागेवरील बांधकामे काढणेची आवश्यकता नाही.

तरी मौजे बोपखेल येथील स.नं. १४७, १४८, १५६ मधील गणेशनगर कॉलनी क्र. २ येथील १८.० मी.रस्ता अस्तित्वातील रस्त्यास रस्तारुंदी करुन १२.० मी. असा फेरबदल करणे तसेच कॉलनी क्र. ५, ९, १३ येथील अस्तित्वातील रस्त्यास रस्तारुंदी करुन ९.० मी. असा फेरबदल म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल प्रस्तावीत करण्यास तसेच सदरचे रस्त्यालगतचे आ.क्र. २/१५४  खेळाचे मैदान (PG), आ.क्र.२/१५९ शॉपिंग सेंटर व मार्केट (SCM), आ.क्र. २/१५८ माध्यमिक शाळा  (SS), आ.क्र. २/१५९ दवाखाना व प्रसुतिगृह (DMH), आ.क्र. १/१६० टेलिफोन सेंटर (TC) यामध्येही रस्त्याच्या फेरबदल आखणीप्रमाणे फेरबदल करावा लागणार आहे. सदर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार रस्ते व आरक्षणे आखणी फेरबदलची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे वाकड तालुका मुळशी येथील स.नं. १०८

'

पै. मधील ३०.०० मी. व २४.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्राचे व स.नं.१ पै. मधील आ.क्र. ४/४ टाऊन हॉलच्या जागेचे भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. मौजे वाकड-हिंजवडी या परिसरातील वाहतूक कोंडी समस्या दूर होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होण्याच्या अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ मौजे वाकड येथील स.न. १०८ पै.मधील ३०.०० मी.व २४.०० मी. रस्त्याने बाधित होणा-या जमिनीचे व स.नं. १ पै. मधील आ.क्र. ४/४ टाऊन हॉलच्या जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी अथवा शासन निर्णय दि.१२/०५/२०१५ नुसार ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे तळवडे परिसरातील वाहतुक कोंडी समस्या दुरु होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होण्याच्या अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ मौजे तळवडे-चिखली शिवेवरील २४ मी. व त्यापुढील १२ मी. इंद्रायणी नदीच्या कडेने एमआयडीसी पुलाकडे जाणारा रस्ता रस्त्याने बाधित होणा-या जमिनीचे भूसंपादन सद्यस्थितीत जुना भूसंपादन कायदयाने होत आहे. त्याऐवजी नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये किंवा खाजगी वाटाघाटीने हया रस्त्याचे संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.केशव घोळवे** – मा. महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आताच महापौर साहेब तुम्ही एक विषय मंजुर केला. आणि परत शिक्षणमंडळ हा विषय खूप महत्वाचा आहे.

**मा.महापौर** – तुम्ही आता विषयावरच बोला.

**मा.सचिन चिखले -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की तुम्ही जो शाळेचा दौरा केला महापौर साहेब. तो खरच चांगली गोष्ट केली की तुम्ही प्रत्येक शाळेत जाऊन शाळेची पाहणी केली. प्रत्येक शाळेतील विदयार्थी कोणता त्यांची बुध्दीमत्ता काय आहे. शिक्षकांची बुध्दीमत्ता काय आहे. त्याची तुम्ही वस्तुस्थिती पाहिली आणि त्याच्यानंतर तुम्ही प्रत्येक मुख्याध्यापकांची मिटींग घेतली. आणि मिटींगमध्ये त्यांना तुम्ही सुचना दिल्या. महापौर साहेब, मी तुम्हाला नम्र विनंती करतो. बरोबर आज एक वर्ष झाले. शाळा एकत्रिकरण करुन. शाळा एकत्रीकरण करीत असताना तुम्ही कोणत्याही गटनेत्यांना किंवा कोणत्याही संबंधित नगरसेवकांना बिलकूल विश्वासात

,

घेतले नाही. आज एक वर्ष होऊन सुध्दा त्याच्यावर तुम्ही अहवाल सुध्दा दिला नाही. त्याच्यामध्ये विदार्थ्यांची गुणवत्ता वाढली की कमी झालेली आहे. का एकदमच मायनस झालेली आहे. सन्मा. महापौर साहेब, गेली एक वर्ष झालं. दिड वर्षे झाले आम्ही चारही नगरसेवक तुम्हाला सांगतोय. की आमची जी शाळा आहे. त्या शाळेमध्ये विदयार्थ्यांना बसण्यासाठी सुध्दा जागा नाही. आम्ही सांगतोय की सकाळच्या आणि दुपारच्या सत्रामध्ये ती शाळा करा. ही आमची कळकळीची तुम्हाला विनंती आहे. पण त्याच्याकडे वेळोवेळी दुर्लक्ष केले जातेय. आज त्या शाळेमधील ४० ते ५० मुलींनी शाळा सोडलेली आहे त्या शाळेत येत नाहीत त्याला जबाबदार कोण. त्याची कोण जबाबदारी घेणार. सन्मा. महापौर साहेब, गेले वर्षभर झाले आहे ४० ते ५० मुलं आणि मुली या शाळेत यायच्या बंद झालेले आहेत. इतर नगरसेवकांच्या मागणीनुसार तुम्ही सकाळ आणि दुपार सत्रामध्ये शाळा सुरु केल्या. मग प्रभाग क्रमांक १३ च्या शाळा तुम्ही का करीत नाहीत. त्याठिकाणी मुलांना बसायला जागा नाही. हया शाळेच्या विषयी आम्ही तुम्हाला वेळोवेळी मागणी केलेली आहे. तर या मागणी बाबत तुम्ही लक्ष केंद्रीत करा. कृपा करुन आमच्या चारही नगरसेवकांची तुम्हाला मागणी आहे की या दोन्ही शाळा सकाळ आणि दुपार सत्रामध्ये करा. आणि पराग मुंढेंची तुम्ही नियुक्ती केली त्याबद्दल तुमचे हार्दिक अभिनंदन.

**मा. नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ३४२ विषय क्रमांक - १४
दिनांक - २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.डॉ.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव-
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३४
दि.१४/११/२०१८

पिंपरी येथील आरक्षण क्र.७१ स.नं.१०६ हे आरक्षण माध्यमिक विद्यालयासाठी आरक्षित असून पिंपरी येथील माध्यमिक शाळेची निकड पाहता सदर आरक्षणाची जागा त्वरीत भूसंपादन करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे ताथवडे स.नं. १५७ मधील खाली नमुद केलेले ७६.१५ आर क्षेत्र तसेच सर्व्हे नं. ८०/२३७/११ हेक्टर ९ आर. मुंबई–

,

बॅंगलोर हायवेस लागुन असुन सदरचे क्षेत्र मौजे ताथवडे गावाच्या विकास योजना आराखड्यात इंडस्ट्रीयल विभागात आहे. (मिळकतीचे वर्णन स.नं. १५७ ताथवडे–पुर्व– बॅंगलोर– मुंबई महामार्ग, पश्चिम– ओढा, दक्षिण– साई पेट्रोल पंप पैकी उर्वरीत क्षेत्र, उत्तर– स.नं. १५८ क्षेत्र) तरी सदरचे क्षेत्र इंडस्ट्रीयल विभागातुन वाणिज्य विभाग या प्रयोजनासाठी विकास योजनेत आरक्षीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल, तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शहरीकरण व त्याअनुषंगाने वाढणा-या लोकसंख्येचा विचार करता मौजे दापोडी येथील परिसरातील नागरिकांसाठी खेळाचे मैदान व जलतरण तलावाची अत्यंत आवश्यकता असुन सद्यस्थितीत मनपाच्या अस्तित्वातील स.न. ३६ येथील कार्यान्वित मैलाशुध्दीकरण प्रकल्प भविष्यात विस्तारीकरण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मौजे दापोडी येथील स.न. ३६ मधील ३०.०० मी. सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजुची मनपा मंजुर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागातील जागा वगळुन खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी तसेच मैलाशुध्दीकरण प्रकल्प विस्तारीकरणासाठी सुमारे ३.० हेक्टर क्षेत्र आरक्षित करणेसाठी म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल प्रस्तावित करुन त्यास शासनाची मंजूरी घेऊन आरक्षण विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे.

मौजे दापोडी येथील स.न. ३६ मधील ३०.०० मी सांगवीकडे जाणा-या रस्त्याच्या डाव्या बाजुची मनपा मंजूर विकास आराखड्यातील औद्योगिक विभागातील जागा वगळून खेळाचे मैदान व जलतरण तलावासाठी तसेच मैलाशुध्दीकरण प्रकल्प विस्तारासाठी सुमारे ३.० हेक्टर क्षेत्र आरक्षीत करणेसाठी म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार आरक्षण फेरबदलाची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकारी मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

,

तसेच क क्षेत्रीय कार्यालयाकडील विकास कामांसाठी बो-हाडेवाडी ग. न. 670 दक्षिण उत्तर 18 मीटर रस्ता या रस्त्यामध्ये 80% जागा ताब्यात आली आहे. पण 20% जागा ग.न. 670 मध्ये आहे. पण जागा मालक हि जागा ताब्यात देत नाही, त्यामुळे रस्त्याचे काम अर्धवट आहे, रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी या जागेत भूसंपादन करणे आवश्यक आहे.

क क्षेत्रीय कार्यालयाकडील विकास कामांसाठी बो-हाडेवाडी ग. न. 670, 697 पुर्व पश्चिम 18 मीटर रस्ता या रस्त्यामध्ये 80% जागा ताब्यात आली आहे. पण 20% जागा ग.न. 670 व 697 मध्ये आहे. पण जागा मालक हि जागा ताब्यात देत नाही, त्यामुळे रस्त्याचे काम अर्धवट आहे, रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी या जागेत भूसंपादन करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे २ रस्त्यांचे भुसंपादन तातडीने करावे लागणार आहे, सदर क्षेत्राचा भुसंपादनाने ताबा घ्यावयाचा असल्याने सदर भुसंपादनाकामी येणा-या सर्व खर्चास व त्यासंबधीत इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे च-होली येथील सर्व्हे नं. नविन ४३२ (जुना सर्व्हे नं. ४८८) मधुन १८ मीटर रुंद रस्ता विकास आराखडयातील ९० मीटर रुंद विकास आराखडयातील रस्ता याना जोडणारा ९ मीटर रुंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे. सदरचा रस्ता १८ मीटर रुंद रस्ता व ९० मीटर रुंद रस्ता वाहतुकीचे सोयीसाठी जोडणे आवश्यक आहे. सदरचा ९ मीटर रस्ता घोषीत करताना संबंधित जागा मालकांना टीडीआर/एफएसआय/ मोबदला देण्याचे मान्यतेकामी सदरचा ठरावात अंतर्भाव करुन घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील स.नं. १४७, १४८, १५६ मधील गणेशनगर कॉलनी क्र. २,५,९ व १३ येथील मंजुर विकास योजनेत पुर्व-पश्चिम अनुक्रमे १८.० मी. एक व १२.० मी. तीन रस्ते आहेत. सदरचे रस्ते व अस्तित्वातील रस्ते यामध्ये जागेवर तफावत दिसून येते. मनपामार्फत अस्तित्वातील रस्ते विकसीत करणेत आलेले आहेत. सदरचे अस्तित्वातील रस्त्यास रस्तारुंदी ९.० मी. केलेस जागेवरील बांधकामे काढणेची आवश्यकता नाही.

,

तरी मौजे बोपखेल येथील स.नं. १४७, १४८, १५६ मधील गणेशनगर कॉलनी क्र. २ येथील १८.० मी.रस्ता अस्तित्वातील रस्त्यास रस्तारुंदी करुन १२.० मी. असा फेरबदल करणे तसेच कॉलनी क्र. ५, ९, १३ येथील अस्तित्वातील रस्त्यास रस्तारुंदी करुन ९.० मी. असा फेरबदल म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल प्रस्तावीत करण्यास तसेच सदरचे रस्त्यालगतचे आ.क्र. २/१५४ खेळाचे मैदान (PG), आ.क्र.२/१५९ शॉपिंग सेंटर व मार्केट (SCM),आ.क्र. २/१५८ माध्यमिक शाळा (SS), आ.क्र. २/१५९ दवाखाना व प्रसुतिगृह (DMH), आ.क्र. १/१६० टेलिफोन सेंटर (TC) यामध्येही रस्त्याच्या फेरबदल आखणीप्रमाणे फेरबदल करावा लागणार आहे. सदर म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार रस्ते व आरक्षणे आखणी फेरबदलची संपुर्ण कार्यवाही करणेचे म्हणजेच जाहीर नोटीस करणेकामीचे, हरकती सुचनांवर सुनावणी घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे वाकड तालुका मुळशी येथील स.नं. १०८ पै. मधील ३०.०० मी. व २४.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्राचे व स.नं.१ पै. मधील आ.क्र. ४/४ टाऊन हॉलच्या जागेचे भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. मौजे वाकड-हिंजवडी या परिसरातील वाहतूक कोंडी समस्या दूर होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होण्याच्या अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ मौजे वाकड येथील स.न. १०८ पै.मधील ३०.०० मी.व २४.०० मी. रस्त्याने बाधित होणा-या जमिनीचे व स.नं. १ पै. मधील आ.क्र. ४/४ टाऊन हॉलच्या जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी अथवा शासन निर्णय दि.१२/०५/२०१५ नुसार ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे तळवडे परिसरातील वाहतुक कोंडी समस्या दुरु होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होण्याच्या अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ मौजे तळवडे-चिखली शिवेवरील २४ मी. व त्यापुढील १२ मी. इंद्रायणी नदीच्या कडेने एमआयडीसी पुलाकडे जाणारा रस्ता रस्त्याने बाधित होणा-या जमिनीचे भूसंपादन सद्यस्थितीत जुना भूसंपादन कायदयाने होत आहे. त्याऐवजी नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये किंवा खाजगी वाटाघाटीने हया रस्त्याचे संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

,

अनुकूल - ८१ प्रतिकूल– ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ३४३ विषय क्रमांक- १५

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.लेखा/०८/कावि/९९१३/२०१८ दि.३०/०८/२०१८

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२८९ दि.२७/०९/२०१८

मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षण रायगड भवन, सातवा मजला, नवी मुंबई-४००६१४ (शासकीय ऑडीट) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाचे सन २०१३-१४ या कालावधीचे लेखापरिक्षण पूर्ण केलेले असून त्यांनी त्याचे अहवालामध्ये एकत्रित १२२ परिच्छेद उपस्थित केलेले आहेत. त्याकामी संबंधित विभागांकडून परिच्छेदाची पूर्तता करून घेणेत आलेली आहे. सदर अहवाल व त्यातील परिच्छेदाचे प्राप्त अनुपालन अवलोकनार्थ नगरसचिव विभागात ठेवले आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम १० (१) अन्वये मा.सहसंचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई यांचेकडील अनुपालन पूर्तता अहवाल सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. ज्ञानदेव थोरात** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

,

**मा.नामदेव ढाके-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १६

दिनांक – २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्वभाअक/३/कावि/३४१/२०१८
दि.५/१२/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/११/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

,

**प्रपत्र“अ”**

<table>
<tr><th colspan="2">महानगरपालिकेचे नाव</th><th>पिंपरी<br>चिंचवड महानगरपालिका</th><th>शेरा</th></tr>
<tr><td colspan="2">जिल्हा</td><td>पुणे</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या</td><td>१५२९२</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या</td><td>१५२९२</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">मंजूर अर्जाची एकूण संख्या</td><td>१२७३१</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>वैयक्तिक घरगुती शौचालय</td><td>एकुण बांधकाम पुर्ण-१२१५९</td><td>मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-८२३६<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३९२३</td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>सामुदायिक शौचालय</td><td>५८२ सीटस</td><td>महिला–२६२ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण</td></tr>
<tr><td rowspan="2">निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता</td><td rowspan="2">८९६४ लाभार्थी</td><td>GOI+GOM=५३७.८४लाख</td><td>GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा</td></tr>
<tr><td>ULB = १७९.२८ लाख</td><td>ULB =२०००/- हिस्सा</td></tr>
<tr><td></td><td>एकुण</td><td>७१७.१२ लाख</td><td></td></tr>
</table>

,

| | | | |
|---|---|---|---|
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ८०८३ लाभार्थी | GOI+GOM=४८४.९८लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१६१.६६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६४६.६४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत यावा.

**मा.ज्ञानदेव थोरात** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नितीन (आप्पा) काळजे -** मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- प्रभाग क्र. ७ च-होली येथील सर्व्हे नं. ४५८ ते सर्व्हे क्रं.४०४ (पठारेमळा) येथील १८ मी. विकास (निवीदा क्र. ७५/२-२०१७/१८) या कामातून प्राईड वर्ल्ड सिटीकडे जाणारा रस्ता विकसीत करणेबाबत मा.महापालिका सभा ठराव क्र. २०१ दि. २२/०६/२०१८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर रस्त्याची आलाईमेंट बदलामुळे जागा ताब्यात आलेली नाही त्यामुळे सदर कामाऐवजी प्राईड वर्ल्ड सिटीकडे मधील २४ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ६ मोशी येथील गट क्र. ५७ ते ६१ पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणे (निवीदा क्र. ४७/१/२०१७-१८) हे सध्या चालू असलेल्या रस्त्याच्या कामातून शिवाजीवाडी येथील डी.पी./ नॉन डी.पी. प्रमाणे रस्त्याची कामे करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ७ च-होली येथील हिरामाता पुल, खडकवासला वस्ती ते ९०.०० मी.डी.पी. रस्त्यापर्यंतचा ३० मी. डी.पी.रस्ता विकसीत करणे. (निवीदा क्र. ६६/९/२०, २०१७-१८) हे सध्या चालू असलेल्या रस्त्याच्या कामातून प्रभाग क्र.३मधील डी.पी.रस्त्याचे आवश्यकतेनुसार उर्वरीत कामे करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. बापू उर्फ शत्रूघ्न काटे** - मा. महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. एकीकडे आपल्याकडे भारत स्वच्छ अभियान राबवित असताना आणि हागणदारी मुक्त शहर हे

,

विषय पिंपरी चिंचवड शहरामध्ये उत्तमप्रकारे राबविले जात असताना मी लक्ष वेधू इच्छितो की महापौर साहेब, आयुक्त साहेब मी आयुक्तांबरोबर चार वेळेला या विषयावर बोललेलो आहे. माझ्या प्रभागामध्ये एमबी कॅम्प झोपडपट्टीमध्ये गेली दोन दिवसापुर्वी कॅन्टोन्मेंट हद्दीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उभारलेले शौचालय तोडून भुईसपाट केले. आयुक्त साहेब आज त्याठिकाणी अडीच हजार पब्लिक आहे. अडीच हजार पब्लिकसाठी फक्त २६ टॉयलेटस उपलब्ध आहेत. २६ सिटस आहेत. आणि  मी आरोग्य अधिका-यांकडे परवाच्या दिवशी मागणी केली मोबाईल व्हॅनची. परंतु त्याची उपलब्धता आपल्या महानगरपालिकेकडे नाही झाली. एक व्हॅन आज सकाळी लावली गेली. गावडे साहेबांना फोन केला होता गावडे साहेबांशी बोलणे झाले आयुक्त साहेबांशी बोलणे झाले. परंतु आज तिथल्या महिलांना, मुलांना, वृध्दांना मजबुरीने ओपनवर टॉयलेटला बसावे लागते. त्याची दखल आयुक्तांनी स्वत: घ्यावी असं मी त्यांना वारंवार सुचना केलेली आहे. तिथले नागरीक स्वत: टॉयलेट बांधण्याकरीता तयार आहेत. त्यांना आपल्या महानगरपालिकेकडून तशा सोयीसुविधा पण उपलब्ध करुन दिल्या. परंतु त्या ठिकाणचा मुळ मालक सात बारा होल्डर त्या नागरीकांना तिथल्या रहिवासियांना सतत विरोध करुन त्यांच्यावरती दादागिरी करुन त्यांना ते टॉयलेट उभारुन देत नाही. तरी माझी मा.आयुक्तांना नम्र विनंती आहे की तुमच्या अधिकाराखाली त्याठिकाणी टॉयलेट उभारुन देण्यासाठी त्यांना सुरक्षा दयावी अशी मी तुम्हाला विनंती करतो. दुसरा एक विषय असा मला बोलायचा आहे की आज ठेकेदारांचे इथं साफसफाईचे लोक असतात. साफसफाईचा ठेका घेणारा बाजूला राहतो. त्याचा सुपरवायजर असतो परंतु आयुक्त साहेब आज माझ्या प्रभागामध्ये सकाळी १० वाजता जरी राऊंडला गेलो तरी अनेक ठिकाणी आहे तसाच कचरा पडलेला असतो. ११ वाजता गेलो तरी आहे तसा कचरा असतो. शेवटी मला आरोग्य अधिका-यांना फोन करुन सांगावे लागते की हया हया ठिकाणी कचरा पडलेला आहे. म्हणजे रजिस्टरला हजेरीला लोक आहेत परंतु काम करायला प्रॅक्टीकली लोक नाहीत. याची तुम्ही दखल घ्यावी अशी मी तुम्हाला नम्र विनंती करतो. एवढे माझे विषय होते याच्यावरती लक्ष वेधू इच्छितो. याच्यामध्ये आपण जाणूनबुजून लक्ष दयावे. आणि त्याच्यावर कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.निलेश बारणे** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब भूतो न भविष्य असं स्वच्छ भारत अभियानचे काम चाललं आहे असं वाटायला लागले

,

असेल आपल्याला, पण किती लूट आपल्या महापालिकेमध्ये होते याचा एक खुलासा मी आपल्याला करु इच्छतो. महापौर साहेब, आपण जागोजागी चौकाचौकामध्ये ते डस्टबीन बघतो, त्या डस्टबीनची खरेदी झाली ना साहेब. आयुक्त साहेब त्या डस्टबीनची मार्केटमध्ये प्राईस बघितली तर सहा हजार ते सात हजारच्या वर जात नाही. मी पण एक हॉटेल चालवतो पस्तीस ते चाळीस हजार रुपयाला रेफ्रिजरेटर फ्रिज खरेदी केले जातात. महापौर साहेब, आपण त्या बकेट २९३००/- रुपयाला परचेस केल्या. थेट पध्दतीने कामे दयायची सध्या एक फॅशन चालू झाली. मी मागच्या वेळेस पहिल्यांदा निवडून आलो. त्यावेळेस सभासदामध्ये मला काही कळत नव्हतं. मी सन्मा. सदस्या सिमा सावळेंना विचारलं काय करावं कसं काय शिकावं. त्या म्हणाल्या स्वत: भांडल्याशिवाय काही होणार नाही. आणि त्या दिवसापासून मी सिमाताईंनाही बघतो. सुलभा उबाळे असतील, अप्पा बारणे असतील. तुम्ही पण मनसेमध्ये असणारे प्रत्येक गोष्टीला विरोध होता. या सभागृहामध्ये कोर्टामध्ये जायची पध्दत फार कमी झालेली आहे. लूटमार इतक्या बेकार प्रमाणे चाललेली आहे ना. प्रत्येक चौकामधल आज सबवेच काम असू दे. ते तीन कॉन्ट्रॅक्टर आहेत. पहिले होते पिंपरी चिंचवड महापालिकेचे जावई असल्यासारखे मातेरे. आता कोण तर तो दुसरा एचसीके आलाय. सगळया रिंगा त्यालाच. केबल काम पण त्यानेच करायचे. सबवेची कामे पण त्यानीच करायची. ते तीघ मिळून काम करतात. हे काय चाललय महापौर साहेब. मग कोणावर अंकुश राहिला की नाही. ठेकेदाराने ऐकले नाही. ठेकेदारांची बदली. अधिका-यांनी ऐकले नाही अधिका-यांची बदली करायची. हे कुठेतरी थांबलं पाहिजे. आयुक्त साहेब आणि महापौर साहेब रिंगा, रिंगा, रिंगा, रिंगा असंच झालेल आहे या महापालिकेमध्ये. आणि या गोष्टीला विरोध करणारे फार कमी लोक राहिलेले आहेत या महापालिकेमध्ये. आज स्वच्छ भारत अभियानामध्ये सहा हजाराचे स्टीलच बकेट तुम्ही २९ हजार ३०० रुपयाला कसं घेतले. थेट पध्दतीने दयायची कामे बंद करा. अधिका-यांनी ऐकले नाही तर त्यांची तुम्ही बदली करुन टाकता. कुठेतरी हा प्रकार मा.आयुक्त साहेब थांबला पाहिजे. किती रिंगा व्हायच्या. सुदर्शननगर मध्ये जो सात टक्के बिलो जातोय, तोच १४ टक्केला काळेवाडी फाटयाला अबोव्ह जातोय. बिलो, अबोव्ह, बिलो, अबोव्ह हे काय चाललंय. हे सगळं कुठेतरी थांबवा. सध्या जी सर्वसामान्य जनतेची लूट चालली आहे ती लूट कुठेतरी थांबवा. काय आहे की नाही कोणाचं. मला तर महापौर साहेब असं कळलंय, मला माहीत नाही खर आहे का खोटं आहे. रिंग रिंग काय होतेय ना साहेब. रिंग रिंग. त्या रिंगचे वरचे जे पैसे असतात ना ते

,

कोण वाटून घेतं माहीत नाही मला. ३४ कोटीचे काम करा. तुम्ही १४ टक्के अबोव्ह गेले. तुम्ही सहा टक्क्यांनी मंजुरी देणार. सात टक्के कोणाच्या खिशामध्ये जाणार हो. औधचे काम केले त्या ठेकेदाराने सहा का सात टक्के बिलोनी. आता तुम्ही मंजुरी करता. कुठेतरी प्रकार साहेब थांबला पाहिजे. सभासदांचे काय चाललय महापालिका कुठे चाललीय. कोणाच्या अबोव्ह रिंग चालल्यात. कोण टेंडर भरतय कोण कोणाला दाबतय. हा कुठेतरी प्रकार थांबला पाहिजे मा. सभागृह, धन्यवाद.

**मा. नामदेव ढाके –** मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता--

ठराव क्रमांक - ३४४ विषय क्रमांक- १६

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र

क्र.स्वभाअक/३/कावि/३४१/२०१८ दि.५/१२/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/११/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

,

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १५२९२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १५२९२ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १२७३१ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१२१५९ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-८२३६<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३९२३ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ८९६४ लाभार्थी | GOI+GOM=५३७.८४लाख | GOI = २०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १७९.२८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **७१७.१२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ८०८३ लाभार्थी | GOI+GOM=४८४.९८लाख | GOI = २०००/-व |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१६१.६६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६४६.६४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच प्रभाग क्र. ७ च-होली येथील सर्व्हे नं. ४५८ ते सर्व्हे क्रं.४०४ (पठारेमळा) येथील १८ मी. विकास (निवीदा क्र. ७५/२-२०१७/१८) या कामातून प्राईड वर्ल्ड सिटीकडे जाणारा रस्ता विकसीत करणेबाबत मा.महापालिका सभा ठराव क्र. २०१ दि. २२/०६/२०१८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदर रस्त्याची आलाईमेंट बदलामुळे जागा ताब्यात आलेली नाही त्यामुळे सदर कामाऐवजी प्राईड वर्ल्ड सिटीकडे मधील २४ मी.डी.पी.रस्ता विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ६ मोशी येथील गट क्र. ५७ ते ६१ पर्यंतचा १८ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणे (निवीदा क्र. ४७/१/२०१७-१८) हे सध्या चालू असलेल्या रस्त्याच्या कामातून शिवाजीवाडी येथील डी.पी./ नॉन डी.पी. प्रमाणे रस्त्याची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ७ च-होली येथील हिरामात पुल, खडकवासला वस्ती ते ९०.०० मी. डी.पी. रस्त्यापर्यंतचा ३० मी. डी.पी.रस्ता विकसीत करणे. (निवीदा क्र. ६६/९/२०, २०१७-१८) हे सध्या चालू असलेल्या रस्त्याच्या कामातून प्रभाग क्र. ३ मधील डी.पी. रस्त्याचे आवश्यकतेनुसार उर्वरीत कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.चंद्रकांत नखाते-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

,

ठराव क्रमांक - ३४५ विषय क्रमांक- १७

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

<u>**विधी समिती**</u>

अ) दिनांक ०२/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १६/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. नितीन [आप्पा] काळजे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.चंद्रकांत नखाते-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ३४६ विषय क्रमांक- १८

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

<u>**मा.महिला व बालकल्याण समिती**</u>

अ) दिनांक १७/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १२/११/२०१८ व दिनांक २२/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. नितीन [आप्पा] काळजे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

,

**मा.चंद्रकांत नखाते-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ३४७ विषय क्रमांक- १९

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक २४/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १४/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. नितीन [आप्पा] काळजे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.चंद्रकांत नखाते-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ३४८ विषय क्रमांक-२०

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दिनांक २६/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. नितीन [आप्पा] काळजे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

,

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.चंद्रकांत नखाते-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ३४९ विषय क्रमांक- २१

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.नगरसचिव

**शिक्षण समिती**

अ) दिनांक ०१/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १५/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. नितीन [आप्पा] काळजे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. नामदेव ढाके –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- २२

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. लेखा/३५/कावि/२७७/२०१८ दि.२०/१२/२०१८

२) तातडीचे विषयकामीचे पत्र क्र. लेखा/३५/कावि/२७८/२०१८ दिनांक २०/१२/२०१८

परिवहन महामंडळाकरीता ४०० सीएनजी, बीआरटी, नॉन एसी बसेसच खरेदीकरीता मा.संचालक मंडळ ठराव क्र. ६ दि. २३/०५/२०१८ ला अनुसरुन बसेस खरेदीकामी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मे. टाटा मोटर्स यांची निविदा प्राप्त झालेली आहे.

,

त्यांनी बीआरटी साठी उपयुक्त असणा-या ९०० मी.मी. फ्लोअर हाईट, ११-१२ मी.लांबीच्या युरो-४, सीएनजी, आयटीएमएस व ७ वर्षे आयटीएमएस एएमसी व वॉरंटीसह प्रति बससाठी निगोसिएशन नंतर प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/- इतका दर सादर केला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४० % हिश्याप्रमाणे ४०० पैकी १६० बसेस करीता प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/- नुसार १६० बसेससाठी र.रु.७७,४४,७२,८००/- इतकी रक्कम पिंपरी चिंचवड मनपा कडुन परिवहन महामंडळाकडे वर्ग झालेनंतर पुढील खरेदी आदेश देणे व तद अनुषंगीक प्रक्रिया राबविणेत येणार आहे असे मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल. यांनी दिनांक १९/१२/२०१८ चे पत्रान्वये कळविले आहे.

विषयांकित कामाचा मनपाचे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आलेला असून पीएमपीएमएल निधी अंतर्गत १,६४,५६,००,०००/- पैकी बसेस खरेदीसाठी र.रु. ६० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४० % हिश्याप्रमाणे १६० बसेस करीता प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/- नुसार १६० बसेससाठी र.रु. ७७,४४,७२,८००/- इतकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून पुणे महानगर परिवहन मंडळाकडे टप्प्या टप्प्याने गरज व मागणीनुसार वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. सागर आंगोळकर** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब याच्यामध्ये एक सुचना आहे. आपण जर पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर मिळून बस खेरीदी करीत आहोत. तर त्याच्यातल्या एकदोन बस अशा आपण खरेदी कराव्यात की जेणेकरुन या शहरामध्ये येणारे बाहेरचे जे लोक दुरवरुन येतात त्या लोकांना हे शहर पाहण्यासाठी दोन बस खरेदी कराव्यात. त्याच्यामध्ये मोरया गोसावी मंदीर असेल, देहू-आळंदी असेल, आपलं सायन्सपार्क असेल, त्याचप्रमाणे भक्तीशक्ती असेल. शाहू महाराजांचा पुतळा आहे आपल्याइथं. असे विविध चांगल्या चांगल्या गोष्टी शहरातील येणा-या व्हिजीटर लोकांना दाखविता आल्या पाहिजेत. अशा दोन डबल डेक्कर बस आपण खरेदी कराव्यात. अशी मी  तुम्हाला नम्र विनंती करतो.

,

**मा.दत्तात्रय साने -** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब मगाशी विषय बोलता बोलता राहिला. आपण हया १६० बस खरेदीबाबत प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे. यापुर्वी सुध्दा आपली अटोक्लस्टर येथे मिटींग झाली त्यावेळेस आपण एक प्रस्ताव मांडला होता. १५५ कामगार जोपर्यंत आपल्याकडे पिंपरी चिंचवडमध्ये येत नाहीत तोपर्यंत पीएमपीएमएलचा कुठलाही विषय करायचा नाही असे ऍटोक्लस्टरला ठरलेलं आहे. गेली दोन-तीन महिने झाले हा विषय आज उदया करत करत आपले सगळे प्रस्ताव आपण आपल्या परीने दिलेले आहेत. आता याठिकाणी ११० कामगारांना त्यांनी आपल्या कामगारांच्या बदली तिथे घेतलेले पण आहेत. मग आपण आपल्या कामगारांना इकडे का घेत नाही. आपण का त्यांना प्रेशर करीत नाही. महापौर साहेब आयुक्त साहेब आपण त्यांचेकडून खुलासा करुन घ्यावा. जोपर्यंत हा विषय होत नाही, जोपर्यंत आपले कामगार इकडे येत नाहीत. तोपर्यंत पीएमपीएमला एक रुपया पण आपण इकडून देऊ नये. अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण आपण त्यांना एवढया व्यवस्थितपणे चांगल्या मागण्या करुन सर्व पुर्तता करुन आपल्याला ते लोक देत नसतील, आपल्याला जर ते त्रास देत असतील तर महापौर साहेब माझी आपल्याला विनंती आहे. झालयं तर ती लोक आली का नाही. या विषयाचा आम्ही रोज पाठपुरावा करतोय. की आज उदया चालू आहे. म्हणजे आपल्याकडे ती लोक कधी देणार आयुक्त साहेब त्यांनी खुलासा करावा. आयुक्त साहेबांनी डिक्लेरेशन दयाव की दोन दिवसात कामगार येतील. अशा पध्दतीने जर असेल तर आपण पैसे दयावेत. एकतर हा विषय वन के खाली आणलेला आहे. वनके खाली विषय आणण्याची काही गरज नाहीय. इथं आपल्याला बस घेऊन कुठे जायचं नाही. आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे. एकतर आपण तो वन के खाली विषय आणला आहे. जोपर्यंत आपले कामगार इकडे येत नाहीत तोपर्यंत हा विषय करु नये. किंवा आम्ही मान्यता देणार नाही. किती दिवस झालं हे चाललंय. साहेब, आपण किती वेळा बोललोय या विषयावर. तुम्ही डिक्लेअर करा. अहो, साहेब त्यांना श्री.मानेनां कोणी व्हॅल्यू नाही देत, तिथं कोण त्यांना विचारत नाहीत.

**मा.माने [ पीएमपीएमएल] -** सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब, आता जो सन्मा. दत्ताकाका साने यांनी जो खुलासा मागितला आहे. त्या अनुषंगाने खुलासा करु इच्छितो की हे जे १५५ कर्मचारी सोडायचे आहेत यासंदर्भात सीएम

,

मॅडमशी बोलणे झालेले आहे. येत्या दोन दिवसांमध्ये त्या ऑर्डर निर्गमित होणार आहेत. आणि त्या कर्मचा-यांना सोडवायची कार्यवाही चालू आहे. त्यात अडचण अशी होती की जे कर्मचारी सोडल्यानंतर तिकडच्या कामकाजामध्ये अडचण येऊ नये कारण १५५ कर्मचारी जर सोडले तर मेंटेनन्सच्या कामामध्ये अडचणी निर्माण होतील. ही प्रक्रिया चालू असून त्यातले ८४ कर्मचा-यांची भरती झालेली आहे. पुढील १८० कर्मचा-यांची भरती प्रक्रिया चालू असल्या कारणामुळे थोडा विलंब झालेला आहे. परंतु हे १५५ कर्मचारी सोडण्याबद्दलचा निर्णय ऑलरेडी मॅडमने घेतला आहे. फक्त तिथल्या कामकाजामध्ये अडचण येऊ नये म्हणून थोडा लांबणीवर पडलेला आहे. आणि दोन दिवसांमध्ये मॅडम ऑर्डर निर्गमित करणार आहेत.

**मा.दत्तात्रय साने** – मा. महापौर साहेब, त्यांनी सांगितलेल्या माहितीप्रमाणे १८० लोकांची भरती झाली. मला वाटतं की पीएमपीएमएलचे सदस्य आपण पण आहात. मला वाटत आयुक्त साहेब आणि स्टँडींग चेअरमन पण आहेत. आपल्याला माहिती आहे की नाही हे मला माहित नाही. भरती करताना साहेब आपल्या लोकांना सहभागी करुन घेतलं का. आपल्या लोकांना त्याबाबतीत काही कळविलं का किंवा आपली लोक कोणी घेतलीत का. त्यांच्या १८० च्या भरतीमध्ये आपलाही ४० टक्के वाटा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा भरतीमध्ये ४० टक्के वाटा असू नये का. याची सुध्दा संबंधित महापौर आणि सत्तारुढ पक्षनेते, स्टँडीग चेअरमन आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे. जर ४० टक्के वाटा हा फक्त पैसे घेण्यासाठी आपल्याला वाटा देतात. मग जर त्यांची भरती असेल तर पिंपरी चिंचवडची ४० टक्के लोकं का घेऊ नयेत त्यांनी. हाही रास्त मुद्दा आपण सभागृहात त्याला मान्यता दयावी. जवळजवळ ८० लोक भरलेली आहेत. ८० लोक भरताना महापौरांना माहिती नाही. आयुक्तांना माहित नाही, स्टँडींग चेअरमनला माहित नाही. सत्तारुढ पक्षनेत्यांना माहित नाही. मग ही भरती कसली. आपण पैसे दयायचे दयायचे आजपर्यंत चालू आहे. म्हणजे फक्त दयायच काम आपलं आहे आणि त्यांनी काही दयायच असेल तेव्हा आपल्याला झिरो किंमत. मग असे असेल तर थांबवा ना. आम्ही दहा वेळा सांगितलेले आहे. पीएमपीएमएल आपल्याला सवतीची वागणूक देतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला वागणूक देताना पूर्ण बेकार पध्दतीने देतात. अनेक वेळा सभागृहात बोलत असताना परत तेच तेच, तुम्ही परत तेच परत तेच. चांगला विषय आला. चांगला विषय आला की मंजुर करा. कामगारांसाठी किंवा पीएमपीएमएलसाठी आम्ही पैसे देतोय. पण आपल्याला बेकार वागणूक देतात. म्हणून आम्ही

,

किती वेळा अशी मागणी केली. आम्ही जे जे रुट मागितले त्या त्या प्रमाणे बस रुट दिले जात नाहीत. बस दिल्या जात नाहीत मग प्रत्येक वेळेस आपण पैशाचा विषय आला की आम्ही आपल जाऊ दे आपली लोक आहेत, आपल्याला बस देतात. आपण त्यांना वेगळया भावनेने मदत करण्याचा प्रयत्न करतो. मग चांगल्या पध्दतीने काम करायचे असेल तर आपल्या ४० टक्के वाटयाप्रमाणे आपल्याला सुध्दा त्यामध्ये हिस्सा दिला पाहिजे. आपल्याला सहभागी व्हायला पाहिजे. आयुक्त साहेब बरोबर आहे की नाही. ४० टक्केनुसार आपली लोक भरायला नको का. आपली लोक का घेतली नाहीत. हा ही प्रश्न त्यांना विचारणे आपल्याला गरजेचे आहे. मला असं वाटतं की तुम्हाला बोलावतात की नाहीत मलाही माहीत नाही. ह्या पीएमपीएमएलच्या बॉडीवर आपले देखील लोक आहेत त्यांना तिथे बोलावले जाते का. त्यांचा मान-सन्मान केला जातो का. त्यांना विचारात घेतले जाते का. म्हणून आयुक्त साहेब आजचा जो विषय तुम्ही वन-के खाली आणलेला आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण केल्या जात नाहीत, आमचे कामगार इकडे येत नाहीत, ४० टक्केप्रमाणे भरती होत नाही तोपर्यंत हा विषय मंजुर करु नये. तो विषय थांबवावा अशी माझी विनंती आहे. सभागृहाने पण सांगावे. जर आपल्याला सवतीची वागणूक देत असतील तर हा विषय आपण का आणतोय. माझी विनंती आहे साहेब तुम्ही या विषयावर जोपर्यंत आपली लोक येत नाहीत तोपर्यंत हा विषय थांबवावा.

**मा.मंगला कदम** - सन्मा. महापौर साहेब, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह १६० बसेस खरेदी करणेबाबत ७७ कोटी रुपये देण्याबाबतचा विषय आहे. ७७ कोटी रुपये देण्याचा विषय आहे. माने साहेबांनी खुलासा केला. जसं काही पाकिस्तानमधून इकडचा मुलगा तिकडे चुकून गेला आणि तो आल्यानंतर आपण जसं त्याच स्वागत करणार आहे. तसं आपल्या लोकांचे जंगी स्वागत आपल्याला करावं लागणार आहे. मी खरच सांगते कमिशनर साहेब. तुम्ही त्या मानेंना फक्त बाहेरपासून इथंपर्यंत चालत यायला सांगा. त्यांची परिस्थिती ह्या पीएमपीएमएलमुळे झाली आहे. तरी अधिका-यांची, कर्मचा-यांची बाजू घ्यायला आपण शिकले पाहिजे, कर्मचा-यांची बाजू घ्यायला आपण शिकल पाहीजे. आज कमिशनर साहेब क्लास-वन अधिकारी फक्त आपल्याकडचा एकच तिथे होता. आणि अक्षरश: त्या लोकांनी वेगवेगळया पध्दतीने त्या माणसाला तिथे अडकवण्याचा प्रयत्न केला. आणि हे डोक्यामध्ये ठेवून अक्षरश: त्यांचा रोडवर ॲक्सीडेंट झाला. मग त्यांच्या कर्माने झाला सुदैवाने झाला, की काय झालं

,

अस म्हणायचं का. परंतु ज्या वेळेला एखादया व्यक्तींला इतका त्रास दिल्यानंतर त्याची फॅमिली किती डिस्टर्ब होते. आज आमचे जेवढे १५५ कर्मचारी तिकडे आहेत. त्यांनी खुलासा करताना ते पाकिस्तानातून आपल्याकडे लोक येणार आहेत अशी त्यांच्या मनाची भावना होते. एक दोन दिवसामध्ये त्या गुंडेमॅडम आहेत त्या त्यांना सोडणार आहेत. त्यांना हायसं वाटल असेल की त्या मॅडम सोडणार आहेत म्हणून. म्हणजे आपली लोक तिथे आहेत. आणि इथं आल्यानंतर आपण त्यांच जंगी स्वागत करायला पाहिजे. त्यांच्याकडून जसे ते इकडे आले त्या पध्दतीने आपली लोक इकडे येणार आहेत असं त्यांच्या बोलण्यातून दिसत होतं. मग साहेब आपण किती दिवस असं करुन घेणार आहोत. जसं मगाशी सांगितलं की बसचे रुट आपल्याला मिळत नाहीत नवीन बस मिळत नाहीत अहो आत्ता गटनेते मनसेचे चिखले बोलले की पिंपरी चिंचवड दर्शन करा. काय वाईट सुचना आहे. आतापर्यंत ही सुचना मिळाली की नाही साहेब आपल्याला. पुणे दर्शन करु शकतो मग पिंपरी चिंचवड दर्शन बस का आमच्यासाठी करीत नाही. का त्यांना आमच्या पिंपरी चिंचवडचे एवढं वावड आहे. त्यानी एसी बस घेतल्या साहेब एक दिवस पिंपरी चिंचवड दर्शन करायचं याच्यासाठी मागच्या वेळेला पैसे दिलेत की नाहीत. एसी बस घेवून पिंपरी चिंचवड दर्शन ही बस झाली पाहिजे. असा आपला प्रस्ताव आहे की नाही. स्टँडींग कमिटीच्या चेअरमन तेजस्विनीच्या गाडीत बसल्या. त्यांनी सांगावे ताई तुम्हाला पुन्हा गाडी दिसली का, किंवा गाडी चालू आहे का. मग का ७७ कोटी दयायचे. का आम्हालाही वाटल स्टँडींग कमिटीचे चेअरमन महिला आहेत. त्या महिला आहेत म्हणून त्यांनी महिलांसाठी गाडी चालू केली. का बंद झाली कशासाठी ती बंद झाली. अहो अपमान आहे हा. साहेब पिंपरी चिंचवडकरांचा अपमान आहे. त्यांनी फक्त पैसे मागायचे आपण त्यांना पैसे दयायचे. फक्त यात समाधान आम्हाला एवढचं आहे की टाटा मोटर्स कंपनीमधून बसेस खरेदी होणार. समाधान आम्हाला की टाटा मोटर्स नाव टाकलंय त्यांनी. टाटा मोटर्समधून या पिंपरी चिंचवडला बसेस घेणार. त्याच फक्त आम्हाला समाधान मिळणार आहे. यातील एक बस आपल्याकडे नवीन कोरी मध्ये सीएनजीची बस मिळणार नाही. सगळया जुन्या झाल्या, बंद पडायला लागल्या की पिंपरी चिंचवडला देणार. दर वेळेला साहेब आपण बोलत असतो की आता हयांना कुठेतरी आपण शिकविले पाहिजे. किती नगरसेवकांना माहिती आहे की ८० लोक भरलीत. पक्षनेते तुम्हाला सांगीतल होतं का, नाही सांगीतल. खरच पक्षनेते पैसे देवू नका. महापौर साहेब, जर आपल्याला किंमत देणार नसतील तर त्या लोकांना ठीक आहे पीएमपीएमएल आपलीच आहे. परंतु साहेब आपल्याला

,

किंमत देणार नसतील, आपल्याला चांगल्या बसेस देणार नसतीलतर मग का म्हणून आपण पैसे दयायचे. बस पासकेंद्र बंद करुन टाकलेत. बस पासकेंद्र बंद आहेत कमिशनर साहेब. ज्येष्ठ नागरीकांसाठी ठिकठिकाणी झिरो पॉईंटला आपण पासकेंद्रे केले होते. बस पास केंद्रे बंद करुन टाकलीत सगळीकडची. मग आपला पीएमपीएमएलचा खप कसा होणार. जर नागरीकांसाठी बसपास केंद्रे नसतील. बसपास काढायचा असेल. तुम्हाला सांगते स्वारगेटला जा. निगडीला जा. चिखली, तळवडेचा ज्येष्ठ नागरीक कशाला निगडीला जाईल पास काढायला. शाळेचा विदयार्थी शाळा बुडवून जाऊ शकतो का, परत ते पालकांनी काढा. झिरो पॉईंटला आपली लोक बसलेली असतात का नसतात. त्यांनी घ्यायच आणि दयायचा पास काय वाईट आहे. सगळीकडची पास केंद्रे बंद केली साहेब. त्या केबीन वगैरे एवढा खर्च केलेला सगळा बंद झालाय. सगळयांनी बघा बर का. सगळयांनी बघा तुमच्या इथं बस पासकेंद्र होत का. ते सगळं बंद झालंय. मग आपण काय करायचं. बस पास केंद्र सुध्दा आपल्याकड नाही. मग मा. महापौर, आपण काय करायचं या पीएमपीएमएलचं. मला वाटतं मा. महापौर साहेब तुम्ही पण जाधववाडीचे गाववाले आहात त्यांना इंगा दाखवा. या अधिका-यांना तिथंल्या. की आमच्याकडे मागण्यांची का पुर्तता होत नाही. आमच्या लोकांचे रुट का मिळत नाहीत. आम्हाला चांगल्या बसेस का मिळत नाहीत. आमच्या लोकांना का अशी वागणूक मिळते. आमचे क्लास-वन अधिकारी एकच होते. आमचे कर्मचारी हे पिंपरी चिंचवडचे का नसावेत. ८० लोक भरलेत त्याच्यात किती लोक घेतलेत. मागे सुध्दा एक त्यांचा अधिकारी आला होता. पाहिजे तसे वाटेल तसे प्रमोशन दिलेत. महापौर साहेब, पक्षनेते मी तुम्हाला विनंती करते. पॉलिसीप्रमाणे त्यांच्याकडे माणस आहेत का ते बघून घ्या. जे चेकर आहेत ते तेवढया क्वॉलिफिकेशनचे आहेत का ते बघा. जाहीराती तुम्हाला माहिती आहेत का या गोष्टी. जाहिरातींची किती तरी मुदतवाढ होऊन ते बसेसवर फिरत असतात ते कुठे जाते त्याचे उत्पन्न. त्याचे उत्पन्न कुठे जाते. तिकिटे बघा कुठून येतात. मा.महापौर तुम्ही म्हटलांत सांगत जा, सांगितलं. सांगितलं मी तुम्हाला आता. की पीएमपीएमएलवर जाहिरात असते त्याची मुदत संपल्यानंतर सुध्दा त्या जाहिराती असतात त्या वाढीव दिवसाच्या पैशाचे ते करतात काय. तिकिटे कुठून छापून येतात. त्याच करतात काय. आमच्या माणसांना त्रास देतात त्याच कारणार काय. हया सगळया गोष्टी महापौर साहेब विचारल्या गेल्या पाहिजेत. मला वाटतं की हा विषय तुम्ही तहकूब ठेवावा. अशी मी सगळया सभागृहाला विनंती करते. अन्यथा आमचा विरोध असेल.

,

**मा.एकनाथ पवार-** सन्मा. महापौर साहेब्, सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर या संदर्भामध्ये दोन-तीन मतप्रवाह १०० टक्के आहेत. पीएमपीएमएलच्या संदर्भामध्ये दत्ताकाका तुम्ही कर्मचा-यांचा विषय मांडला. पीएमपीएमएलच्या कर्मचा-यांच्या संदर्भामध्ये आपण पहिली बैठक पीएमपीएमएलच्या अधिका-यांच्या बरोबर घेतली. मीही त्या बैठकीला होते. पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी मलाही एक गोष्ट सांगितली होती, जेव्हा पाठपुरावा या संदर्भामध्ये केला होता तेव्हा त्यांनी सांगितले होते की मेंटेनन्स काम चालू आहे तेव्हा एक महिनाभर राहू दया. त्याच्यानंतर आम्ही १०० टक्के करु आणि खरतर पीएमपीएमएलचे नातं हे खूप जुनं नात आहे आपलं. आणि हे ज्या पध्दतीने ताई थोडयाफार प्रमाणामध्ये तुम्हाला ही माहित आहे. तुम्ही ज्या पध्दतीने नोकर भरतीच्या संदर्भामध्ये सांगितले की पीएमपीएमएलचा मी डॉयरेक्टर नसल्यामुळे किंवा तिथली भरती प्रकिया ही त्यांनी राबविली. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की तुम्ही ज्या पध्दतीने एका क्लास-वन अधिका-याच्या संदर्भामध्ये सांगितलं. आणि ज्या ज्या गोष्टी म्हणजे तेजस्विनी बसच्या संदर्भामध्ये सिमाताईंच्या काळामध्ये ज्यावेळेस घटना घडली त्यांनी बसचे उदघाटन केले. मला असं वाटत की माने इथं आहेत तर त्यांनी त्या संदर्भामध्ये आजच माहिती सभागृहाला देतील. तर आपण दोन गोष्टींचा भेदभावही कधी नाही केला पाहिजे. सचीनची सुचना पण चांगली होती. जसं तुम्हीही त्याबाबतीत सांगितलं की जसे पुणे दर्शनची बस असली पाहिजे तसे पिंपरी चिंचवड दर्शनच्या बसची सुध्दा आपल्या शहरामध्ये गरज आहे. पिंपरी चिंचवड सुध्दा लोकांना पाहण्यासारखे शहर झालेले आहे. आणि पुढच्या काळामध्ये आपण अजुन ज्या पध्दतीने काम करतोय म्हणजे या शहराची आपल्याला जर का चांगली ओळख करायची असेल. तर हया बसेसच्या माध्यमातून १०० टक्के केले पाहिजे. मा. महापौरांना आपण याबाबत एवढीच विनंती केली पाहिजे की पुढच्या काळामध्ये पिंपरी चिंचवड दर्शन ही स्वतंत्र बस असली पाहिजे. पण आपण कधी कधी एक विचार करतो. या संदर्भामध्ये आपण आज बसेस घेण्याच्या संदर्भामध्ये आपण जर परवानगी दिली किंवा पैसे दिले तर सहा महिन्याच्या नंतर बसेस आपल्या शहरामध्ये येतील. हे काय आपण आज पैसे दिले की लगेच उदया या महामार्गावर बसेस चालतील अशीही परिस्थिती नाही. पीएमपीएमएलच्या कामाच्या संदर्भामध्ये त्यांचा कामाचा आढावा मा. महापौर आणि मा. आयुक्तांना मी विनंती करेन की पुढच्या काळामध्ये पीएमपीएमएलच्या अधिका-यांच्या संदर्भामध्ये दर १५ दिवसाला म्हणजे स्टँडींगमध्ये एखादा अधिकारी येत असेल स्टँडीगमधून जात असेल. त्यांनी चेहरा दाखविला

,

आणि गेला. त्यामुळे पीएमपीएमएलच्या पासेसच्या संदर्भामध्ये  काही घटना असतील. काही कर्मचा-यांच्या संदर्भामधल्या वेगवेगळया घटना असतील. तर सगळया घटनेचे सगळे आता इथ पदाधिकारी आहेत. त्याच्यामध्ये आणखी ॲड करा. माजी महापौर घ्या. चार पदाधिकारी घ्या.  हया सगळया लोकांना ॲड करुन पीएमपीएमएलच्या संदर्भामधल्या समस्या आपल्याला खरतर सोडवाव्या लागणार आहेत. एका बाजुला ही परिस्थिती आहे की १०० टक्के पीएमपीएमएलच्या बसेस आहेत. मेंटेनन्स तीथल्या परिस्थितीमुळे बस या मार्गावर धावल्या जात नाहीत. आपण एक आग्रह म्हणजे पीएमपीएमएलच्या अधिका-यांकडून आपण जेवढया बसेस घेऊ, जेवढा आपला वाटा आहे ४० टक्क्यांचा. ४० टक्के बसेस या आपल्या हद्दीमध्ये धावल्या पाहिजेत. अशा पध्दतीचे सुध्दा आपल्याला त्यांना सांगावे लागणार. आणि सांगावे नाहीतर तर त्यांना वेगवेगळया माध्यमातून आपल्याला बघावे लागणार. त्यामुळे आपल्याला खरतर बसेसचे आपण एका बाजुला १५५ कर्मचा-यांच्या बदलीच्या संदर्भामध्ये त्यांनी सांगितले की दोन दिवसांमध्ये आपण निर्णय  करु. पुढच्या काळामध्ये आपल्या शहरामधील लोक जी या पुणे शहरामध्ये प्रवास करतात. वेगवेगळया ठिकाणी प्रवास करतात. त्यांची सुध्दा खरतर गैरसोय आपल्याला करुन चालणार नाही. त्यांनाही आपल्याला न्याय दयावा लागणार आहे. त्यामुळे मी एवढेच सांगेन की जर बस नाही दिल्या. आज आपण महापालिकेच्या सभागृहामध्ये हा विषय केला तर उदया आपण लगेच पैसे देणार नाही. त्याच्यामध्ये पंधरा-वीस दिवस जाणारच आहेत हे लक्षात ठेवा. बीआरटीची परिस्थिती जर आपण बघितली तर आपल्याला माहित आहे ताई. ताई ही वस्तुस्थिती आहे की बीआरटीच्या संदर्भामध्ये आपण करुन सुध्दा बसची परिस्थिती ही अत्यंत दयनीय परिस्थिती आहे. ती जर सुधारावयाची असेलतर ४०० बसेस घेऊन सुध्दा आपला हा प्रॉब्लेम संपणार नाही. किमान हजार दिड-हजार बसेस ज्यादिवशी या मार्गावर धावतील त्यावेळेसच चांगल्या बसेसची आणि चांगली सुविधा, चांगल्या एसी बसेसच्या माध्यमातून आपल्याला शहरवासियांना जे पुण्यामध्ये जाऊन येऊन प्रवास करतात त्यांना देता येईल्. १५५ लोकांच्या संदर्भामध्ये माझा आग्रह आहे मा. महापौर साहेब की दोन दिवस जर झाले तर एकही पैसा तुम्हाला १०० टक्के  मिळणार नाही. दोन दिवसांमध्ये ते सगळे लोक या महापालिकेमध्ये पाठवावयाचे आहेत. त्याशिवाय कुठल्याही पध्दतीने आरटीजीएस तुम्हाला होणार नाही. किंवा कुठलाही निधी दिला जाणार नाही. त्यामुळे ही जी लोक आहेत ती याठिकाणी आली पाहिजेत. पिंपरी चिंचवड शहराला भेदभाव पीएमपीएमएलच्या माध्यमातून नाही झाला

,

पाहिजे. आपले अधिकारी सुध्दा पीएमपीएमपलचे सेवेमध्ये तेवढयाच ताकदीचे आहेत हेही आपल्याला नमुद करावे लागेल. की पुढच्या पीएमपीएमपलच्या बैठकीमध्ये नमुद करावे लागेल. ज्याप्रमाणे बसेस घेवून या शहरवासियांना आपल्याला ज्या सुविधा दयायच्या आहेत, आपण या शहराच्या लोकांसाठीच काम करतोय. हया बसेस ज्या आपण घेणार आहोत त्या आपण आपल्या शहरासाठी घेणार आहोत. दोन्ही मेट्रोच्या संदर्भामध्ये ज्या पध्दतीने आपण संवाद केला त्या पध्दतीने पुढच्या काळामध्ये मेट्रोच्या बरोबर पीएमपीएमएलच्या जर चांगल्या बसेस गेल्या तर आपल्याला कनेक्टीव्हीटी सुध्दा चांगल्या पध्दतीने होणार आहे. मा.महापौर साहेब सन्माननीय सदस्यांच्या सगळया विचारांचा चांगल्या पध्दतीचा विचार करुन आपल्याला हा विषय करावा लागणार आहे. मा. महापौर, आपल्याला विनंती करतो की या संदर्भामध्ये पीएमपीएमलला चार गोष्टीच रुलींग देवून पिंपरी चिंचवड शहराच्या लोकांवर, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पदाधिका-यावर कुठल्याही पध्दतीचा दुजाभाव न करता या पुढच्या काळामध्ये पुण्यापेक्षा सरस आपल्याला सुविधा देण्याची ख-या अर्थाने गरज आहे. खरतर पीएमपीएमएलची निर्मिती पिंपरी चिंचवडच्या आपल्या सगळया पदाधिका-यांच्या माध्यमातून केली गेली होती. त्यामुळे तो दुजाभाव आपल्याला पुढच्या काळामध्ये राहणार नाही. अशा पध्दतीचे आदेश पीएमपीएमएलच्या अधिका-यांना देऊन हा विषय मंजुर करावा हि विनंती.

**मा.सिमा सावळे** - सन्मा. महापौर साहेब. सन्मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. १५५ कर्मचारी आपल्या सेवेमध्ये परत घ्या. गेल्या वर्षभरापासूनची आपली मागणी महानगरपालिकेची. परंतु साहेब, तुम्ही त्यावेळेस बोलला होता आणि मा. मुंढे साहेब होते त्यावेळेस ते ही बोलले होते की कंपनी आहे आणि कंपनी म्हणून एकदा तुम्ही कामाला लागला की ती कंपनी आपली आहे. त्यांची नाही आणि माझी नाही. त्यामुळे तुम्ही ती मागणी करु नका असे त्यावेळेस मुंढे साहेब पण बोलले होते आणि आपण सुध्दा त्यांच्या म्हणण्याला होकार देऊन आपण मागणी करतच होतो, पण हळू हळू करत होतो. आता ती मागणी जोर धरतेय. आणि ज्या प्रकारचे वातावरण आहे कर्मचा-यांच्या बाबतीत दुजाभाव आहे का तर १०० टक्के त्याठिकाणी दुजाभाव आहे. मानेंच्या बाबतीत काय घडल सगळया शहराला माहिती आहे, पीएमपीएमएलला माहिती आहे. दुर्दैवाने मानेंना योग्य वेळी योग्य न्याय देता आला नाही. हेही सत्य आहे. त्यामुळे आपलीसुध्दा चुकी आहे. आपण साहेब

,

मागणी केली होती की त्यांचे एक विभागीय कार्यालय आपल्या शहरात सुध्दा असले पाहिजे जे की त्यांनी अजुनपर्यंत केलेले नाही. मागच्या मिटींगला गुंडे मॅडम आल्या होत्या. त्या ज्यावेळेस आल्या होत्या त्यावेळेस त्यांनीही सांगितलं होत की विभागीय कार्यालय चालू करते, डेपो चालू करते. काहीही केलेले नाही. त्याही आल्या त्यांनीही गप्पा मारल्या त्या गेल्या. मुंढे साहेबां सारखे सक्षम अधिकारी असताना सुध्दा याठिकाणचा डेपो त्यांनी बंद केला, विभागीय कार्यालय बंद केले. सगळ उचललं आणि फरफटत स्वारगेटपर्यंत नेले. आम्ही म्हणजे चोर त्यांच्यासारखे हरिश्चंद्र दुसरे कोणीही नव्हते. म्हणजे पुण्यासारखे. मला अधिका-यांनाही बोलायचे आहे. या शहरासारखे कोणी नाही. हे जे काही दाखवण्याचा प्रयत्न वरवर होतो त्यांचा मी याठिकाणी कडक शब्दात निषेध करते. महिलांसाठी बस चालू केल्या आज किती बसं रस्त्यावर धावतात. आमच्या प्रभागातल्या बस साहेब इंद्रायणीनगरला. बेटावरचे आहे आमच इंद्रायणीनगर. चारही बाजुने आम्हाला एमआयडीसीने वेढलेले आहे. तीथल्या बस न सांगता परस्पर बस बंद केल्या. परस्पर काहीही चेंज करतात. शिव्या कोणी खायच्या नगरसेवकांनी. बंद कोणी करायच्या पीएमपीएमएलने. बोलायला गेले तर काय करतात माहिती आहे का तीकडे पीएमपीएमएलाला तुम्हांला सांगाव लागेल. येऊ दे पीएमपीएमएल पैसे मागायला, आता देतो आम्ही पैसे. एका दिवसात एका तासात आम्ही पैसे देतो. पण देणार कोण. उदया माने आहेत म्हणून त्यांना बोलून तोंडसुख घेणार. आणि त्यांना बोलणार असं नाही चालणार साहेब. बसेस घ्यायच्या की नाही घ्यायच्या. तर साहेब तुम्हाला आश्चर्य वाटेल. मी बोललं तर विरोधात होईल. पण सत्य परिस्थिती सांगितली पाहिजे ना. २०१६ पासून आपण  प्रक्रिया राबविली. एक तर अशोक लेलँड आणि टाटा. दोनच आले. मग त्यांचे टेंडर इंगळे साहेबांनी रद्द केलं. नंतर तीन वेळा आपण निविदया काढल्या आणि सिंगल टेंडर आले. मला माहीत आहे ते साहेब. कायदयाच्या भाषेत जर विचाराल तर किमान तीन लोक तरी आले पाहिजेत. आणि मग नाही परवडत म्हणून घासाघीस केली आणि म्हणून मग ते टेंडर रद्द केले. मग परत तुम्ही केलं मग तीन वेळेस टेंडर कॉल करुन तीन वेळा एकच व्यक्ती आला. नो डाऊट की गाडीचा जे काही आपण मेक सांगितला होता तो मेक त्यांच्याशिवाय दुसरे कोणीही बनवत नाही आणि म्हणून याठिकाणी संशयाला जागा आहे. दुर्दैवाने मगाशी निलेश तुम्ही बोललात, योग्य बोललात दुर्दैवाने विरोधी पक्षाची लोक या गोष्टीचा अभ्यास करुन का येत नाहीत. कर्मचारी आले नाही म्हणून तुम्ही बस घेऊ नका. हे बोलणे योग्य नाही. तुम्ही सांगा ना. किती लोकांना माहीत होत या सभागृहात बोललं जात

,

असेल की सिंगल टेंडर आल ते तीन वेळा टेंडर आपण रिकॉल केले. आणि तीन वेळेला एकच व्यक्ती भरते म्हणून या बस घ्यायच्या नाहीत. मुळ मुद्दयाला बगल दयायची. आणि नको त्या दिशेने तुम्ही या सभागृहाला नेणार असाल तर हे कितपत योग्य आहे. आम्ही पण होतो साहेब विरोधी पक्षात. ठोकून बोलत होतो आम्ही. मंगलाताई त्यावेळेस सभागृह नेत्या होत्या. त्या चिडायच्या. त्या खूप चिडायच्या आमच्यावरती. आम्ही काय बोलायचय ते बोलायचो. परंतु त्याच्यासाठी कागदाचे हे चिठोरे. कोणी म्हणायचे की हया चिठो-या, हया बॅगा आम्हाला खूप काय काय नाव दिले होती. पण अभिमान आहे आम्हांला सगळया नावांचा कारण आम्ही पूर्ण अभ्यास करुनच याठिकाणी येत होतो. मा.महापौर साहेब मा. कमिशनर साहेब ज्या मेकच्या बस आपण त्याठिकाणी मागितल्या होत्या त्यामध्ये एकच कंपनी ईलीजीबल आहे का याचा तपास करणे आणि टाटा मोटर्सच आहे का आणि त्यांनाच देणे कस गरजेचे आहे यामध्ये शासनाकडे आपले काही म्हणणे मागवावयाचे आहे का. याच्या संदर्भातल्या सगळया कायदेशीर बाबी तपासून आपण काम करणे गरजेचे आहे. याठिकाणी पीएमपीएमएलचे अधिकारी आहेत. फुल तोंडसुख घ्यायचे. कारण का की दुसर ऐकायला कोणीच नाही. समोर असले तर नुसते व्हाव व्हाव बोलत राहायचं. हा दुटप्पीपणा आता बंद केला पाहिजे ना. तोंडावर पण तेच बोलायचे आणि माघारी पण तेच बोलायचं. साहेब त्यांचा आणि आमचा बांधाला बांध थोडीच आहे. पीएमपीएमएलचे कर्मचारी इथं पाहिजेत असं आपल म्हणणं होतं. की ते ज्या पोस्टवरती आहेत त्या त्या पोस्टवरती त्यांनी काम करावे. आम्ही तुमच्या म्हणण्याला मान्यता दिली होती. आम्ही चुकलो होतो का मग. आम्ही तुमच्या म्हणण्याचा आदर केलाय. याठिकाणी कर्मचा-यांवर दुजाभाव होतो. मग आपली जी कामगार संघटना आहे या संघटनेनी त्याठिकाणी मान्यता घेवून आपल्या कर्मचा-यांचा अन्याय कसा कमी करता येईल. पीएमपीएमएलमध्ये जो ४० टक्के हिस्सा आहे. तर ४० टक्के आमचे कर्मचारी तिथे आहेत. त्यांचा रोजचा अन्याय कसा कमी करता येईल याच्याकरीता तुम्ही त्यांना पगार देताय. हे होताना दिसत नाही. आपल्या कर्मचारी महासंघाला, गटनेत्यांना त्याठिकाणी पाठवा. आपलं म्हणण काय तर माझ्या महानगरपालिकेचे कर्मचारी तो माझा कर्मचारी आहे तो महापालिकेच्या हिताचा म्हणजे पे रोलवरती जे पहीले होते ते आमच्या कर्मचा-यांचे हित बघतील हा त्यातला शुध्द आणि निर्मळ हेतु आहे. आम्हाला त्यांच्यामध्ये फूट नाही पाडायची. मग आमच्या कर्मचा-यांचा किंवा महानगरपालिकेच्या पीसीएमसीतून जे कर्मचारी तिकडे गेलेत, कंपनीमध्ये मर्ज झालेत. मग त्यांना मर्ज झाल्यानंतर त्यांच्यावरती

,

अन्याय का होतो याचं सुध्दा एकदा विश्लेषण झालं पाहिजे. आमचे कर्मचारी ईलीजीबल नाहीत का पदोन्नतीसाठी. मग पदोन्नती घेतल्यानंतर छोटयातल्या छोटया विषयासाठी साहेब काय छळ केला मानेंचा. विचार करा तुम्ही. आणि हे सगळे विषय तुम्हाला आम्हाला सगळयांना माहिती आहेत. याच्यावर साहेब आपण पीएमपीएमएल चालावी म्हणून आपण खूप प्रयत्न केलेत. परंतु साहेब एकच टेंडर आल्यानंतर तीन वेळा तुम्ही टेंडर तुम्ही कॉल केले. २०१६ ला दोनच टेंडर आले होते. मग ते टेंडर तुम्ही रद्द केले. मग दोन आले रद्द केले मुंढे साहेबांनी. आता तीन आलेत तर प्रत्येकदा टाटा मोटर्स, प्रत्येकदा टाटा मोटर्स, प्रत्येकदा टाटा मोटर्स. एकच व्यक्ती येतो आणि त्यांना आपण दयायच म्हणतोय. देण्याबद्दल पण काही नाही. उदया जर कोणी कोर्टात गेले, जाणार तर नाही कोणी. जायचं म्हटलं तर अभ्यास करावा लागतो. वकीलाला पैसे भरावे लागतात. लोकांच्या शिव्या खाव्या लागतात. पेपरवाल्यांना नको तेवढया ज्या काही भाषा असतात त्यां त्या भाषाच ऐकूण घ्याव लागतं. जाणार नाही कोणी. पण सांगणे माझं काम आहे. पण एखादा खरच कोर्टात गेला आणि त्याला वाटलं जावं तर काय. ज्यावेळेस भारतीय जनता पार्टीची सत्ता म्हणून आमची जबाबदारी असेल. आम्ही पैसे खर्च केले. या सगळया विषयांचा उहापोह करणे फार गरजेचे आहे मा. महापौर साहेब, मा. कमिशनर साहेब आणि म्हणून मला असं वाटतं की पैसे देण्याच्या आधी आपण परत एकदा प्रयत्न केला तर चालेल का. आणि नाही चालणार तर का नाही चालणार. त्याच सुध्दा उत्तर हवंय. मा. महापौर साहेब तुम्ही आणि स्टँडींग चेअरमन आणि कमिशनर साहेब हे तीनच लोक आहेत, या ७७ कोटी देण्यास जबाबदार असणार. सिंगल टेंडर आहे. तीन वेळा कॉल केले एकच माणूस आला, याची गंभीरता लक्षात घ्या. आणि जे योग्य असेल तो निर्णय करावा मा. महापौर साहेब, मा. कमिशनर साहेब. धन्यवाद.

[ सभागृहात गोंधळ ]

**मा. मंगला कदम** – मा. महापौर साहेब, मतदान घ्या.

**मा. दत्तात्रय साने-** मा. महापौर साहेब, वनके खाली विषय आणलेला आहे त्यामुळे त्याचा अभ्यास झालेला नाही.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमाक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.राजेंद्र गावडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

,

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३५० विषय क्रमांक- २२

दिनांक- २०/१२/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
लेखा/३५/कावि/२७७/२०१८ दि.२०/१२/२०१८
२) तातडीचे विषयकामीचे पत्र क्र.
लेखा/३५/कावि/२७८/२०१८ दिनांक २०/१२/२०१८

विषय क्रमांक २२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर-** सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

(राहुल गुलाब जाधव)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/६१/२०१९
दिनांक - ७/२/२०१९



( उल्हास बबनराव जगताप )
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

,